मराठी व इंग्रजी शाळांतून शिकविण्यासाठीं मेहेरबान
डायरेक्टरसाहेब यांनीं मंजूर केलें आहे.

पद्यसमुच्चय

[मराठी कवितांचे वेंचे, टीका व कविपरिचय यांसहित]

कै० रामचंद्र भिकाजी जोशी

न्यू इंग्लिश-स्कुलांतील माजी शिक्षक, 'प्रौढबोध' व 'बालबोध व्याकरण', 'मराठी भाषेची घटना', 'सुलभ अलंकार', 'शब्दसिद्धि', इत्यादि पुस्तकांचे कर्ते,
यांनीं तयार केलें.



आवृत्ति नववी, प्रति ३०००

सन १९२८


किंमत नऊ आणे

प्रकाशक

माधव रामचंद्र जोशी, बी. ए.

घर नं. २९९, नारायण पेठ, पुणें.





मुद्रक

अनंत सखाराम गोखले,

'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें शहर.

अनुक्रमणिका

भाग पहिला

भाग दुसरा

भाग तिसरा

प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तक सन १८८५ सालीं पुणें, न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकविण्यासाठीं तयार केलें. तेव्हांपासून हें त्या शाळेंत उपयोगांत आहे. सन १८९९ सालीं हें शाळाखात्यानें मंजूर केल्यापासून दुसऱ्या अनेक शाळांत चालू आहे. हें प्रथमतः तयार केलें तेव्हां नवीन कविता फारशी प्रचारांत नव्हती, यामुळें बहुतेक उतारे जुन्या कवितेचेच घेतले होते. अलीकडे नवीन कविता लोकप्रिय झाल्यामुळें नवीन कवींचे उतारे मागील आवृत्तींत जास्त घातले. ही आवृत्ति मागील आवृत्तीचें केवळ पुनर्मुद्रण आहे. हींत कांहीं कमीजास्त केलें नाहीं.

पुणें,
जून १९२८. }

मा. रा. जोशी.

पद्यसमुच्चय

भाग पहिला

१ विश्वमंदिर

[विश्व हेंच परमेश्वराचें मंदिर म्हणजे देऊळ आहे. जे कोणी ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि धरितात, त्यांस या विश्वमंदिरांतच परमेश्वर दिसत असतो; व परमेश्वरनिर्मित जे अनेक सृष्टिशोभेचे प्रकार, त्यांचे योगानें त्यांचे मनांची तृप्ति होते. या मंदिरांतील अतिरमणीय शोभा दाखविण्यास तत्त्ववेत्ते हेच दूत दारांत उभे आहेत,ते लोकांचा आंत प्रवेश करून देतात. असा यांत भावार्थ आहे.]

श्लोक

ईशें विश्व-विशाल-मंदिर पहा ऐसें कसें निर्मिलें !
शोभा दाखविण्यास हेर रुचिरीं द्वारीं उभे ठाकले;
येती प्रेक्षक जे, तयांस बघुनी ते बाहती सत्वरीं:—
" या हो या, जन हो, विलोचनसुखा घ्या, या शिरा मंदिरीं ! १
या हो आंत, पहा चमत्कृति किती, द्या इंद्रियां तर्पण,
नेत्रां चित्रमनोहराकृति, तसें श्रोत्रांस मंजु स्वन;
द्वारीं मात्र करा प्रणाम शिरसा त्या ईश्वरातें अधीं,
जो दे सर्व तुम्हां, तया स्तुतिसुमां अर्पा तुम्ही, हो सुधी ! " २

येणेंपरी नमुनियां जन आंत जाती,
विश्वास पूर्ण धरुनी बहु सौख्य घेती;
वाहे समीर, मकरंद हरी फुलांचा
संताप सर्व शमवी ज्ञणिं मानसींचा. ३

श्रवण, नयन धाले, लोटला मोदपूर,
हृदयिं विकसलें तें प्रेम विश्वास थोर;
नयनगतिहि जेणें बद्ध केली पुरा तें—
पटल गळुनि जातें; गूढ ना तैं नरातें. ४
जें अगम्य मुनिदृष्टिस होतें,
विश्वकर्तृमुख आज दिसे तें:
प्रीतिचा प्रभु असेचि भुकेला,
हा प्रसाद मनुजांवरि केला. ५
जे न वंदिति पदांस विभूच्या,
भावही न धरिती वरि त्याच्या,
ते जरी प्रविशती सदनांत,
त्यांस हा सुखनिधी न मनांत.

—महाजनी

---

२ विद्याप्रशंसा

[विद्येच्या योगानें मनुष्यास कोणते कोणते लाभ होतात, हें यांत वर्णिलें आहे. ही कविता कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं लिहिलेली आहे.]

आर्या

विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजीं,
न दिसे एकहि वस्तू विद्येनेंही असाध्य आहे जी. १
स्वाभाविकां गुणांहीं केवळ बघतां समस्त सृष्टींत,
प्राणिगणीं मनुजापरि पंगू एकहि न येच दृष्टींत. २
सिंह-व्याघ्र-गजादिक असती मनुजाहुनी बळें अधिक,
भासे जयांपुढें हा बलहीन क्षुद्र, जेविं कीं मशक. ३
देहाच्या सौंदर्यें, स्वैरगतीनेंहि पाहतां दिसती—
पक्षी लक्षावधिही, जे श्रेष्ठ नराहुनी बहुत असती. ४

राजा भर्तृहरि म्हणे, 'नर विद्याहीन पशुच जाणावा',
परि मज वाटे, तो पशु-पेक्षांही फार नीच समजावा ! ५
विद्याबलसम अढळे न दुजें बल कोणतेंहि या लोकीं,
तीनें निजप्रभावें वश केलें सकल विश्व, अवलोकीं ! ६
क्षुद्रां पशुपक्ष्यांची काय कथा ? पांचही महाभूतें—
ज्ञानबळें आकळुनी, केलें मनुजें स्वदाससम त्यांतें. ७
विसरुनि परस्परांचा विरोध, जल-वन्हि सेविती त्यातें,
दासापरि वश होउनि करिती त्याच्या समस्त कृत्यांतें. ८
त्याचीं वस्त्रें विणिती, रथ ओढिति, लोटतीहि नौकेतें,
बहु सांगणें कशाला ? करिती तो सांगतो तयां तें तें. ९
मोठे मोठे तरुवर मोडी, फोडी तशा शिलाराशी,
विद्युल्लता नरें ती केली संदेशहारिका दासी. १०
विद्येच्या सामर्थ्यें केला रवि चित्रकार मनुजानें,
होउनि अंकित वायुहि तुष्ट करी त्यास सुस्वरें गानें. ११
व्यासादिक आद्यमुनी, कवि अर्वाचीन सर्व थोर तसे,
म्हणती एकमतें कीं, 'धन विद्यासम नरास अन्य नसे'. १२
देउनि किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे,
ऐसें एकच विद्याधन; अद्भुत गुण न हा दुज्यांत वसे. १३
न बलात्कारें राजा, न चोर कपटें जया हरायास—
होई समर्थ, ज्याच्या अल्पहि संरक्षणीं न आयास. १४
नानाविध रत्नांचीं कनकाचीं असति भूषणें फार,
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार. १५
या साऱ्या भुवनीं हित-कर विद्येसारखा सखा नाहीं;
अनुकूळ ती जयाला नित्य, तयाला उणें नसे कांहीं. १६
गुरुपरि उपदेश करी, संकटसमयीं उपायही सुचवी;
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथा पुरवी. १७

कांतेपरी निरंतर हृदयातें हर्षवूनियां रिझवी;
आनंदसागरीं मन बुडवुनि चिंताज्वरास ती विझवी. १८
जी करि मर्त्य नराला अजरामर, ती सुकीर्ति मिळवाया-
विद्याच साधन खरें, पुढें तिच्या अन्य साधनें वायां. १९
भूमंडळीं पसरलें यश रामयुधिष्ठिरादि राजांचें;
परि तें फळ वाल्मीकि-व्यासांच्या प्रौढवाणिचें साचें. २०
नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य, हें वचन--
सत्य असे तरि विद्यादानाशीं तुल्य पुण्य आणिक न. २१
ऐश्वर्य-बल-धनादिक सौख्यें प्रसवे समस्त जी कांहीं,
ती विद्या जो देई तेणें वद काय तें दिलें नाहीं ? २२
यापरि सकळ सुखें जी देई, दुःखें समस्त जी वारी;
त्या विद्यादेवीतें अनन्यभावें सदा भजा भारी. २३

—पद्यरत्नावलि

३ संस्कृत व मराठी

[आमच्या विद्वान् लोकांना हल्लीं जसा स्वभाषेविषयीं कंटाळा वाटत असतो, तसा पूर्वीं संस्कृत पंडितांनाही वाटत असे. प्राकृतांत कोणीं ग्रंथरचना केली असतां त्या वेळचे शास्त्रीपंडित तिचा तिरस्कार करीत. या गोष्टीला उद्देशून कवि म्हणतो, कीं, सर्वज्ञ पंडित संस्कृत ग्रंथ वाचतील; पण आमच्यासारखे अज्ञ, साधे लोक, हे देशभाषेंतील ग्रंथावर निर्वाह करितील. कारण परमेश्वरास दोन्ही सारखींच.]

ओंव्या

सुरस, सुंदरी, पवित्रसृष्टी । पक्वान्नें निपजवूनि पाठीं,
संस्कृत-शब्द-सुवर्ण-ताटीं । श्रेष्ठांश्रेष्ठां वोगरिलीं. १
तोंचि रसायन दुर्बळपणीं । महाराष्ट्रभाषा-रंभा-पर्णीं,
वाढिलें, तरी भुकाळू-जनीं । न सेविजे किमर्थ ? २

समर्थपणें कविपंडितीं। सर्वज्ञतेच्या रत्नदीसी,
निर्गुण निर्विकार पशुपती। कनक-कमळीं अर्चिजे. ३
तेथें भावार्थी मी दुर्बळ। धत्तूर-पुष्प माझे बोल,
अल्पमतीचेनि मोल। काढवितीं ते केवीं. ४
तथापि दोहीं ठायीं सरिसा। मोह कराल हा भरंवसा,
कां सानथोर महेशा। भजतां असे कडसणी ? ५
आणि ईश्वरस्वरूपीं डोळस। त्यांसी वर्णावर्णीं द्वेष—
नुपजे, जैसा सूर्य-प्रकाश। नेणे कदां तमातें. ६
तेवीं अर्थीं घालितां दृष्टी। न म्हणे संस्कृत-मराठी,
रत्न-कुंभीं कीं मृत्तिका-घटीं। गंगोदक सारिखें. ७
व्यास-वचन-इक्षु-दंडू। गाळुनी सुरस सारांश गोडू,
देशभाषा वळिले लाडू। नाबदेचे आवडी. ८
ते जैसे सुज्ञीं न सेवणें। तैं आग्रहावांचून काय म्हणणें,
कळंकरेखेस्तव चांदणें। काय चकोरीं वाळिजे ! ९
व्यास-ग्रंथ-गिरीचें सोनें। संस्कृत-खोटिये गाळूनि मनें,
देषभाषां घडिलें लेणें। साहित्यरत्नीं सुजडित. १०
तें लेववितां कर्णभूषण। कां हो परते करावे कान,
श्रोते हो, तुम्ही विचक्षण। निर्मत्सर विचारा ! ११

—मुक्तेश्वर

---

४ मनास बोध

[हा उतारा रामदास स्वामींच्या प्रसिद्ध मनाच्या श्लोकांपैकीं आहे. यांत मनाचे द्वारें लोकांस बोध केला आहे. या काव्यांचे संबंधानें न्यायमूर्ती रानडे यांनीं एकदां असें म्हटलें होतें—" जिवंत वाणीनें श्रोत्यांचें मन तेव्हांच वळतें, उशीर लागत नाहीं; आणि तशी वाणी समर्थांची होती म्हणून तिनें तें कार्य झालें. अशी जिवंत वाणी मुखावाटे निघण्यास अंतःकरण शुद्ध, पवित्र आणि

प्रेमळ पाहिजे. समर्थांनीं भिक्षा मागितली, त्यांस छत्रपतींनीं राज्याची भिक्षा घातली; आणि इतर भिक्षेकरी कंठशोष करितात, त्यांस मूठभर धान्य मिळण्याची मारामार पडते. हें सगळें जिवंत वाणीचें चरित्र आहे. समर्थांच्या श्लोकांत वाणी खरोखर जिवंत आहे-मूर्तिमंत आहे. तिला वाचा फुटलेली आहे."]

श्लोक

मना सज्जना, भक्तिपंथेंचि जावें,
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें;
जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें,
जनीं वंद्य तें सर्वभावें करावें. १
मना, वासना दुष्ट कामा न ये रे !
मना, सर्वथा पापबुद्धी नको रे;
मना, सर्वथा नीति सोडूं नको हो,
मना, अंतरीं सारवीचार राहो. २
मना, पापसंकल्प सोडोनि द्यावा,
मना, सत्यसंकल्प जीवीं धरावा;
मना, कल्पना ते नको वीषयाची,
विकारें घडे हो जनीं सर्व छी छी ! ३
नको रे मना, क्रोध हा खेदकारी,
नको रे मना, काम नानाविकारी;
नको रे मना, सर्वथा अंगिकारूं
नको रे मना, मत्सरू, दंभ—भारू. ४
मना, श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें,
मना, बोलणें नित्य सोशीत जावें;
स्वयें सर्वदा नम्रवाचे वदावें,
मना, सर्व लोकांसि रे नीववावें. ५

तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी,
मना सज्जना, हेचि क्रीया धरावी;
मना, चंदनाचेपरी त्वां झिजावें,
परी अंतरीं सज्जनां नीववावें. ६
जगीं सर्वसूखी असा कोण आहे,
विचारीं मना, तूंचि शोधोनि पाहें;
मना, त्वांचि रे पूर्वसंचीत केलें,
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें. ७
मरे एक, त्याचा दुजा शोक वाहे,
अकस्मात तोही पुढें जात आहे;
पुरे ना जनीं लोभ रे, क्षोभ होतो;
म्हणोनी जगीं मागुतीं जन्म घेतो. ८
मना, सर्वथा सत्य सोडूं नको रे,
मना, सर्वथा मिथ्य मानूं नको रे,
मना, सत्य तें सत्य, वाचे वदावें,
मना, मिथ्य तें मिथ्य, सोडून द्यावें. ९
समर्थाचिया सेवका वक्र पाहे,
असा सर्वभूमंडळीं कोण आहे ?
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. १०
असे हो जया अंतरीं भाव जैसा,
वसे हो तया अंतरीं देव तैसा;
अनन्यास रक्षीतसे चापपाणी,
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी. ११
मदें, मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी,
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी,

सदा बोलणें नम्रवाचा, सुवाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ! १२
अती लीनता सर्वभावें स्वभावें
सदा सज्जनांलागिं संतोषवावें;
तयाकारणीं सर्व लावीत जावें,
सगूणीं अतीआदरेशीं भजावें. १३
विवेकें क्रिया आपुली पालटावी,
अतीआदरें शुद्धबुद्धी धरावी;
जनीं बोलण्यासारखें चाल बापा !
मनीं कल्पना सोड, संसारतापा. १४
सदा सर्वदा सज्जनांचेनि योगें,
क्रिया पालटे, भक्ति–भावार्थ लागे;
क्रियेवीण वाचाळता ते निवारा,
तुटे वाद संवाद तो हीतकारी. १५
जयाचेनि संगें समाधान भंगे,
अहंता अकस्मात येऊनि लागे;
तया संगतीची जनीं कोण गोडी,
जिये संगतीनें मना राम सोडी. १६
मना, संग हा सर्व सोडोनि द्यावा,
अती–आदरें सज्जनांचा धरावा;
जयाचेनि संगें महादुःख भंगे,
जगीं साधनेंवीण सन्मार्ग लागे. १७
धरीं रे मना संगती सज्जनांची,
जिणें वृत्ति हे पालटे दुर्जनांची;
वळे भाव हा, वृत्ति सन्मार्गिं लागे,
महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ! १८

मना, संग हा सर्व संगासि तोडी,
मना, संग हा मोक्ष तत्काळ जोडी;
मना, संग हा साधना शीघ्र जोडी
मना, संग हा द्वैत निःशेष मोडी. १९
मना, वासना वासुदेवीं असों दे,
मना, कामना कामसंगीं नसों दे;
मना, कल्पना वाउगी ते न कीजे,
मना, सज्जना, सज्जनीं वास्ति कीजे. २०

—रामदास

---

५ लेकरांची जिज्ञासा

[जगांतील प्रत्येक वस्तु पाहून "हें काय ?" "हें कुठलें ?" वगैरे जाणण्याची जिज्ञासा लहान मुलास होते, व तो तसे प्रश्न वडील माणसांस करितो. अशा वेळीं वडील माणसांनींही त्याला खरें ज्ञान होईल अशीच माहिती सांगितली पाहिजे; नाहीं तर कांहीं तरी उत्तर दिल्यानें सरळ मनानें मूल तेंच खरें मानीत राहतें व त्यास वस्तूचें यथार्थ ज्ञान होत नाहीं.]

श्लोक

ईषत्प्रफुल्लसुमना करिं बाळगावें,
किंवा मृदुस्मित मुलाप्रति खेळवावें;
कीं तन्मनःकुसुम रम्य करीं धरावें,
उत्फुल्ल शिक्षणसुधाकिरणीं करावें. १
रेणूहुनीहि अति सूक्ष्म बियांत राही,
विस्तीर्ण पिप्पल जयासम वृक्ष नाहीं;
या अल्प मुग्ध शिशुच्या लघुचेतसांत,
नांदे तसाच गुण-वृक्ष जया न अंत ! २

हा बाळ पाहुन अनेकविधां पदार्थी—
नाचे, हंसे, पुसतसे वडिलांस अर्थी;
जिज्ञासु हा सकल विश्व शिकावयाला,
तो धन्य ! तो सुकृति ! जो शिकवील याला. ३
ही अल्पशी निरखुनी हंसतो शलाका,
छायेस पाहुन धरी मनिं फार धाका;
हा पांखरांसह करी मधु भाषणाला,
तो धन्य ! तो सुकृति ! जो शिकवील याला. ४
गर्जे नभांत घन ऐकुन बाळ नाचे,
" हें काय हो ? " पुसुनियां वडिलां सुवाचे;
" सासू तुझी दळण हें दळिते मुला रे ! "
अन्याज तें मन गणीत खरेंच सारें ! ५
" हें काय ? " देव वडिलें म्हणतात " बाऊ, "
तें चित्त निर्मळ धरीत तसाच भावू;
वाढो सुबुद्धिलतिका, अथवा बिचारी,
हो जीर्ण अंगिंच तरी न कुणी विचारी. ६
हें फूल पाहत असे उमलावयाला,
हें चंद्रबिंब चढतें उदयाचलाला;
बाहेर अंकुर निघों बघतो द्रुमाचा
होतो विकास शिशुच्या मृदुमानसाचा. ७
जो होउनी अनिल हें फुलवील फूल,
सारील दूर शशिचें घन मेघजाल;
कीं अंकुरास जल जो पुरवील माळी,
तो धन्य यत्करगता शिशुबुद्धि झाली. ८
सारें नवीन शिशुला बहु दर्शनीय,
त्या कौतुकास दुसरी सरि लोकिं काय ?

"हें काय हो?" सतत हीच करीत पृच्छा,
तो धन्य जो करिल पूर्ण तदीय इच्छा. ९
जरि असेल रसज्ञपणा पुरा,
जरि परोपकृतीच मनोहरा;
जरि असे चतुरत्व, तरी मुला
शिकविण्यासम छंद नसे भला! १०

—रे० टिळक

---

६ राम सीतास्वयंवरास जातात

[सीतेचा बाप जनकराजा याचे घरीं शिवाचें धनुष्य होतें. तें भलत्या कोणास उचलतां येण्यासारखें नव्हतें. सीतेनें लहानपणींच त्याचा खेळावयास घोडा केला होता. म्हणून जनकराजानें पण केला होता कीं, हें चाप उचलून जो सज्ज करील त्यासच सीता द्यावयाची. विश्वामित्रास, राम अवतारी पुरुष आहे व तो तें धनुष्य सहज उचलील, हें ठाऊक होतें. म्हणून तो त्यास सीतेच्या स्वयंवरार्थ घेऊन आला आहे.]

श्लोक

या परिचे भव-ताप-विमोचन—
चापशरांकित भव्यमती—
पाहुनि, सर्व नृपांहुनि उत्तम,
लाहुनि तोष, पुसे नृपतीः—
'कोण असे महि-पालक-बालक—
हे जनचालकसे सुचले!
सांग मला सहसागमनाशय,
चांग मनासि मला रुचले!' १
हांसोनियां नृपसभे मुनिराज बोले,—
स्वानंद-संभ्रम-भरें हृदयांत डोले;

'हा जी नृपा ! बहुत भाग्य जगीं उदेलें
यांच्या गुणें दुरित, दैन्य, समस्त गेलें. २

साकेताधिप-बाल हे, रणतटीं रक्षोगणा काल हे,
दीनांचे कनवाळ हे प्रतिपदीं, राया ! जगत्पाल हे;
पुर्ते हे शुभलक्षणी, रत सदा धर्मे करूं रक्षणीं,
आनंदाब्धि अनुक्षणीं भरतसे यांच्या कृपा-ईक्षणीं ! ३

यांहीं दुःसह ताटिका निवटिली; निष्कंटका मेदिनी--
केली काननिं; यांचिया शर-गती पाताळ-भू-मेदिनी;
तो मारीच नभीं झुगारुनि, शरें केला सुबाहू पुरा,
नेला सिद्धिस यज्ञ, ते प्रवर हे आले तुझ्याही पुरा. ४

चापा नृपा, आणि महोत्सवातें—
आले पहाया, बल-वैभवातें;
मार्गीं अहिल्या विपिनांत रामें—
केली शिला-मुक्त मनोभिरामें'. ५

परिसुनि मन रायें, दाटलें रामपायीं,
म्हणत मनिं 'करावा सोयिरा हा उपायीं;
कठिण तरि पणाचा व्यर्थ संकेत केला,
रघुवर नवरा हो धन्य या कन्यकेला !' ६

भूपांतें निरखी दिठीं निज-सखी-संगें, रमेसारखी—
शोभे तेचि उखी विखी-शशिमुखी माडीवरी पारखी;
झाली बुद्धि फिकी, नृपाकृति निकी, मानीच ना आन कीं,
लक्षी राघव कौतुकीं, तंव तुकी माथा मनीं जानकी ! ७

—आनंदतनय

७ सत्याचा महिमा

ओंव्या

निर्जळीं शतकूपखनन। तें एका वापिकेसमान
शतभरी वापिकांचें पुण्य। एकीं यज्ञीं पाविजे. १
अश्वमेधशतांचें पुण्य। एकीकडे सत्य वचन,
तुळितां सत्य आगळें जाण। मेरु-सर्षप-दृष्टान्तें. २
चहूं वेदींचें साङ्ग ज्ञान। सकळ तीर्थांचें अवगाहन,
त्याशीं तुळितां यथार्थवचन। सत्य अगणित आगळें. ३
कोटी पुण्यें जोडिलीं यत्नीं। तीं जळती एके असत्यवचनीं
जैसा पावक स्फुलिंगकणीं। नाशी कर्पूरगिरीतें. ४
सत्यापरता नाहीं धर्म। सत्य तेंचि परब्रह्म,
सत्यापाशीं पुरुषोत्तम। सर्वकाळ तिष्ठत. ५
सत्यें नेमिला न चळे नेम। त्यासी वोळगे मोक्ष-धाम,
घोर संसार-भयाचें नाम। स्पर्शों न शके कल्पांतीं ६
असत्य तेंचि पैं पातक। असत्य तोचि महानरक,
असत्याचेनि संगें दुःख। अनंत जन्मीं भोगिजे. ७
सत्यामृताची कनकवाटी। जोडिली न सांडे भूतटीं
असत्यबुद्धीची नरोटी। पवित्र हातें नातळे. ८

—मुक्तेश्वर

---

८ यक्षाचें घर

[एक यक्ष आपल्या कामांत चुकल्यामुळें त्यास यक्षांचा राजा कुबेर यानें दूर राहण्यास पाठविलें होतें. त्यानें मेघास आपला दूत कल्पून त्याच्याबरोबर घरीं स्वस्त्रीस निरोप धाडला. तेव्हां तो मेघाला आपल्या घराची खूण सांगत आहे.]

साक्या

त्या नगरींत धनेशगृहाच्या उत्तरेस दिसतें जें–
दुरूनि सुंदर मंदिर मोठें, तेंच जाण घर माझें. १
नानारत्नीं खचित जयाचें द्वार उंच बहु साजे,
अपूर्व शोभा पाहुनि ज्याची इंद्रचापही लाजे २
असे जवळ त्या एक नवीनचि कल्पवृक्ष सुकुमार
थोर फुलांचे गुच्छ येउनी जो लवलासे फार; ३
प्रिया करांनीं नित्य घालुनी पाणी सायंकाळीं–
अतिकनवाळूपणें जयाला मुलासारिखा पाळी. ४
आहे सुंदर तळेंहि तेथें लहानसें, ज्यामाजीं–
नित्य शोभती बहुत फुलोनी सुवर्णकमळें ताजीं. ५
पांचेच्या पायऱ्या सभोंतीं असति ज्यांत उतराया,
जयांत नेमस्तचि जल असतें क्रीडा स्त्रीस कराया. ६
वर्षाकाळहि येतां तेथें हंस सुखें वसतात़ी,
जवळहि असतां मानस, तिकडे कधींहि ते नच जाती. ७
त्याच तळ्याच्या कांठीं आहे क्रीडापर्वत, ज्याचें—
नीळमण्यांचें चमके सुंदर उंच शिखर तें साचें. ८
ज्याच्या भोंतीं सुवर्णकदली झळकति चित्रविचित्रा,
विजेसहित तुज देखुनि मजला आठवतो तो, मित्रा ! ९
मध्यें मंडप मधुमालतिचा गुलाब शोभति भोंतीं,
काय वर्णुं तीं सुखें, त्या स्थलीं जीं अनुभविलीं होतीं ! १०
त्या कुंजाच्या जवळ बकुळिचा एक सुबक तरु आहे,
तसा तांबडा अशोक, चंचलपल्लव, तेथें पाहें. ११
असे मांडला पांचमण्याचा पिंजरा तेथें थोर,
वसे त्यामधें कनकयष्टिवर रात्रीं अमुचा मोर. १२

प्राणाची मम धनीन शिकवी नाचायास जयातें,
रत्नकंकणीं-युक्त करांनीं धरूनियां तालातें. १३

—कृ. शा. चिपळूणकर. (पद्यरत्नावलि)

---

९ सावधपणा

[हा उपदेश श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं छत्रपति श्रीशिवाजी-महाराज यांची प्रथमतः भेट झाली तेव्हां त्यांस केला, अशी आख्यायिका आहे. हा किती चांगला आहे! हा मुलांनीं पाठ करून ध्यानांत धरावा व तदनुरूप वर्तन करण्याचा यत्न करावा.]

ओंव्या

कोणाचा भरंवसा न धरावा। आपुला आपण विचार पहावा,
तकवा उदंड धरावा। हाही एकविषयीं. १
देहदुःखें कद्रों नये। उदंडचि करावे उपाये,
मग सर्व सुखास काय। उणें आहे? २
एकांतीं चाळणा करावी। धारणा उदंड धरावी
नाना विचारणा करावी। अरि-मित्रांची ३
प्रयत्नीं चुकों नये। सुखवासी कामा न ये,
सुचावे नाना उपाये। अनेकविषयीं. ४
धुरेनें धीर सोडूं नये। मुख्य प्रसंग चुकों नये,
उद्योग-रहित कामा न ये। पशू जैसे. ५
उपाधीस कंटाळला। विचाराचा आळस आला,
म्हणजे जाणावा चेवला। बुद्धीपासूनी. ६
खबरदारी आणी वेगीं। तेणें सामर्थ्य चढे अंगीं,
नाना प्रसंगें कार्यभागीं। अंतराचि न पडे. ७
कार्यकर्ते दुरी करावे। प्रसंगें सर्वेचि हातीं धरावे,
परंतु शोधोनि पहावे। कपटाविषयीं. ८

जेथें बहु विचार। तेथें ईश्वर-अवतार,
मागें झाले थोर थोर। धके चपेटे सोसोनी. ९
आपल्या मनासी रोधावें। परांतर शोधावें,
क्षणक्षणां सांभाळावें। बदलेल म्हणुनी. १०
पाहिलेंचि पाहावें। केलेंचि करावें,
शोधिलेंचि शोधावें। राजकारण. ११
इशारतीचें बोलूं नये। बोलायाचें लिहूं नये,
लिहावयाचें सांगूं नये। जबाबीनें. १२

—रामदास

---

१० नळराजा

दिंडी

चौगुणीनें जरि पूर्ण शीतभानू,
नळा ऐसा तरि कलानिधी वानूं;
प्रतापाचा जो न मावळे भानू,
तया सारीखा दुजा कोण मानूं? १

श्लोक

चंद्रासि लागति कळा, उपराग येतो;
गंगेसि भंग, बहु पाणउतार होतो;
जें चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला?
नाहीं समान नळराज महायशाला. २

वाजींचें मन जाणता, सकळही राजी शिपाई जया,
याजी होउनियां द्विजांसि म्हणतो, 'या जी धनें घ्यावया!'
त्याजी जो धनदापरी, सुकृत जें त्या जीव ऐसें गणी,
गाजी तो नळ भूप, हूप धरुनी गा जी गुणींच्या गणीं. ३

दिंडी

लोकबंधू जो होय रवी-ऐसा,
कुवलयाला जो सुखद चंद्र जैसा;
साङ्ग नोहे तो कुसुमचाप तैसा—
निषधरायाशीं तुल्य-रूप कैसा ? ४

श्लोक

कदा नेणों वोढी शरधितुनि काढी शर कदा,
कदा धन्वीं जोडी, वरिवरिहि सोडी तरि कदा,
विपक्षाच्या वक्षावरि विवर-लक्ष्यास्तव रणीं—
कळे राजेंद्राची त्वरित शर-संधान-करणी. ५
धाले धनी पुढिल याचक या नळाचे;
येतां फिरोनि समुदाय पथीं तयांचे,
मागावयास जन मागिल देखियेले,
त्यांहींच ते सकळ पूरितकाम केले ! ६

—रघुनाथपंडित

११ शर्मिष्ठा व देवयानी यांचें भांडण

[शर्मिष्ठा ही दैत्यांचा राजा वृषपर्वा म्हणून होतां त्याची मुलगी, व देवयानी ही त्याचा गुरु शुक्राचार्य याची मुलगी. एकदां या मुली जलक्रीडा करून पाण्याबाहेर आल्या, तों देवयानीचें वस्त्र शर्मिष्ठा चुकून नेसली. यामुळें दोघींचा या आर्यांत वर्णिल्याप्रमाणें तंटा होऊन शर्मिष्ठेनें देवयानीस एका विहिरींत ढकलिलें हें भांडण देवांचा मुख्य इंद्र यानें मुद्दाम लाविलें.]

आर्या

शर्मिष्ठा कविजांबर नेसे झडकरिं, कळों न वासव दे;
तों तीस देवयानी ओढुनि तत्परिहितात्मवास वदे. १
" असुरसुते, मच्छिष्या होउनि मद्वस्त्र नेसशी कां गे ?
बहु मातलीस ऐसें मज समुदाचारलोप हा सांगे ! २

मर्यादा पाळावी, निज-शिव गुरुचेचि पाय; रीतीतें-
सोडूं नये, म्हणति कवि साधुपदाचीच पायरी तीतें." ३
शर्मिष्ठा तीस म्हणे, " बैसावें जैं सभेंत मत्तातें,
त्वत्तातें व्हावें तैं बंदी, तूं विसरलीस मत्ता तें ! ४
सिंहासनीं विराजे मद्गुरु, न सहस्रकरहि, परि सविता;
बैसे खालें त्वद्गुरु कवि, कविता करुनि त्यासि परिसविता.
माझी न पाविजे त्वां, मत्ताताची तुझ्या न सरि तातें;
जें जन्हुकन्यकेचें भाग्य, न पावेल अल्प सरिता तें ! ६
तूं तों कन्या, जो स्तुतिकर याचक, दान घे सदा, त्याची;
मी कन्या स्तव्याची, भव्याची, सर्वसेव्यदात्याची ! ७
होती महेंद्रनयनें पाहुनि राजेश्वरा जया चकितें,
मत्तातभाग्य कैचें त्वत्ताता भिक्षुकासि याचकि, तें ? ८
मत्ताताची जी श्री, कीर्ति कवीला न येचि भिक्षुकि ! ती;
अमृतरसाशीं व्हाया सम माधुर्यें समर्थ इक्षु किती ? ९
राजसुतेचें यश जें तुज येइल काय गे दरिद्रे, तें ?
पाहसि विकावया तूं केशरमौल्यें कसें हरिद्रेतें ?" १०
निर्भर्त्सना करी बहु, संपादी द्वेष, पाप, गाढ कली-
करुनि, कविजेस कूपीं ती कोपाची महापगा ढकली. ११

—मोरोपंत

---

१२ एक अमेरिकन मुलगी

श्लोक

पाठीवरी रुळति धूसर मुक्त बाल,
जैसे गुलाब फुलले दिसतात गाल;
विस्तीर्ण हें निढळ पानच केवड्याचें,
जेथें सुभाग्य, मतिमत्त्व खुशाल नाचे. १

या केवड्यावर अली बसले मधून,
तैसेच हे कुरळ शोभति दोनतीन;
या रम्य वक्र भिंवया म्हणतात 'येथें-
थारा नसे कृपण दीन मनोरथातें !' २
साधें प्रसन्न मधु बाल्य करी विहार
नेत्रांत जें करि तयांप्रति लोल फार;
रत्ना ! तुझें हरपलें जणुं सर्व पाणी,
हीं रम्य दीर्घ नयनें गमतें बघोनी ! ३
हें वेत्र सुंदर दिसे मज, चारुतेचें,-
सारल्य अग्रनतिमान अपूर्व ज्याचें,
सोत्कंठ नासिक हिचें म्हणतें जगाला,
'आर्यान्वयोद्भव खरोखर रम्य बाला !' ४
किंचित् प्रभातसमयीं कळिनें फुलावें,
कीं अंतरंग लपवून पुढें करावें;
हें हांसरें मुख हिचें करि तीच लीला,
दावी पुन्हा लपविते रदनावलीला. ५
आरक्त ओष्ठ जणुं वेलच पोंवळ्यांचे,
तेही गमे विरमतील पुढें तयांचे;
किंचिद् विभक्त दिसती, जणुं सांगताती,
निश्चिंत निर्मल सुखी किति बालवृत्ति ! ६
वाटे उषाच हसते फिरते जगांत !
कीं स्फूर्ति हीच कविची मधुरूप घेत !
अव्याजता रसिकता जणुं मूल झाली,
स्वर्गांतुनी सहज भूवर आज आली. ७

—रे० टिळक

१३ रामशास्त्री यांनीं राघोबादादास सांगितलेलें प्रायश्चित्त

[नारायणराव पेशव्यास मारण्यामध्यें राघोबादादाचें अंग आहे, असा पक्का शोध रामशास्त्री यांनीं लाविला. राघोबानें आपला अपराध कबूल करून शास्त्रीबुवांस प्रायश्चित्त विचारलें. तेव्हां त्या परमनिःस्पृह गृहस्थानें हें प्रायश्चित्त त्यास सांगितलें:—]

श्लोक

" प्रत्यक्ष बंधुसुत राज्यपदार्थ मारी,
ऐसा न अन्य जगतीवर देहधारी;
कैसे तुम्ही विसरलां, जगदेकराया,
राज्यीं न वास तुमच्या मन घे कराया ! १
जें शास्त्र आजवर ऐकविलें तुम्हां मीं,
तें सर्व आजि दिसतें मजला निकामी.
अंधास दीप, बधिराप्रति गान झालें !
ऐसें अकर्म करणें मज भाग आलें. २
माता कष्टविली वृथा ! निजपिता तैसा स्वसंरक्षणीं,
खाया काळ भुईस भार जगलां, पापा कराया घणी;
प्रायश्चित्त तुम्हां दिसे मरणही माझे मतें तोकडें,
येवो राग न आपणांस, वदलों, जें वाटलें रोकडें ! " ३

—विनायक कोंडदेव ओक–पुष्पवाटिका

---

१४ भगवन्नामप्रताप

श्लोक

आकाशअंत न कळूनिहि अंतरिक्षीं—
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी;
नामप्रतापहि यथामति याच रीती—
सीमा न पावति, तथापि मुनींद्र गाती. १

न कळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें,
दुरित-तृणगृहाचें भस्म होणार तेथें;
मग समकरुणोचि आयती कृष्णदृष्टी—
भिजविल, करिते जे सर्वसृष्टच्यर्थ वृष्टी. २

न कळतां पद अग्निवरी पडे। न करि दाह असें न कधीं घडे;
अजित-नाम वदो भलत्या मिसें। सकळ पातक दग्ध करी तसें.

न जाणतहि ये मुखा हरि, तथापि पापें हरी;
स्मरोनि महिमा, स्मरे वदनिं तींच नामें जरी,
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनांचीं मनें,
विरक्त करितो हरी स्वगुण—नाम—संकीर्तनें. ४

न जाणे शिशू अग्निची शक्ति कांहीं,
जळो तूळ, इच्छा अशी ज्यास नाहीं,
तरी घालितां अग्नि, कार्पासराशी—
जळे, ये रिती नामही पाप नाशी. ५

आयासाविणही कथा परिसतां गोडी हरीच्या गुणीं—
ज्या चित्तीं उपजे, निघे सहज तो त्याच्या पदीं तत्क्षणीं;
ऐसे ये रिति अर्पिती सहजही जे एकदां त्या मना,
ते स्वप्नीं नयनीं न देखिति यमा, कैंच्या तयां यातना? ६

नामोच्चारणमात्र ज्यांस घडलें, ते पावले सद्गती;
सामर्थ्यें हरिचीं अशीं घडिघडी जे वर्णिती, ऐकती,
त्यांना जे उपजेल भक्ति हरिची, अत्यंत ते शुद्धता,
तैशी तीर्थतपोव्रतें न करिती, हें जाणिजे तत्त्वतां. ७

—वामन

---

१५ अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न

[कांहीं महारांचीं मुलें मजेनें खेळत होतीं. तेथें एक ब्राह्मण डौलानें

आला, आणि म्हणाला, "ए म्हारड्यांचे पोरांनो, चला बाजूला व्हा, मला वाट द्या." तेव्हां सर्व मुलें दूर पळालीं. पण एकजणमात्र तसाच तेथें उभा राहिला. तेव्हां त्या ब्राह्मणानें त्याच्यावर काठी उगारली, व तो म्हणाला, "गाढवा, दूर हो, नाहीं तर तुझी सावली माझ्यावर पडेल ना ! दूर होतोस,कां देऊं या काठीचा खाऊ ?" तेव्हां तो मुलगाही तेथून निघून आपल्या घरीं जाऊं लागला. वाटेनें त्याच्या मनांत आलें कीं, नुसती माझी सावली त्या ब्राह्मणावर गेली तर त्यांत मोठा दोष असा काय होतो ? घरीं जाऊन त्यानें आईला तोच प्रश्न केला. परंतु नेहमींची रूढि अंगीं खिळलेल्या त्या बाईच्या मनाला त्यांत कांहींच विशेष न वाटून ती म्हणाली, "आपण नीच लोक आहोंत. तेव्हां ब्राह्मण वगैरे लोकांस पाहिलें कीं, नेहमीं दूर होत जा." नेहमींच्या रूढीनें आपणास नीच म्हणवून घेण्यांतही त्या बाईला कांहीं वैषम्य वाटलें नाहीं.]

श्लोक

मुलें अंत्यजांचीं बिचारीं मजेनें,
पथाच्या अहो खेळताती कडेनें;
दुरूनी तिथे विप्र डौलांत आला,
वदे काय तो मुग्ध त्या बालकांला:— १
" सरा रे दुरी पोर हो म्हारड्यांचे !
चला ! खेळ हे मांडले डोंबलाचे !
निघा ! वाट द्या लौकरीं ब्राह्मणातें !"
पळालीं मुलें;—कोण राहील तेथें ? २
परी एक त्यांतील तैसाचि ठेला;
उगारी तधीं दुष्ट तो यष्टिकेला.
म्हणे—" गाढवा ! सावली ना पडेल ?
दुरी हो !—पहा हाच खाऊ मिळेल !" ३
तधीं बाळ तोही घराला निघाला,
मनीं आपुल्या या करी चिन्तनाला:—

" जरी त्यावरी सावली माझि गेली,
तरी काय बाधा असे ठेविलेली ?" ४
घरीं जाउनी तींचि माते विचारी;
वदे तेधवां त्यासि माता बिचारी:—
" अम्ही नीच बा, आणि ते लोक थोर;
तयां पाहतां होइजे नित्य दूर." ५
सुधें बोलली !—हें परी काय तीतें—
कळे कीं जगीं नाडुनीयां परांतें,
म्हणूनी करूनी अधीं घोर पाप,
जनीं गाजवी मानवी स्वप्रताप ! ६

—केशवसुत

---

१६ शिवधनुष्य-भंग

[मागिल उतारा सहावा पाहा. श्रीरामांनीं शिव-धनुष्य उचलिलें, व तें तो सज्ज करीत असतां भंग पावलें.

श्लोक

घातली सदृढ कास राघवें,
वंदिलें गुरुपदाब्ज लाघवें;
ठेविला वरद हस्त मूर्धनीं,
'पाव तूं विजय, चाप मर्दुनी!' १
जनकजा मिरवे उपरीवरी,
सहचरी वसनांचळ सांवरी;
सखि म्हणे, 'रघुवीर उभा असे,
धनुष मोडिल, संशय हा नसे !' २
ती भूमीस म्हणे, 'उमानि धनुषा, रामासि साह्या करीं.
शेषा, लोटिं शरासनासि, तपना, ओढीं सहस्रां करीं.

शंभू, कार्मुक आंवरीं दशभुजीं, पृष्ठीसि कूर्मा, धरीं;
चापा दिग्गज हो, धरा; विधि, तुवां होईं हळू तें करीं ! ३
तीर्थें, व्रतें, जप, पुरश्चरणादि दानें
उद्यापनादि हवनें, द्विज-भक्ति मानें,
साह्या करो सुकृत पूर्विल आजि मातें,
भंगो शरासन खरें रघुवीरहातें.' ४
नाना तिणें नवसिले सुर भूमिसाक्षी,
भंगावया धनुष ऊठित सर्वसाक्षी;
श्रीमूर्ति ते उभि असे भुपतींत देखा;
त्याच्या स्वरूपिं दुसरी करि कोण लेखा ? ५
केयूरांगद, कुंडलें. मनगटीं जांबूनदें कंकणें,
वांकी, तोडर गर्जती घनरवें, पादांबुजीं भूषणें;
सीता-चित्त-मयूर नृत्य करितो श्रीराम सर्वांपुढें,
धीरोदार उभा, प्रतापमहिमा नेणेति शास्त्रें मुढें ! ६
राजे-मानव देव-दानव-सभे नृत्यांगना नाचती,
वाद्यांचे घन घोष होति, अवघे रामाकडे पाहती;
नाना तें चतुरंग सैन्य परिघीं पाहों उभें ठाकलें,
विप्रांचे जयशब्द होति, अवघे चित्रोपमा थोकले. ७
उल्हासें चमकोनि जाय, धनुषापाशीं उभा राहिला,
सांगातें अवघे पुरोहित, पुढें श्रीराम तो एकला;
कोदंडासि सभेसमोर उजवें घालोनियां वंदिलें,
दोर्दंडें उचलोनियां चढविलें, कर्णान्त तें ओढिलें ! ८
रामानें, सहवर्तमान मुनिच्या, कोदंड उच्चालिलें;
राजे आणि विदेह-संशय-धियांसंयुक्त आस्फाळिलें;
सीता चित्त समेत ओढुनि, भृगूपुत्रादि साहंकृती—
त्यांचा दुर्मद, गर्व भंगुनि, धनूभृत्यक्तसर्वाकृती. ९

घोषें चाप कडाडलें, रघुपती कोदंड ओढी बळें,
तेव्हां कोटि कडाडले घन, विजा; कोदंडकोलाहलें—
सीमा सांडिति सिंधु, मस्तक तुकी शंभु स्वयें आपुलें;
ते सर्वे भुप रामशक्ति नयनीं देखोनि वेडावले ! १०

—विठ्ठल

१७ भीष्मार्जुनयुद्ध

[कौरवपांडवांचे युद्धांत श्रीकृष्णाची प्रतिज्ञा होती, कीं आपण शस्त्रधारण करणार नाहीं, फक्त अर्जुनाचें सारथ्य करूं. ही प्रतिज्ञा आपण कृष्णाला मोडावयास लावूं अशी भीष्मानें प्रतिज्ञा केली होती, व ती त्यानें स्वपराक्रमानें शेवटास नेली. अर्जुनास असा गर्व झाला होता, कीं आपल्यासारखा योद्धा नाहीं, तो गर्वही या प्रसंगीं श्रीकृष्णानें हरण केला आहे.]

श्लोक

श्रोत्रयुग्म परिपूत कराया—
सावधान, जनमेजय राया !
जो परेशरत, धन्य अहो तो,
गोष्पदोपम तया भव होतो ! १

प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरें 'युद्ध न करीं,
धरीं ना शस्त्रातें कदनसमयीं मी निजकरीं;
घडेना हें मिथ्या जरि तरि न मी भागवत रे'.
प्रतिज्ञेतें भीष्में मनिं अवधिलें या दृढतरे. २

पिता शंतनू, माय ज्याची नदी जे,
स्वयें शुद्ध ऐशास सन्मान दीजे;
असे गर्व तोही हरावा मनाचा,
मनींचा असा भाव त्या वामनाचा. ३

नृपा, ऐकिजे युद्ध देवव्रताचें,
गमे हेंचि साफल्य तूझ्या व्रताचें;

रथीं देखिले कृष्ण-कौंतेय दोघे,
म्हणे भीष्म, 'माझ्या शरातें यदो घे !' ४
भीष्माकडे रव भयानक दुंदुभीचा
होतां वदे तनय आनकदुंदुभीचा;
'दुश्चिन्ह आजि गमतें मज, सव्यसाची,
जाती शिवा अशिव हे अपसव्य साची !' ५
गर्वोक्ति फाल्गुन वदे, 'जगदेकराया,
आहे मशीं कवण तो झगडा कराया ?
म्यां काळखंज वधिले अतुलप्रतापी,
पौलोमही असुर, गो-सुर-विप्र-तापी !' ६
पितामह वदे तया, 'प्रबळ तूं पृथानंदना,
रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना;
स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तूं रे नवा,
भिडें रणधुरंधरा, जय घडो सुखें वा न वा !' ७
पारिक्षिता, मग शरासन पांडवानें
ओढूनिया हुतवहार्पितखांडवानें,
तो भीष्मदेह खचिला शरतांडवानें,
ज्याच्या क्रिये सकळ पन्नमवांड वाने ! ८
गांगेय कोपा चढला कसा रे,
ज्या मानिती हाचि कृतांत सारे;
गर्जोनिया सिंहरवें जयातें
पाहे, जणों मारिल आज यातें ! ९
'त्वां काय कर्म करिजे लवुलेंकरानें',
बोलूनिया मग धनू धरिलें करानें;
तों व्यापिलें सकळ सैन्य महाशरांनीं,
ग्रीष्मीं जसा पतित होय हुताश रानीं. १०

तो स्तोम येतां बहुसायकांचा,
झालाचि पार्थव्यवसाय कांचा;
कांचावाला वीर, पुढें धसेना,
झाली, नृपा ! सर्व भयांध सेना. ११
पुष्पवर्ण नटला पळसाचा,
पार्थ सावध नसे पळ साचा;
पाहिलें जंव निदान तयाचें,
तों दिसे वदन आनत याचें. १२
प्रतोद मग ठेविला, उतरला रथाधःस्थळीं,
म्हणे, 'प्रबळ भीष्म हा, जय घडे न या दुर्बळीं',
करीं कमलनेत्र तो प्राथित चक्र तें स्वीकरी,
प्रमोद यमनंदना बहु, तया यशस्वी करी. १३
असा येतां देखे रथनिकट तो श्यामल हरी,
नृपा, गांगेयाच्या हृदयिं भरल्या प्रेमलहरी;
शरातें, चापातें त्यजुनि वदला गद्गदरवें,
" जगन्नाथें केलें मज सकल लोकांत बरवें ! १४
ये रथावरि झणीं यदुराया !
खड्ग देइन विकोश कराया;
तोडिं मस्तक, पडो चरणीं या,
धन्य होइन तदाच रणीं या. १५
श्रीमाधवावांचुनि आनदेवा—
भजें, तरी हो मज आण, देवा !
तुझीच कीं वाहतसें हरी रे,
मिथ्या, झडो हे तरि वैखरी रे. १६
मारावें मजला असेंच असलें चित्तीं तुझ्या केशवा,
तैं मातें मग कोण रक्षिल पहा, विश्वेश नाकेश वा;

हा मुख्यार्थ, जनार्दना, मज गमे, भक्तप्रतिज्ञा खरी,
कीजे, सर्वजनांत होइल मृषा, हो आपली वैखरी!" १७
हें भीष्मवाक्य परिसोनि जगन्निवासें,
केलें विलोकन मृदुस्मित पीतवासें;
वेगें फिरोनि चढला मग तो रथातें,
पार्थाचिया पुरविणार मनोरथातें. १८

—वामन

---

१८ भीम-जरासंध-युद्ध

[श्रीकृष्ण व पांडव यांस जरासंधाला जिंकावयाचें होतें, म्हणून श्रीकृष्ण भीमार्जुनांना घेऊन ब्राह्मणवेषानें जरासंधाचे घरीं गेला. हा जरासंध मोठा पराक्रमी होता व त्यास युद्धांत राजरोसरीतीनें जिंकणें कठीण होतें; त्यास जिंकल्याखेरीज तर धर्माचें राज्य निष्कंटक होत नव्हतें व त्यास सार्वभौमत्व मिळत नव्हतें; म्हणून कृष्णानें त्यास एकट्यास गांठून भीमाकडून मारविलें. आधुनिक काळांत शिवाजीनें आपल्यास वश न होणारा जावळीकर चंद्रराव मोरे यास असेंच मारविलें, व कंटक काढून टाकला. ही युक्ति शिवाजीस कृष्णाच्या जरासंधवधावरून सुचली असेल, यांत शंका नाहीं.]

ओंव्या

कंसारी संसार-गज-केसरी। हांसोनि बोले श्रीकृष्ण शौरी,
" पांडुपुत्र हे निर्धारीं। भीमार्जुन जाण पां. १
मागें अपराध केले क्षमा। त्या कार्याकारणें पुरुषाधमा,
लोटली मर्यादेची सीमा। शेवटीं फळ भोगीं कां. २
सरला सुकृताचा तंतू। आयुष्य-तैला झाला अंतू,
माझिये हस्तीं व्यजनवातू। भीमरूपें उदेला. ३
तो झडपतां सत्वरगती। प्राणदीप पंचज्योती—
मालवोनि पडेल क्षिती। गात्र-पात्र पालथें. ४

करीं रायांचें बंधमोचन। कीं युद्धा उठीं न लागतां क्षण,
या वेगळा विचार आन। करणें आतां घडे ना. ५
तिघांमाजीं जो आवडे। त्यासींच भीडिजे झडेंपाडें."
मागध म्हणे, " मूर्खा ! तोंडें। जल्पना करिशी वाचाटा! ६
तूं बहुरूपी खेळसी सोंगें। कोणतें युद्ध जिंकिलें आंगें ?
वेडीं बागडीं भाविकें भणंगें। तुझें शूरत्व त्यांमाजीं. ७
पार्थ पृथेचें सुकुमार बाळ। शस्त्राभ्यासीं गेला काळ,
मजसीं अयोग्य; परि अळुमाळ। भीम कांहीं दिसतसे. ८
तोही मंद, जड, आळसी। बहुत आहार, निद्रा, त्यासी,
आयुष्य सरलें म्हणून ऐसी। बुद्धी उदेली तुम्हांतें. ९
तिघांतें हाणोनि चडकपणा। क्षणामाजीं मेळवीन मरणा,
बळें सर्पाचिया सदना। मंडूक वस्ती पावलां " १०
" मंडूक किंवा तिघे गरुड। आतांची होईल हा निवाड,
समय प्राप्त झालिया वाड। बोल टाकीं माघारा." ११
ऐसें बोलतां चक्रपाणी। उभे ठेले समरांगणीं,
जरासंधें राज्यासनीं। अभिषेकिलें सहदेवा. १२
प्रधानातें निरोपी मुखें। " राज्य रक्षावें अतिविवेकें,
होणार तें होतसे सुखें। निर्भय सर्वीं असावें." १३
सरसावुनी वीरगुंठी। भीम लक्षिला दारुणदृष्टी,
जैसा मदोन्मत्त करटी। सिंहेश्वरें लक्षावा. १४
भीमा आंगीं विरश्रीचा लोटू। धरितां न धरवे अतिउद्भटू,
अगस्ती धावे समुद्र घोटूं। तैसा झगटे पुढारां. १५
दोघे पिटती पाणितळें। जानुमूळें, बाहुमूळें,
मही ताडितां पादतळें। शैलमौळें थरकती. १६
दोघे स्मरती कुळदैवतें। मागध मागे महेशातें,
" शत्रुयाचकां माझेनि मृत्यें। यश भिक्षा लाधो मज." १७

भीमें स्मरोनी श्रीकृष्णचरण । म्हणे " होवोनी मागधहनन,
सिद्धी पावो राजसूययज्ञ । आर्त पुरो पांडूची." १८
किरीट काढोनि हस्तकीं । केश आंवळिले मस्तकीं,
चंड गर्जना करिती मुखीं । काळ कांपे चळचळां. १९
धावोनि भीमाची वीरगुंठी । मागधें कवळोनिया मुष्टी,
दक्षिणहस्त सूदला कंठीं । काळपाशा-सारिखा. २०
दांत खाऊनी करकराटी । गुडघा स्थापिला हृदयपुटीं,
'सावध!' म्हणे कृष्ण जगजेठी । 'बापा! भीमा! बाळिष्टा!' २१
भीमें भैरवाकार दृष्टी! हृदयीं ओपिली वज्रमुष्टी,
सोडवूनि मगरमिठी । झिंजाडोनि लोटिला. २२
तेणें मागुती उठोनि विकळ । पडिला जैसा विशाळ ताळ,
पुढती उठोनि उतावीळ । भीम मध्यें कवळिला. २३
मस्तकें फुटोनिया धरणी । रक्तप्रवाह भरती वदनीं,
मागध म्हणे, " देहमरणीं । अमृतपान होतसे." २४
हस्त वोढिती तोडावया । पाय कवळिती मोडावया,
डोळे टोंचिती फोडावया । पाडावया दशनांतें. २५
करप्रहार, लत्ताप्रहार । मुष्टिप्रहार, मस्तकप्रहार,
मोजोनि मारिती शतसहस्त्र । 'उसणें घे, घे!' म्हणोनी २६
बाहु गदा, बाहु मुसळें । बाहु मुद्गल, कर त्रिशूळें,
एकमेकांचीं मर्मस्थळें । पाहोनिया, मारिती. २७
व्याघ्रां ऐसे क्रोधानळीं । झोंबों पाहती कंठनाळीं,
गजां-ऐसे कुंभस्थळीं । भेडूं म्हणती मस्तकें. २८
सर्पा-ऐसे फुस्कारती । सिंहां ऐसे हुंकारती,
वृषभां ऐसे फुंपाटती । उफाळती इसाळें. २९
नरनारी नागरिक लोक । पाहती दोघांचें कौतुक,
विमानयानीं वृंदारक । जय इच्छिती भीमातें. ३०

मुष्टिघातांचिया ध्वनी । थरथराटें थरके धरणी,
वोथरोनि पाताळफणी । मार्ग पाहे पळावया. ३१
निराहार, निरुदक । विसांवा न घेतां पळ एक,
तेरा दिवसपर्यंत देख । युद्ध झालें दोघांचें. ३२
चतुर्दशीचिया रातीं । मूर्च्छा पावला मागध नृपती,
ते वेळीं संकेत दावी हातीं । पांडवातें माधव. ३३
" पाय कवळोनिया करतळीं । चिरोनि करावीं दोन्ही फळीं,
जरेनें सांधिला तो उखळीं । सांधा वेगीं बळिष्टा. ३४
या वेगळा उपाय आन । करितां, मागध न पावे मरण,
आतांचि होऊनि सावधान । युद्ध करील मागुती." ३५
भीमें रगडोनिया दाढा । मध्यभागीं कर्षिला गाढा,
माथां वाहोनिया भवंडा । चक्राकार दाविला. ३६
तेथोनि टाकिला भूतळीं । लात वोपिली वक्षस्थळीं,
वज्रें ताडोनियां मौळी । शक्र भंगी पर्वता. ३७
भीमसेनें आपुले हस्तीं । करोनि शकलें टाकिलीं क्षिती,
जरासंधा दिधली मुक्ती । कुंती-कुमरें यापरी. ३८

—मुक्तेश्वर

---

१९ कालियामर्दन

[गोकुळाजवळ यमुनेच्या डोहांत एक कालिया नांवाचा भयंकर विषारी सर्प राहात असे; त्यामुळें तेथल्या भोंवतालच्या प्रदेशांस फार त्रास झाला होता, म्हणून श्रीकृष्णानें त्या डोहांत शिरून कालियास शिक्षा लाविली व त्यास तेथून काढून दुसरीकडे लावून दिलें, ही कथा यांत आहे.]

श्लोक

प्रचंड ढावा भुजदंड भारी । सव्यें करें वाजवि कैटभारी;
गर्जोनि वृक्षाचवरी,तटाकीं । उडी विषाच्या सलिलांत टाकी.

कढे आधीं पाणी रथचरण-पाणी वरुनिया,
उडी टाकी हांकेसरासि उदकीं सांवरुनिया;
भुजंगाचा डोहो गहनहि, अहो, तो खळबळी,
वसे जेथें सर्प स्वगृह करुनीया खळ, बळी. २
पाणी धनुःशत उचंबळलें ऱ्हदाचें,
त्यामाजिं तें विषाचि तुंबळ दुर्हृदाचें,
कल्होळ लोकभयकारक ये तटाका,
आश्चर्य हें जरि गमेल मनांत टाका ! ३
कीं अनंत बळ त्या प्रबळाचें। काय हो नवल याच बळाचें?
हें चारित्र सुर मानव तारी। वर्णिजे म्हणुनिया अवतारीं. ४
उडी ऱ्हदीं टाकुनिया निघाला,
आला खळाच्या सदनासि घाला;
विलास येथूनि दुना हरी तो,
करी खळाचा मद जो हरीतो. ५
खेळे जळीं त्या खळ दंड-पाणी,
विदारिती श्रीभुजदंड पाणी;
जळांत हस्ती करि विक्रमातें,
दावि तसा श्रीहरि या क्रमातें. ६
आफळी ऱ्हदजळीं भुजदंड। त्रास तो करि खळास उदंड;
घोष तो परम दुःसह मानी। काळिया विषमदें अभिमानी ७
कर्णहीन नयनें ध्वनि घेतो। क्रुद्ध होउनि भुजंग निघे तो;
देखिला डहुळि जो स्वजळाला। देखतांचि हृदयांत जळाला.
देखिलें नयनिं नंदकुमारा। श्यामसुंदरवरा सुकुमारा;
मंदहास्य अतिरम्य मुखाचें। दाखवी स्वमुख नित्य सुखाचें ९
हरी तेज सौंदर्य पद्मोदराचें,
असें श्रीपदद्वंद्व दामोदराचें;

न रूपास ज्या साम्य वेदीं पुराणीं,
पहातां पुरेना जयाची शिराणी. १०
खेळे जळीं त्या खळगर्वहंता,
हरावया जी फणिची अहंता;
त्याविण कोणी स्वमदा न वारी,
तो देखिला येरिति दानवारी. ११
देखूनिया क्रुद्ध फणींद्र झाला;
धावूनिया, श्रीगरुडध्वजाला,
वर्मस्थळीं दंश करूनि दांतें,
दावी बळें विक्रम-संपदांतें. १२
तैं सर्पदेहें मग कृष्णजीची—
श्रीमूर्ति, सत्कीर्ति पवित्र जीची,
अनंत कल्याणगुणावतारी,
आच्छादिली, जे भुवनासि तारी. १३
लोकरीति जगदीश्वर दावी,
जे अपूर्व म्हणऊनि वदावी;
हें न जाणाति जन व्रजवासी,
दुःखशोक करितील जिवांसी. १४
त्यामाजिं जे सन्निध गोपजाती,
गाई, गुरें, दुःखपथासि जाती;
तरीं समस्तांसहि दुःख, आधी,
झाली वदे श्रीशुक तेंचि आधीं. १५
भुजंगें हरी वेष्टिला सर्व देहीं,
न हाले, न चाले, न कांहीं वदेही;
असें जाणुनी सर्व मूर्च्छेस जाती,
महाशोक-दुःखें, भयें गोपजाती. १६

ज्यां लाभ हा, तो प्रिय पूर्णकाम;
ज्याच्या पदीं देह, कलत्र, काम—
समर्पिला, ये रिति त्या अजाला—
देखूनि त्यांतें बहु शोक झाला. १७
मूर्च्छा विमानीं गगनीं सुरांला,
आक्रांत गाईव्रजवासुरांला;
आक्रंदती, मांडिति रोदनातें,
देखोनि ऐसें मधुसूदनातें. १८
कृष्णाकडे अर्पुनि लोचनांतें। भयें पहाती व्रजमोचनातें;
स्वशोक त्यांला बहु तीव्र जाला। दावी महोत्पात अति व्रजाला.
नभीं उल्कापात, क्षितिवरिहि उत्पात दिसती;
'हरी कोठें आहे?' म्हणुनि जन अन्योन्य पुसती;
हरी गेला राना त्यजुनि बळरामासि सदनीं,
असें हें जाणोनि वदति अतिदु:शब्द वदनीं. २०
हरी चित्त, वित्त, प्रिय प्राण ज्यांचा,
न सोसे वियोगाग्नि पादांबुजाचा;
न उल्लंघवे दु:खशोकार्णवातें,
उडे धैर्य, जैशीं तृणें जीर्ण वातें. २१
धरूनी मनीं सर्व या काळजीला,
निघाले पहायासि गोपाळजीला;
सवें चालिली बाळवृद्धादि सेना,
हरीवीण जीवित्व कोणा दिसेना. २२
परम वृद्ध बहू लवले कटीं,
धरुनि काठि करें, अतिसंकटीं—
त्वरित चालति, बाळहि रांगती,
हरिच ज्या सुपथीं सकळां गती! २३

—वामन

२० उद्यान

[चाल—भूपती खरें तें०]

दिवस तो स्मरे मज पूर्णपणें गे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ ध्रु० ॥
तुज शोभा सांगूं तेथिल कवण्या बोलें ।
आनंदें वाटे बाग सर्व कीं डोले ॥
शोभती वृक्ष चहुं बाजू, साजिरे ।
कारंजें खुललें तेथें, गोजिरें ।
चुंबिती लताकुंजांना, मोगरे ।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ १ ॥
हीं सुंदर कुसुमें हास्यमुखानें बघती ।
ह्या लता तरूंना आलिंगुनिया धरिती ॥
वृक्षावरि पक्षिकुलें तीं, येउनी ।
आनंदित करिति जनांला, गाउनी ॥
तीं त्यांचीं मंजुळ गीतें, ऐकुनी ।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ २ ॥
हा गुलाब फुलला सुंदरसा बागेंत ।
बहु मोद अम्हांला मधुर सुगंधें देत ॥
हे मधुकर काळे तेथें येउनी ।
पुष्पांतिल मधुर रसातें प्राशुनी ।
बागडती स्वैरपणें तें पाहुनी
साम्राज्य प्रीतीचें चाले वाटे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ ३ ॥

—कै० सौ० लक्ष्मीबाई बेहेरे

२१ जगामधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें ?'

[ईश्वरानें आपणांस दिलेला जन्म व अनुकूलता हीं केवळ आपल्या स्वतःच्या चैनीसाठीं नसून यांचा उपयोग आपल्या बांधवांसाठीं श्रम करण्यांत व त्यांना धैर्य व कर्तव्यतत्परतेचा धडा दाखवून देण्यांतच झाला पाहिजे असें कवि सांगत आहे.]

[चाल—वीरा भ्रमरा०]

जगामधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें ?—
कराया श्रम तुजला योजिलें.
मधुर माधवीकुंज आपुले विस्तृत करणें कधीं—
देउं नको सोडुनि गा तूं मधीं;
घाम उन्हाचा फार येइल बा तुला,
पण धीर धरीं, अस्तसमय पातला,
जों कालाच्या मंजुळ घण्टाटंकारें सुचिवलें—
'चला रे काम अतां संपलें'. १
देवें उटणीं तुला चर्चिलीं काय म्हणुनि सांग कीं?—
झगडण्या, नच पडण्या मंचकीं !
स्फटिक ते धवल जेवीं शोभले,
अश्रु जे तेविं तुवां ढाळिले—
तुझ्या धाकल्या उद्यमबन्धूंकरितां, देवें भले
भुजालंकरणीं ते गोंविले. २
धैर्य आणि ती कार्यनिरतता दावुनि तूं आपुली,
बांधवीं स्फूर्ति पसर चांगली;
तुझें बघुनि ते हृदयिं धीरता घेतिल मग लागलीं,
करींही धरितिल कृत्यें भलीं;
मग—काय सांगणें !—द्वारें तुझिया तयां
देइल सुफलें ईश्वर हरिखोनिया.

अल्प पुष्पही बिंदु हिमाचे आपुल्या पेल्यांतले
वांटितें भावंडीं आपले ! ३

—केशवसुत

---

२२ अभिमन्युपराक्रम

[द्रोण धर्मास धरण्याचे उद्देशानें सैन्याची चक्रव्यूहाकार रचना करून युद्धास उभा राहिला. तेव्हां अर्जुन दुसरीकडे युद्धास गुंतला होता, आणि चक्रव्यूहांत शिरण्याची युक्ति तर त्याच्यावांचून कोणास माहीत नव्हती; यामुळें पांडव संकटांत पडले असतां अर्जुनाचा पुत्र अभिमन्यु हा पुढें होऊन व्यूहांत शिरण्यास तयार झाला. याचें वय त्या वेळीं केवळ सोळा वर्षांचें असूनही तो मोठा पराक्रमी होता. त्यानें युद्धांत सर्व कौरवांचा पराभव केला; परंतु शेवटीं त्यास सर्वांनीं मिळून मारिलें. या उताऱ्यांत फक्त त्याच्या पराक्रमाचें वर्णन आहे.]

आर्या.

सौभद्र म्हणे, 'शिरतों व्यूहीं, डोहीं जसा मतंगज, वा—
हरि-पोत दंति-यूथीं, कीं दहनी करुनिया पतंग जवा. १
ज्येष्ठपित्याला देउनि अभय, म्हणे तो सुवीर सूतातें,
'हूं हांक रथ, म्हणावी माय सुभद्रा सुवीरसू तातें !' २
भीमादि सबळ सर्वहि ते उठले व्यूह-कोट फोडाया;
इकडुनि कौरवकटकहि होय पुढें शत्रु-सैन्य मोडाया. ३
रथ थडकले, भडकले हय, शस्त्रजवान्हि धडकले वरते,
अन्योन्य द्व्यंगुलही राहों देती न धड कलेवर ते. ४
पावत असतां दोन्ही करुनि सुतुमुलाहवास वध सेना,
व्यूहीं शिरे गुरुपुढें, चित्तेंहि जयांत वासव धसे ना. ५
व्यूहीं गमे सुभद्रा-सुत, गज-यूथांत जेविं बालहरी;
त्यावरि पडल्या सेना, त्या मंथाद्रिवरि जेविं बा लहरी. ६
बहुतांशीं एकाकी सौभद्र कलह करी समुत्साहें,
असक्तत् सूतासि म्हणे, 'सुयशस्कर समर हो, समुत् साहें'. ७

तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें झालीं रणांत शुष्करसें.
शोभे विजयोत्साहें अभिमन्यु-मुख प्रफुल्ल पुष्करसें. ८
दुर्योधन स्वयें मग सौभद्र-वधार्थ धावला कोपें,
कलभ-मथन हरिसि, तसें त्याला तें कर्म वाटलें सोपें. ९
प्रभुचा मर्मीं हाणी सर्वांसहि तीन तीन शर भाचा,
वाटे, बहु सिंहांशीं समर करी कुपित पोत शरभाचा. १०
द्रोण-द्रौणि कृपादि प्रबल बहु भटांसही न तो आटे;
फाटे तद्दृष्टिपुढें बल, जलदीं मूर्तवातसा वाटे. ११
भेदुनि शरें उरःस्थळ, चळचळ बल-जलधि कर्ण कंपविला;
मूर्च्छित करूनि मद्रप सौभद्रें तत्प्रताप संपविला. १२
एकें सुषेण वधिला, बाणें एकेंचि दीर्घ-लोचन हो,
एकेंचि कुंड भेदी, गमले ते वृक, तो विरोचन हो! १३
मानी वीर पळाले गुरुनेंहि निवारितां तडक, राया,
स्यंदन शीघ्रहि पिटितां सांगति सूतांसि तांतड कराया. १४
सप्रेम पार्थ पुत्राप्रति पाहुनि तत्पराक्रमें डोले,
कुरुपति परिसत असतां द्रोण कृपाशीं कृपाभरें बोले. १५
'हर्षवितो मज पुत्राहूनि, नव्हे हा कुमार सामान्य;
धन्या सती सुभद्रा, नंदन जीचा कुमारसा मान्य!' १६

—मोरोपंत

२३ संशयरत्नमाला

[परमेश्वर आपणास अद्यापि कां पावत नाहीं, अशी शंका मनांत आणून कवि अनेक प्रकारचे संशय घेत आहे, व त्यांचीं आपलीं आपणच उत्तरें देत आहे.]

आर्या

उठतां बहुत्वरेनें 'कोठें जातां?' असें तुम्हां देवी—
पुसती झाली जाणों; पुसतां ज्ञाता पुढें न पद ठेवी. १

किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें,
प्रेमळ गीत तुम्हांला, हरि हरिणापरिस बहुत वश करितें. २
कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें,
शरणागत-भय-शमना ! यास्तव येणें तुझें नसे घडलें. ३
किंवा मजहुनि दुसरा कोणी बहु दीन दास आढळला,
तच्छुभ-दैव-समीरें त्यावरि करुणाघन प्रभू वळला. ४
प्रायः सुमुहूर्ताचा शोध करायासि लागला वेळ,
होय महत्कार्य, परि प्रभुचा तो नित्य सहज हा खेळ. ५
किंवा तुज एकाकी पाहुनि, खळ दैत्य आडवे आले,
फुटतां सागर सिकतासेतूचें काय त्यापुढें चाले ? ६
किंवा तुज गुंतविलें भजकीं, परि ते दयार्द्र या रंकीं;
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती गाय कष्टतां पंकीं. ७
किंवा चुकतें कांहीं स्तवनीं तेणेंचि मागुता बससी,
तरि हें मन्मूर्खत्व; प्रभु तूं दोपज्ञही तसा नससी. ८
कीं भीतो भ्रांत वृथा, मृग-जल-मग्नासि काय तारावें ?
म्हणतां असें कसें ? शिशुभय जाया बागुलासि मारावें ! ९
कीं पावावें समर्थीं सदय मनांतूनि योजिलें जरि तें,
तरि जेविं रुक्मिणीचें चित्ता, माझें अधीर मन करितें. १०
किंवा पुराणपुरुषा, संप्रति बहु भागलासि या कामीं,
तुज नीज लागली, तों सजलों मारावयासि हाका मी. ११
किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करा,
तरि वरि तसाचि आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा !
कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त, तिळ स्थळ नसे, नसावेंची;
वसवा पुरें, पुरे कां म्हणतां धनवंत कण कसा वेंची ? १३
कीं याचकांसि देतां सरले चारीहि मुक्ति-धन-राशी,
भक्ति मज द्या; द्यावें देवाला अमृत योग्य, न नराशी ? १४

कीं भेटि बहु दिसां, भय भेटाया दीनबंधुला वाटे;
तरि भेटावें विधिनें गेले जाताति साधु ज्या वाटे. १५
कीं भीशी. मज एका उद्धरितां लागतील फार झटें,
तरि कोणाहि न कळतां न्यावा झांकोनि दास पीत पटें! १६
कीं लक्ष-भोजनारि केला संकल्प, संपला, देवा,
तरि दाते क्षुद्रि फळा मग न म्हणति काय,'या बसा,जेवा'. १७
कीं एक मीच उरलों पापी, हें बीज ठेविलें जतन;
वतन स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगलायतन? १८
कीं कार्यबहुत्वें तुज फावेना यावया जगत्पाळा,
तरि घ्या रूप दुजें ती विद्या कंठीं वसे जशी माळा! १९
कीं मागें गुप्त उभा असासि प्रेमें उभारुनी बाहे,
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकशी बा, हे! २०

—मोरोपंत

२४ कविवंदन

[हा उतारा रामदासस्वामींच्या दासबोधांतला आहे. यांत कवीनें पूर्वींच्या कवींना वंदन केलें आहे. व यांत साधारणतः कवींच्या गुणांचें-ही वर्णन आहे. येथें कवि म्हणजे फक्त कविता रचणारे असा अर्थ घ्यावयाचा नाहीं, तर कवि म्हणजे विद्वान्, पंडित, ग्रंथकर्ते, असें समजावयाचें.]

ओंव्या

आतां वंदूं कवीश्वर। जे शब्दसृष्टीचे ईश्वर,
ना तरी हे परमेश्वर। वंदावे ते. १
कीं हे सरस्वतीचें स्थान। कीं हे नाना-कळांचें जीवन,
नाना सद्विद्यांचें भवन। यथार्थ होय. २
कीं हे पुरुषार्थाचें वैभव। कीं हे जगदीश्वराचें महत्त्व,
नाना लाघवें सत्कीर्तिस्तव। निर्माण कवी. ३

कीं हे शब्दरत्नांचे सागर। कीं हे मुक्त-सरोवर,
नाना विधींचे वैरागार। निर्माण झाले. ४
कवी मुमुक्षूंचें अंजन। कवी साधकाचें साधन,
कवी सिद्धाचें समाधान। निश्चयात्मक. ५
कवी स्वधर्माचा आश्रयो। कवी मना मनोजयो,
कवी धार्मिकाचा विनयो। विजयकर्ते. ६
कवी वैराग्याचें संरक्षण। कवी भक्ताचें भक्ति-लक्षण,
नाना स्वधर्म संरक्षण। ते हे कवी. ७
कवी प्रेमळांची प्रेमळ स्थिती। कवी ध्यानस्थांची ध्यानमूर्ती,
कवी उपासकांची वाढ-कीर्ति। विस्तारली. ८
नाना साधनांचें मूळ। कवी नाना प्रयत्नांचें फळ,
नाना कार्यसिद्धि केवळ। कवींचेनि प्रसादें. ९
आधीं कवींचा वाग्विलास। तरी मग श्रवणीं तुंबळे रस,
कवींचेनि मतिप्रकाश। कवित्वासी होय. १०
कवी व्युत्पन्नाची योग्यता। कवी सामर्थ्यवंताची सत्ता,
कवी विचक्षणाची कुशलता। नाना प्रकारीं. ११
कवी कवित्वाचा प्रबंध। कवी नाना-धाटी मुद्रा छंद,
कवी गद्य-पद्य भेदाभेद। पद-प्रकारकर्ते. १२
कवी सृष्टीचा अळंकार। कवी लक्ष्मीचा शृंगार,
सकळसिद्धींचा निर्धार। ते हे कवी. १३
कवी सभेचें मंडण। कवी भाग्याचें भूषण,
नाना सुखांचें संरक्षण। ते हे कवी. १४
कवी देवांचे रूपकर्ते। कवी ऋषींचें महत्त्व वर्णिते,
नाना-शास्त्रांचें सामर्थ्य तें। कवी वाखाणिती. १५
नसता कवींचा व्यापार। तरी कैंचा जगदुद्धार,
म्हणोनि कवी हे आधार। सकळ सृष्टीसी. १६

नाना-विद्या-दातृत्व कांहीं । कवीश्वरांवीण तों नाहीं,
कवींपासून सर्व कांहीं । सर्वज्ञता. १७
मागें वाल्मीकिव्यासादिक । झाले कवीश्वर अनेक,
तयांपासूनि विवेक । सकळ जनांसी. १८
पूर्वीं काव्यें होतीं केलीं । तरीच व्युत्पत्ती प्राप्त झाली,
तेणें पंडितता अंगीं बाणली । परम योग्यता. १९
ऐसे पूर्वीं थोर थोर । झाले कवीश्वर अपार,
आतां आहेति, पुढें होणार । नमन माझें त्यांसि पैं. २०
नाना चातुर्यांच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती,
वेद श्रुती बोलों म्हणती । ज्यांच्या मुखें. २१
परोपकाराकारणें । नाना निश्चय अनुवादणें,
शेखीं बोलिजे पूर्णपणें । संशयातीत. २२
कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे रसांचे ओघ लोटले,
नाना-सुखांचे उचंबळले । सरोवर हे. २३
कीं हे विवेक-निधीचीं भांडारें । प्रकट झालीं मनुष्याकारें,
नाना-वस्तूंचेनि विचारें । कोंदाटले हे. २४
कीं हे आदिशक्तीचें ठेवणें । नाना शक्तींशीं आणी उणें,
लाधले पूर्वसंचिताच्या गुणें । विश्वजनांसी. २५
कीं हीं सुखाचीं तारुवें लोटलीं । अक्षयीं आनंदें उतरलीं,
विश्वजनांसी उपेगा आलीं । नाना प्रयोगांकारणें. २६
कीं हे ईश्वराचा पवाड । पाहतां गगनाहुनि वाड,
ब्रह्मांडरचनेहुनि जाड । कवि-प्रबंध-रचना. २७
आतां असो हा विस्तार । जगासि आधार कवीश्वर,
तयांसि माझा नमस्कार । साष्टांगभावें. २८

—रामदास

२५ दिव्य उद्यान

साक्या

स्फटिक मण्यांचे रस्ते होते बांधिव सुंदर मोठे;
स्वच्छ जलाचे पाट वाहती झुळझुळ कोठें कोठें. १
मोठे मोठे वृक्ष शोभती अशोक-पुन्नागांचे,
इच्छित फल देणारे पिंपळ औदुंबरही साचे. २
बोरि-जांभळी, तुती, आंवळी, बकुळी ठायीं ठायीं,
दोन बाजुंनीं वेतकमानी, त्यांवरि पिंपळि जाई. ३
चंद्रविकासी, सूर्यविकासी जलांत सुंदर कमळें,
मधुर सुवासें गुंग होउनी भ्रमर तयांवरि खेळे ! ४
सारस, तित्तिर, चक्रवाकही, गरीब लावे असती,
मयूर, पोपट, मैना, कोकिळ स्वच्छंदें किलबिलती. ५
स्वभाव चंचल टाकुनि होती मधूमाक्षिका स्वस्थ,
भ्रमरांचा गुंजारव परिसुनि विहंग होति तटस्थ. ६
सुगंध शीतल मंद वायुनें होई सौख्य मनासी,
पापी, निंदक, देवद्रोही न दिसे स्थान तयांसी. ७
स्वच्छ जलाचे तलाव मोठे; तयांत कारंजांचे—
उडति फवारे जणुं मोत्यांचे तुरे उभविले साचे ! ८
कांहिं कासवें, मीन पोहती कासारांत सुखानें,
वरूनि कांहीं पदार्थ पडतां झेलुनि घेति मुखानें. ९

—श्रीमती राधाबाई केळकर

---

२६ सर्व धर्म एकच आहेत

[आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेकरें आहों; तेव्हां आपण आपसांत कां भांडावें ? जेथें जेथें कांहीं अधर्म अगर अन्याय होतो तेथें तेथें सर्वशास्ता परमेश्वर अवतारी पुरुष उत्पन्न करितो. बुद्ध, शंकराचार्य मुसा (मोझिस), जरदुस्त, महमद वगैरे सर्व त्यानें मुद्दाम पाठविलेले,

प्रेषितच होत. तेव्हां धर्ममतांचे भिन्नभाव विसरून सर्वांनी एकाच परमेश्वरास भजावें, अशी कवि सर्वांस विनंती करीत आहे.]

पद.-[चाल-उद्धवा, शांतवन कर जा०]

बंधु हो, त्यजुनि अभिमाना, प्रभुसि भजा एका भावें ॥ध्रु०॥
नाथ एक सकलजगाचा, माय-बाप सकलां तो चि;
तो पाळी, पोसी तोची, अखिल जगीं सत्ता त्याची;
नर-नारी नाना देशीं, बालकें तयाचीं साचीं;
(चाल) तुम्हि विसरुनि अपुलें नातें, कां करां उगिच कलहातें?
सकलांच्या परमेशातें, एकचित्त होउनि ध्यावें. १ बंधु हो०
जेथ जेथ ज्या ज्या काळीं, उग्र होय धर्मग्लानी,
ज्ञान, सत्य, लोपुनि सारें, जन होती बहु अज्ञानी;
नयनीती टाकुनि अवघे, रत होती असदाचरणीं;
(चाल) तेथ तेथ विभु जनशास्ता, भक्तराज, वंद्य समस्तां,
निर्मितो धर्मनयनेता,-कीं, जनां सुपथिं लावावें. २ बंधु हो०
तो पाठवि आर्यावर्तीं, बुद्ध जिनां, शंकर व्यासां;
तो सिरियादेशीं प्रेषी, भक्तवर्य मूशा-ईशां;
पारसिकीं आरबदेशीं, जरदुस्त-महंमददासां;
(चाल) एकचि तो पूज्य समस्तां, तो सकलधर्ममतिदाता,
कां धरितां नाना पंथां, बंधुत्वें त्यासि भजावें. ३ बंधु हो.०

—वा. आ. मोडक

२७ अन्योक्ति

['लेकी बोले सुने लागे', अशी मराठींत एक म्हण आहे; त्याप्रमाणें एकास बोलून दुसऱ्यास लागेल असा ज्यांत अर्थ असतो, अशा बोलण्यास 'अन्योक्ति' असें म्हणतात. अन्योक्तींत एकास बोलून दुसऱ्यास लागेल असें, किंवा पशु, पक्षी, झाड, फळ वगैरे कोणास तरी 'अन्यास' उद्देशून बोलून त्यांत मनुष्यास लागेल असा गर्भित अर्थ असतो व अशा रीतीनें पर्यायेंकरून लोकांस बोध केलेला असतो.]

कोकिलान्योक्ति

येथें समस्त बहिरे बसतात लोक,
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक?
हे मूर्ख, ज्यांस किमपीहि नसे विवेक,
रंगावरूनि तुजला गणतील काक. १

काका, मौन धरूनि बैससि जरी या आम्रवृक्षावरी,
तूतें कोकिळ मानितील जन हे सारे स्वचित्तीं तरी;
होती स्थानगुणेंचि थोर बहुधा वस्तू; नृपाच्या शिरीं—
पंका कोण न मानिती मनिं 'असे कीं कस्तुरी ही खरी?' २

या माळावरि वृक्ष एकहि नसे बा रे खुळ्या कोकिला,
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिसी आपुला?
जेथें बोल अमोल वाटति तुझे, तो देश बा वेगळा,
तेथें आम्र फुलोनि, गंध विखरे चोहींकडे आगळा! ३

वसंतसमयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो,
जयास अवलोकुनी सुरतरूहि चित्तीं थिजो;
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती?
परी पिकचि एकला मधुर वाणि लाधे कृती. ४

चातकान्योक्ति

नको धावुं, बा चातका, मेघ नाहीं,
धुराचा असे लोट हा नीट पाहीं;
न या सेवितां तूज पाणी मिळेल,
तुझ्यामात्र डोळ्यांतुनी तें गळेल! ५

ते अन्य मेघ, तव जे हरिती तृषेतें,
कां व्यर्थ आरडुनि शोषविशी जिभेतें?
हे चातका, घन रिते शिशिरांत येती,
जे गर्जती, परि न वारिकणाहि देती. ६

नवीं पद्में जेथें विकसुनि सुगंधा विखरती—
तळीं ऐशीं तोयें सतत भरलीं फार असती,
तरी पर्जन्याचे जलकणचि कां चातक पितो?
गमे मातें, मानी शिर नमविण्या लाज धरितो! ७

मयूरान्योक्ति

झाडें पेटुनि वाजती कडकडां, त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाळा राहुनि राहुनी उठति या विद्युल्लता ही नसे;
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा, दवानल असे, मोरा पळें रे घरा! ८

मयूरा तुला भूषवी हा पिसारा,
तुझा यामुळें जाण लौकीक सारा;
तया सांडितां हानि तूझी घडेल,
नृपाच्या किरीटावरी तो चढेल! ९

शुकान्योक्ति

फळें मधुर खावया असति, नित्य मेवे तसे,
हिरेजडित सुंदरीं कनकपंजरींही वसे—
अहर्निश; तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे,
स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे! १०

बसुनि उपवनीं बा जोंवरी कावळा हा—
करित कटकटीनें लोककर्णांस दाहा,
बस निमुट, शुका तूं तोंवरी स्वस्थ कोठें;
कमिपण गुणवंता काय मौनांत मोठें? ११

बकान्योक्ति

उभा राहे एके चरणिं धरणीतें धरुनिया,
तपश्चर्या वाटे करित जणुं डोळे मिटुनिया;

बका, ऐशा ढोंगें तव अमति मासेच ठकती,
परि ज्ञाते तूझें कपट लवलाहीं उमजती ! १२

सिंहान्योक्ति

मी रोड एकटा मी, आणी मज पाठबळ नसे कांहीं—
ही शंका स्वप्नींही सिंहा ! तुझिया मनीं वसत नाहीं. १३
सांप्रत पुनःपुन्हा कां हे हत्ती मत्त गर्जती फार ?
गेला सिंह वनांतरिं वाटे, ज्याचा पराक्रम अपार. १४
मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरतीं सिंह पाहे स्वभावें,
काका, त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांसखंडास खावें;
जो उन्मत्ता गजाच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकातें—
धाला रक्ता पिऊनी, नच मृतपशुच्या इच्छितो तो कणातें. १५
कृतीचीं आयाळें जडवुनि, गळा पुष्ट करुनी,
बसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी;
तरी, जो ऐकोनी भिउनि पळती मत्तहि करी,
कसा त्या नादातें क्षणभरिहि तो पामर करी ? १६

—पद्यरत्नावली



भाग दुसरा

ईश्वराचें प्रातःस्तोत्र

[कवि प्रातःकाळीं आपण स्वतां परमेश्वरस्तवन करीत आहे व पर्वत, नद्या, रवि, चंद्र, वगैरे यांसही आपल्याबरोबर प्रभुस्तुति करण्यास सांगत आहे.]

श्लोक

चमत्कृतिनिधान ही कृति तुझी, जगाच्या पते !
तुझेंच जगदंड, जें अखिल चित्त आकर्षितें;
सुरम्य इतुकी जरी कृति तुझी, तरी तूं किती—
सुरम्य असशी प्रभो ! खुंटतसे मतीची गति. १

निवास तव कोणता कळतसे न हें निश्चयें,
स्वरूप नचही तुझें दिसुनि चर्मचक्षूंस ये,
तरी तव मनोहरा कृति जरीहि साधारणा,
दया प्रगट दाविते, अतुल शक्ति, अस्मन्मना. २

नेत्रांहीं देखितो हे परिजनगण जो किन्नराख्य प्रभूतें,
गातो काव्यें करूनी निशिदिनिं विभुची कीर्ति वाद्यांवरी ते,
त्यासी पृच्छा करीं मी, "करुनि मजवरि प्रीति, सांगें मला तें,
आहे कोठें प्रभूची वसति ? सतत जी मोद देतेच तूतें." ३

जे हिंडती पशु समस्त धरातळाला,
जे मीन सेविति पयोनिधिच्या जळाला,
व्योमीं विहार करिती खग जे, तयांसी,
याचीं अहर्निश, 'भजाच तुम्ही प्रभूसी'. ४

दिसे शुक्र हा पूर्वभागीं प्रभातीं,
जना सूचवी दूत सूर्यप्रभा ती,

'याची प्रभा द्योतवीते नभातें,
'करीं' त्या म्हणें मी 'प्रभूच्या स्तवातें'. ५
असे चक्षु जो सूर्य सर्वा जगाचा,
असे अंतरात्मा समग्रां जिवांचा,
तया मी म्हणें-'थोर ईशास मानीं,
प्रभातीं, दुपारीं स्तवीं अस्तमानीं'. ६
कधीं चंद्र येतो रवीच्या घराला;
करूनी कधीं तारकांचाच मेळा—
विराजे विधू पूर्ण आकाशगामी,
'स्तवीं रे परेशास' याचीं तया मी. ७
ग्रह, जे रविची प्रदक्षिणा,
करिती एकमतें, तयांस मी—
करितों अतिलीन याचना,
'प्रभुचें गीत मुखें वदा तुम्ही'. ८
जीं द्रव्यें पंच केलीं अनल, जल, धरा, वायु, आकाश, ईशें,
यत्संयोगेंच सारें नयनविषय हें सृष्ट विश्व प्रकाशे,
ज्यांच्या योगेंच होती सुखद षड्ऋतु हे त्यास मी प्रार्थितों हें,
'सर्व स्थित्यंतरीं हो प्रभुस्तवन करा, विस्मरा त्या न मोहें!' ९
तापे सूर्य नदादिकांवरि करीं उष्णा जला शोषवी,
पावे नीर नवीन रूप घनसें त्यातें रवी रंगवी;
ऐसा जो घन अंबरीं झळकतो, निःशब्द वा वर्षतो,
'ईशा मोदभरें स्तवीं सतत तूं'.—ऐसें तया याचितों. १०
चारी दिशांकडुनि मारुत वाहती जे,
त्यांहीं प्रभुस्तवन सप्तसुरांत कीजे;
ऐकूनि हें श्रवणरंध्रविहार गीत,
प्रेमोत्कटें रसिक पादप ते डुलोत. ११

घेती नद्या जनन ज्या गिरिगव्हरांत,
गाओत त्या प्रभुवरा रमणीय गीत;
सत्पक्ष कोकिल, वसंतसखे, वनांत—
मोदें प्रभुस्तव करोत निजस्वनांत. १२
" नमस्ते जगत्कारणा ! आदिशक्ते !
नमस्ते प्रभो ! क्षेमदात्रे नमस्ते !
जसें ध्वांत सूर्यागमीं नाश पावे;
तसें त्वत्करीं पाप माझें पळावें ! " १३

—महाजनी

---

२ प्रभात

[प्रभातकाळीं सर्वत्र कसा आनंद पसरलेला दिसत आहे, याचें वर्णन करून कवि अशा मंगल वेळीं परमेश्वरास वंदन करण्यास सांगत आहे]

['घनश्यामसुंदरा', या भूपाळीच्या चालीवर]

प्रभात झाला, रवी उदेला, ऊठ उशिर झाला;
प्रेमळभावें सरळमनानें वंदि जगत्पाला. १
दहिंवर पडलें, मौक्तिकवृष्टी जणुं भूवर झाली,
प्रेमरंगरंगित ही स्मितमुखि पूर्वदिशा खुलली. २
मंद मंद मधुगंध समीरण येती भेटाया,
आलिंगुनि सांगती,—'काळ हा दवडुं नको वायां !' ३
हास्यवदन ही सुमनमंडळी उठुनि उषःकालीं—
दहिंवरतोयें जणुं का प्रातःस्नान करित बसली. ४
प्रसन्नवदना वनलक्ष्मीही शुचिर्भूत दिसते,
नानाविध नवपल्लव वाहुनि देवपुजा करिते. ५
तरुवर उठले, प्रफुल्ल झाले आनंदें डुलती,
तन्मय होउनि मानसपूजा जणुं का हे करिती. ६

विहंग उठले, गाउं लागले तरुवरि केंव्हांचे,
मंजुळ वाणी ऐक जणूं हे गायक स्वर्गींचे. ७
गगनविहारी खग वैतालिक वायूवरि बसुनी—
प्रभुगुण गाती उंच अंबरीं तल्लिन होऊनी. ८
खळखळ वाहत, लगबग येती तटिनी गिरिवरुनी,
देवदर्शना जणूं चालल्या भाविक या तरुणी. ९
तरुवसनावृत तुंग पुरातन पर्वत हे दिसती,
वल्कलधारी आद्य ऋषी जणुं ध्यान धरुनि बसती. १०
जिकडे तिकडे मंगलमय हें भूमंडळ दिसतें,
ऊठ, मानवा, आळविं प्रभुला, जाइं शरण त्यातें ! ११

—दत्तकवी

---

३ नीतिबोध

आर्या

भज सन्मार्गातें तूं, देवज्ञांची करूं नको गर्हा,
स्वप्नींहि देवहेलन न करावें, रीति हे तुला अर्हा. १
बा ! कोप, लोभ, शठता,असदाग्रह,पिशुनता,कुटिलभाव,
उद्वेग, दंभ यत्नें सोडीं, जोडीं महाजनीं भाव. २
नसतां विवेक कांहीं, बा ! घडतो आत्मघातही कुपिता,
सुपिताहि क्रोधाच्या आवेशेंकरुनि होतसे कु-पिता. ३
सुखसंपन्नीं मैत्री, नित्य दया दुःखितीं जनींहि करीं,
संतोष पुण्यवंतीं, बा ! औदासिन्य, दुर्मतींत धरीं. ४
अतिगर्व, अतिक्रोध, श्रम, निद्राहार, भाषण, क्रीडा,
हे षट्पदार्थ वर्जीं होइल यांतें न वर्जितां पीडा. ५
विद्योत्साह, श्रद्धा, स्मृति, पुण्य, ख्याति, धैर्य हे आधीं-
अनघा मन घालुनिया अतिपूर्वक षट्पदार्थ तूं साधीं. ६

सक्रोध हो अरिजनीं, स्वपरिजनीं हो दयार्द्र तूं बापा;
सकृप, सलोभहि चित्तीं हो स्वजनांच्या हरावया तापा. ७
हो द्वेषी पाखंडीं साधुजनीं हो सराग तूं बा गा;
दुर्मंत्रीं केवळ जड, पिशुनोक्तीं बधिर हो महाभागा ! ८
नास्तिक, धूर्त, पतित, शठ, षंढ, कितव, चपल, खल, जड, क्रूर,
निजकल्याणाकरितां सुज्ञा ! सोडूनि यांसि दे दूर. ९
जननी, जनक, सतीस्त्री, गुरु, सज्जन यांचिया वचां साधो !
विश्वास सदाहि धरीं, न अविश्वासें तुला व्यथा बाधो! १०
सावध सदा असावें संसारीं, स्वहितकृत्य लक्षावें;
पुरुषार्थाचें साधन बा ! धनसें हें शरीर रक्षावें. ११
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका;
प्राणहि वेंचुनि रक्षीं वृद्धा, बाळा, सुदुर्बळा, रंका. १२
सोसिति अपकारांतें, उपकारांतें न साधु आठविती;
कीं सोसितां न सा विति होय वपु, न सोसितां न आठ विती !
मृत्यु हरितसे समयीं अमरांसहि, कोण मृत्युला चुकवी,
ऐसें जाणुनि तत्त्व, व्यसनांत न मोह पावती सुकवी. १४
व्यसनीं सहाय होउनि आप्ताला होय जो परासु कृती,
शक्रादिलोकपालांमध्यें बहुमान्य तो बरा सुकृती. १५
नांदे सुखें सदोदित संसारीं तोचि, जो अनय न करी,
न निघे इतर जन, बुडे व्यसनीं, पंकीं जसा अ-नयन करी. १६
यत्नें कीर्तिच जोडीं बा ! होय पदार्थ हाचि बहु धन्य !
राजे पंडित यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य. १७
खळ निंदिति म्हणुनि बुधें टाकावी काय हरिगुणासक्ती ?
दीर नणंदा-जांचें साध्वी न त्यागिती सुपतिभक्ती. १८
दुर्लभवस्तु न वांच्छी, न करी जो नष्टवस्तुचा शोक,
आपत्तींत न मोहे त्या पंडित म्हणति जाणते लोक. १९

कामें, क्रोधें, लोभें नागविले अमित, यांस जे भुलले;
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरही उलले. २०

—मोरोपंत

---

४ सेतुबंधावर उत्प्रेक्षा

[लंकेस जाण्याकरितां रामानें सेतु बांधविला. हा सेतु नसून दुसरेंच कांहीं आहे, अशा एकेक कल्पना कवि लढवितो. 'अमुक वस्तु जणूं काय अमुकच आहे'. असें कवि जेव्हां वर्णन करितो, तेव्हां तेथें उत्प्रेक्षा असें म्हणतात. उदाहरण, 'हें तोंड जणूं काय चंद्रच आहे', ही उत्प्रेक्षा झाली.]

आर्या

शतयोजन आयत, दश योजन विस्तीर्ण सेतु शंकेतें—
दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमिबाहु लंकेतें.
किंवा तो कपिकटकोत्तरसिंधूद्गत बुभुक्षु कालाऽही—
दूर पसरला खाया रात्रिचरां क्षुद्र बेडकांलाही. २
सेतु न तो, यत्पतिनें स्वसुता नेली, जशी वृकें एणी,
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी. ३
राम-जयश्री-लग्नीं लंका घाली सुनील पाटावें—
सेना-वऱ्हाडिणीला पायघडी, कां असें न वाटावें? ४
बहुधा तुच्छ जलधितृण चाटायाचा धरूनिया वीट—
गेला प्रभुप्रतापासित-पथ रक्षोटवीकडे नीट. ५
कीं पतितपति त्यागुनि विश्वशरण्याकडे रडत वाटे,
आली जी लंका-श्री, तीचा तो सांजनाश्रुपथ वाटे! ६
कीं रचिलें स्वापयशें शोकानल-दग्ध-सागरोराचि तें!
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें महा-सुधी रचितें. ७

—मोरोपंत

झरा !

[झरा स्वतः आपलें वर्णन करीत आहे असें कल्पून कवि, झरा व त्याचे कांठचा प्रदेश वगैरेंचें वर्णन करीत आहे.]

[वृत्त–द्रुतविलंबित.]

घन पिता मम, जो नटवी धरा,
मम असे जननी गिरिकंदरा;
जननिचे शरिरीं बहु नाचतों,
खदखदां हंसतों आणि खेळतों ! १
जलनिधी मम थोर पितामह,
सतत त्या सरिता भगिनींसह,
त्वरित भेटुं म्हणोनिच धावतों,
तरि वनस्पतिला तटिं पोसतों ! २
गगनचुंबित हे तरु लागती,
मम सुतावलि तीरिं मदीय ती !
पुजुनिया निज कोमल पल्लवें,
मजवरी तरुराजि शिरें लवे ! ३
हरित घालुनि वस्त्र तटीं स्वतां,
प्रणयरूपवती युवती लता,
हरित पल्लव शालुस लेउनी,
नटुनिया दंव–मौक्तिक–भूषणीं, ४
विविधवार्णे अलंकृत होउनी,
तरुपतींस अती कवटाळुनी,
सु-तनु त्या हंसती सुमनें किती !
मम तटीं रमती पतिशीं अती ! ५
प्रणय त्यांवरिही मम निश्चित;
मम जलांतरिं होउनि बिंबित,

जरि विलोल तरी हृदयीं पहा,
वसति त्या मम संततही अहा ! ६
कनकगोल रवी उदयाचलीं,
सहज नाशित येइ तमावली,
तरुंतुनी कर घालुनि तो बळी,
बहु सुवर्णसुमें उधळी जळीं ! ७
पवन वंशनिकुंजिं शिरोनिया,
श्रुतिमनोहर गान करोनिया,
उठवितो द्विज, वृक्ष—लतादिकां,
म्हणतसे 'प्रभुगान करां न कां ?' ८
खळखळाट तईं मम ऐकुनी,
जळहि निर्मळ हें मम पाहुनी,
पिक, मयूर उडोनहि नाचुन,
करिति रम्य विभुस्तवगायन !
सळसळां तरती बदकें जिथे,
अचळ हो जळ दर्पणतुल्य तें;
उसळती जळिं चंचळ मासळ्या,
टपति त्यां बक, धींवर पंक्ति या ! १०
तरुंतुनी नृपतीसम वाहुनी,
चमकतोंहि कुठे कुरणांतुनी !
कृषक लावित या तटिं शेत तो,
मधुनि मी विभवें स्थिर वाहतों ! ११
जिथजिथे वसतों मज पाहतां,
प्रमुदिता दिसते वनदेवता !
सुमफलांसह सज्ज सदैव ती,
सुखविण्यास समा सकलां सती ! १२

थकुनि, भागुनि पांथ कधीं जरी,
दुरुनि येइ तृषातुर या तिरीं,
निववि तहान मी अपुल्या जळें,
निववि नातहि भूक तरू फळें ! १३
रविकरें गिरि कानन तापती,
कर भयें परि या जळिं कांपती,
रवि कसा मग तापद हो तया ?
पथिक जो कुणि ये मम आश्रया ! १४
मम तटीं पसरे घन सावली,
कधिं न वास करी कलि या स्थलीं.
झुळुझुळू स्वन मंजुळ गाउनी,
निजवितों पथिकां मन मोहुनी ! १५
मग कसा तरि होइ न तुष्ट तो ?
स्वसदनीं सुत-पत्निस सांगतो—
'कितिक रम्य असे तरि निर्झर !
अमित धन्य जगांत खरोखर ! ' १६
उटज बांधुनिया तटिं तापसी,
सु-तप आचरती सुखि मानसीं,
सतत चिंतन ते करिती इथे,
कितिक सेविति ते सुख-शांतितें. १७
जळ मृगेंद्र तसे मृगही पिती;
द्विज तसे अतिशूद्र पिती किती !
लघु व थोर असा मुळिं भाव तो,
मम मनांत कधींहि न राहतो ! १८
किति युगें असती तरि लोटलीं,
नृपकुलें किति मीं तरि पाहिलीं,

विकृति जाहलि या जगतीं किती,
पलटली मनुजा तवही स्थिति ! १९
दिवस वा रजनी; सुख दुःखही;
जनन-मृत्यु घडो जगिं कांहींही;
सतत वाहतसें स्फटिकासम,
खळखळाट न हो स्थिर हा मम ! २०
मम पिता मज ये जधिं भेटण्या,
बहुत गर्वभरें करि गर्जना !
परि गढूळ बहू जळ पाहुन,
मम तिरस्कृति तैं करिती जन ! २१

—भास्कर रामचंद्र तांबे

---

६ कर्णाचा अभिमान

[कर्ण जन्मास आला तेव्हांच त्याच्या शरिरावर कवचकुंडलें होतीं, यामुळें त्याचें शरीर अभेद्य होतें. अर्जुनाला कर्णास मारावयास ही अडचण होती; ती दूर व्हावी म्हणून इंद्रानें ब्राह्मणरूपानें कर्णाकडे तीं कवचकुंडलें मागावयास जाण्याचा बेत केला. कर्ण मोठा उदार होता तेव्हां तो तीं खास देईल, व मग त्याचा घात होईल, म्हणून कर्णाचा बाप सूर्य यानें त्यास स्वप्नांत येऊन कवचकुंडलें न देण्याविषयीं बोध केला. परंतु अभिमानी कर्णानें तो ऐकला नाहीं व पुढें इंद्र मागावयास आला असतां त्यास तीं कवचकुंडलें दिलीं, अशी कथा यांत आहे.]

आर्या

स्वप्नीं द्विजरूपी दिन-कर कर्णाला म्हणे, 'अगा राया,
कांहीं विहित-हित तुला आलों सांगावया अगारा या. १
तूं ब्रह्मण्य, वदान्यश्रेष्ठ, असें विश्व सुमहिमा गातें,
म्हणतें त्वन्मुख, 'न क्षम जें द्याया स्वर्द्रुमाहि, मागातें'. २

देयार्थे पात्रेच्छापूर्ति, बुध म्हणेल बा कशास न हो ?
परि वंचाया विप्रच्छद्मे येणार पाकशासन हो ! ३
अमृतोद्भव कुण्डल-युग, सहज कवच हें तया न ओपावें,
तादितर सर्वस्वार्थी जो विप्र, तया म्हणोनि 'ओ' पावें'. ४
कर्ण म्हणे, 'कोण तुम्ही?' विप्र म्हणे, 'मी तुझा पिता सविता,
तळमळतों वाराया अहिता, साधावया हितास विता'. ५
कर जोडुनि कर्ण म्हणे, 'करिति न गुरुवर्य कूपदेशाला;
नेतो न मानसींच्या निजशिशुतें हंस कूप-देशाला. ६
हानि नसो उपदेशें तुमच्या, बहु वृद्धि मद्यशाला हो,
सत्कीर्ति अमृत-शाला, गुरुजी, अपकीर्ति मद्य शाला हो!७
शोभा यशेंचि, न अशी लोकीं धृत-दिव्य-कुण्डलें कानें,
जोडुनि अयश न व्हावें पितृहृदयीं अग्निकुंड लेकानें'. ८
भास्कर म्हणे, -'बुडावें त्वच्छोकविषार्णवांत पुत्रा म्यां,
हें वाटेल उचित, तरि दे कुण्डल-कवच-दान सुत्राम्या'. ९
कर्ण म्हणे, 'जो अयशा, गुरु शोकद, तोचि मन्द नर मेला;
विष्णुहि म्हणेल व्हावा सुयशा शोकदहि नंदन रमेला'. १०
सूर्य म्हणे, 'मागावी बा ! दिव्याऽमोघशक्ति हरिकरगा,
वत्सा, स्ववधेच्छुधनंजय-वधसाहित्य हेंचि तरि कर गा'. ११
'हें करिन, हरिन अरि-नर-देवप्राणहि विचिन्त तूं जागा'.
ऐसा स्वप्न विलोकुनि तो श्रीमान् कर्ण जाहला जागा. १२
द्विज-काम-पूर्ति-पर्वीं मन्त्रजपाच्या जपोनि अवसानीं,
ये द्विज तनु हरि, दुर्लभ ज्याचें दर्शन जनांसि नवसांनीं. १३
शक्र म्हणे, 'तुजचि पुढें 'दे'हें उच्चारितां न भी कवि भो—
साधो, म्हणउनि आलों कांहीं मागावयास भीक विभो !' १४
कर्ण म्हणे, 'कर जोडुनि पुसतो हा विप्रदास, कळवा जी,
काय तुम्हां द्यावें म्यां, धन, कन्या, ग्राम, वा सकळ वाजी'?

ब्राह्मण म्हणे, 'अदेय स्वप्राणहि बा ! बुधा न दात्यातें;
जें सत्कवियश, कैचें जीवनदाही सुधा नदा त्यातें ? १६
निज कवच-कुंडलें मज दे, दात्या ! यांविणें नको कांहीं,
तापदहि मानिजेतो, ताप हरहि सेविजे न कोकांहीं'. १७
कर्ण स्मित करुनि म्हणे, 'ऐसें द्यावें तुम्हींच वरदांनीं,
अजि देवेश्वर हो, मज कां योजितसां अशक्य वर-दानीं ? १८
द्यावें कसें स्वजीवनहेतु सरोदान मीनयादानें ?
द्यावेंहि कसें जलदें ? देवा वांचेन मी न या दानें. १९
होईन वध्य मी, तूं उपहास्य असें करूं नको, पावें !
प्रभुनें काय न्याय-व्रत-वर्तिच्छल करून कोपावें ? २०
घ्या कवच-कुंडलें ग्रहणाग्रह जरि, परि असें तरि करा, जी !
द्या शक्ति ती अरिवधीं, बहुमान्या अरिधरा हरि-करा जी'.
शक्र म्हणे, 'घे, देतों, मागें कोणासही न दिधलीला,
कृत्या-व्याल्यशनीच्या दावितसे शक्ति नैकविध लीला. २२
सोडावी हे प्राणव्यसनीं एकीं, करील कृत्याशी
नाहीं तरि परतोनि त्वत्प्राणांतें हरील कृत्याशी. २३
एक रिपु वधुनि येइल मद्धस्ता, श्री जशी सुकर वीरा;
स्मरण असों दे, इच्या मोक्षीं बरवा विचार कर वीरा'! २४
कर्ण म्हणे, 'मी समयीं ईतें एकीं नरींच सोडीन,
मग हे जाऊ, मज न त्यागी ऐशी सुकीर्ति जोडीन'. २५
कापूनि कर्ण दे जें वज्रसम अभेद्य सहज कवच रणीं,
ऐसेंचि सत्त्व-शील श्रीवर वाहे स्वनेत्र भव-चरणीं. २६
त्या शुचि-सत्त्व-समुद्रा, दात्यांच्या नायका, पिता काय,
धन्य म्हणे हरिहि मनीं तो जेव्हां होय कापिता काय. २७

---

७ भरतभाव

[दशरथानें रामास युवराज करण्याचा बेत केला. तेव्हां रामाची सावत्र आई कैकेयी हिनें राम दूर जावा व आपला मुलगा भरत यास राज्य मिळावें म्हणून, तिला दशरथानें मागें कबूल केलेला वर मागितला, कीं रामानें चौदा वर्षे वनास जावें व भरतानें युवराज व्हावें. तेव्हां दशरथास फार वाईट वाटून तो शोकानें विव्हळ होऊन पडला. राम पितृवचन खरें करण्याकरितां सीता व लक्ष्मण यांसह वनास गेला. इकडे दशरथ शोकानें मरण पावला. इतक्या गोष्टी होत तों भरत घरीं नव्हता. तो आला तेव्हां त्यास हें मुळींच आवडलें नाहीं; म्हणून तो रामास परत नेण्यासाठीं आपल्या आया, वसिष्ठगुरु व पुष्कळ प्रजाजन यांसह अरण्यांत रामाकडे आला. त्या वेळची ही कथा आहे.]

श्लोक

वाम-अंकगत भूमि-कुमारी । वामबाहु-सुरता सुकुमारी;
वल्कलांबर-जटा-अभिरामा । देखतो भरत त्या अभिरामा १

दूर्वा-दल-श्यामल दीप्ति देहीं । सेवी पदें लक्ष्मण तो विदेही,
गंगातटीं सेवित मंदवातें । देखे अशा श्रीरघुपुंगवातें. २

देखोनि ऐसें रघुनंदनातें । धावे त्वरेनें पदवंदनातें,
अलभ्य जो हर्ष सुरादिकांही। तो होय,त्यामाजिंच शोक कांहीं. ३

रडे फुंदफुंदे, शिरीं पादपद्मा—
धरी, सद्म मानी जया नित्य पद्मा;
बळें क्षेम दे त्यास वोढूनि राम,
स्वभक्तप्रिय स्वामि विश्वाभिराम. ४

मांडियेउपरि बैसविला हो, । अश्रुनीर पुसि, दे सुखलाहो;
'वासरा न रड, सांग सुवार्ता'.। शब्द हा निवावि दुःखदवार्ता. ५

तों देखिला गुरु वसिष्ठ, तयास वंदी,
ब्रह्मण्यदेव जडला चरणारविंदीं;

तों माउल्या तिघिहि सत्वर पावल्या हो,
भेटोनिया तिघिहि सत्वर सेविल्या हो. ६
'पिता सुखी कीं ?' म्हणतांचि, रामा—
रडोनि त्या सांगति सूपरामा;
रडे अहो रामहि लोकरीती,
स्त्रिया पुन्हा शोक महा करीती ! ७
सपिंडी-क्रिया राम गंगातटाकीं,
करी आणि ते पिंड गंगेंत टाकी;
रडे लोकदृष्टीस शोकश्रमांतें—
प्रभू दाउनी, ये पुन्हा आश्रमातें. ८
तों वदे भरत गोष्टि मनाची, । प्रार्थना बहुत आगमनाची—
मांडिली परि न राघव मानी, । देखतां सुरवरांस विमानीं. ९
झणिं फिरे स्वपुरीप्रति राम हा,
म्हणुनि आधि मनीं अमरां महा;
भरतशब्द तदर्थ न ये मना,
पुरविणें प्रभुला सुरकामना. १०
'आज्ञा पित्याची मज मोडवे ना,
वत्सा, तुझी गोष्टहि तोडवेना;
घालूं नको बा मज संकटांत,
नको पडूं या सहसा हटांत !' ११
अशी आयके जेधवां रामवाणी,
मुखश्री करी बंधु तो दीनवाणी;
म्हणे, 'तात-आज्ञा, मृगांकानना रे,
मला सांग, जाईन मी कानना रे !' १२
'बापा, ऐसें वर्ततां तों विशेषें—
आज्ञा-भंग प्राप्त दोघां अशेषें;

एवं राज्यातें तुवां रे भजावें,
ताताज्ञेनें कानना म्यांच जावें'. १३
ये ना असें भरत देखुनि रामराया,
गंगातटीं रचुनि दर्भ, बसे मराया;
पाहे वसिष्ठमुनि-वक्त्र-सरोरुहातें—
श्रीराम, आणि खुण दाखवि हो स्वहातें. १४
'कीं सांग गुह्य अवतार-चरित्र याला,
जें तारितें चहुंयुगांत जगत्त्रयाला'.
बोले वसिष्ठ मग सन्निध जाउनीया,
'कां प्राण टाकिसि ?' म्हणे समजावुनीया. १५
'हा राम मारील दशाननासी,
यालागिं जातो प्रभु काननासी;
नको निवारूं भरता, तयाला—
ब्रह्मादिकांच्या पद-दातयाला. १६
येणार मागुति चतुर्दश-वत्सरान्तीं,
राहो वनांत तितुके दिन आणि रातीं;
आत्माच तो, तुज वियोग तयासि नाहीं,
येऊनिया करिल जे तव कामनाही'. १७
हें आयकोनि जरि शोकहि दूर केला,
प्रत्यक्ष-दर्शन-सुखास बहू भुकेला;
तेंव्हां उठोनि भरतें पदवंदनातें—
केलें दुरूनि, म्हणतो रघुनंदनातें. १८
देखोनिया गमननिग्रह राघवाचा—
बोले उभा भरत, निश्चयरूप वाचा:—
"वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा,
त्यानंतरें त्यजिन यास, निरोप दे हा. १९

वर्षें द्विसप्तभरि काल समाप्त झाला,
त्यानंतरें आजि, तुझ्या चरणांबुजाला—
स्पर्शों शिरें न जरि, देह तयाच वारीं,
यातें त्यजीनचि, विरिंचि जरी निवारी. २०
वर्षें चतुर्दशहि रक्षिन, शासनातें—
अंगीकरीन, न बसेन नृपासनातें;
सिंहासनावरि तुझ्या पदपादुका मी
पूजीन जो तवपदांबुज-लाभ-कामी.” २१
पादुका जडित आणुनि हातें,
रामचंद्रचरणांबुरुहातें—
लावुनी, निजशिरीं भरतानें,
वंदिल्या, रघुवरांघ्रि-रतानें. २२

—वामन

---

८ यमधर्म व सावित्री

[मद्रदेशचा राजा अश्वपति म्हणून होता, त्याची सावित्री नामक एकुलती एक कन्या होती. तिनें शाल्वदेशाचा राजा द्युमत्सेन याचा पुत्र सत्यवान याला वरिलें. हा सत्यवान मोठा गुणी होता, तरी अल्पायुषी होता; व सावित्रीच्या सासऱ्याचें राज्य शत्रूंनीं हरण केल्यामुळें तो अरण्यांत राहात असे; आणि तो अंध, वृद्ध, व अशक्त होता तरी सावित्रीनें दृढनिश्चयानें सत्यवानालाच वरिलें; व पुढें एक वर्षभर अरण्यामध्यें श्वशुरगृहीं अशा रीतीनें व्रतनेम करून राहिली, कीं त्या पुण्याच्या योगानें तिनें आपल्या पतीचा प्राण यमापासून परत घेतला. पुढील कवितांत अशी कथा आहे कीं, यमधर्म सत्यवानाचा प्राण घेऊन चालला आहे, व सावित्री त्यापासून एकेक वर मागून घेत आहे, अखेरीस तिनें आपल्या पतीचा प्राण मागून घेतला आहे.]

आर्या

त्यातें बांधुनि घेउनि यमधर्म प्रभु निघे अवाचीतें;
भ्याला सतीस, बहुधा जें ब्रह्मलिखित बरें न वाची तें. १
त्यामागें तीहि निघे, धर्म म्हणे ‘ भागलीस, जा परत,
स्नेहऋण फेडिलें त्वां, करुनि स्वपतिक्रिया रहा स्मरत’.२
साध्वी म्हणे, ‘प्रभो, पति जिकडे, जावीच मूर्ति हे तिकडे;
स्वगुरुत्रनप्रसादें मद्गतिस न रोधितील हेति-कडे. ३
संत म्हणति, सप्तपदें सहवासें सख्य साधुशीं घडतें;
सन्मित्रचि न व्यसनीं अन्याखिलमित्र संकटीं पडतें. ४
तुज संत म्हणति पितृपति, समवर्ती, धर्मराज, बापा हें–
सत्य यश, म्हणुनि याहि कन्येसि दया करोनि बा पाहें?’५
ऐसें सती वदे, तो बोल शशी, देव तोहि सागरसा–
प्रेमें उचंबळे हो, धरि कारुण्यें द्रवासि साग रसा. ६
धर्म म्हणे ‘साध्वी, बहु श्रमलीस, स्वाश्रमासि जा मागें;
जो मागशील तो वर देतों, घे इष्ट तें मला मागें.’ ७
‘देवा, व्हावे चक्षुस्तेज संपन्न आश्रमामाजीं–
मामाजी ऐसें द्या; मति साहेनाचि त्या श्रमां माजी’. ८
‘दिधलें!’ धर्म म्हणे, परि जाताचि होती तशीच मागून;
देव म्हणे पुनरपि, ‘जा वत्से, घे वर दुजाहि मागून’. ९
ती सुमति म्हणे, ‘ राज्यभ्रंशें बहु खिन्न सासुरा होतो,
पावुनि भवत्प्रसादें निजपद, बहुकाळ सासु राहो तो’. १०
‘होइल, जा,’ धर्म म्हणे, परि करि अनुगमन सबहुमान सती,
कीं जी हंसी, हंसावांचुनि मानील काय मानस ती? ११
धर्म म्हणे, ‘गे बाई, करिशी कां व्यर्थ या श्रमांस तिजा–
वर घे नकोचि मागों, आलीस सुदूर, आश्रमा सति जा’. १२

त्यासि म्हणे सावित्री 'संपन्न असो पिता सुतनयशतें'.
हा लक्ष्मीसुत कवि किति लिहिल सतीचें उमासुत न यश तें.
ऐसें शिरोनि चित्तीं, घेउनि भारीहि तीन वर देवा-
सोडी ना सोडविल्यावांचुनिया ती सती नवरदेवा. १४
देव म्हणे, 'तूं स्वच्छा स्वच्छायाशचि मागुती, साति घे-
वर घेउनि जा चवथा, देतों मागून मागतीस तिघे'. १५
'व्हा सुप्रसन्न, वत्से तुज हो सुतशत,' असें वदा, न्या हो,
सुयशोराशि स्वर्गीं, लज्जाप्रद सुरनगा वदान्या हो'. १६
भुलला धर्म द्युतिला, धृतिला, मतिला, तसा तिच्या स्तुतिला,
न करुनि विचार जावी मागें म्हणवुनि म्हणे 'तथास्तु!' तिला.
हळुच म्हणे सावित्री, 'पावेन वरेंकरून संततिला;
तुमचा प्रसाद, म्हणुनी प्रेमें गातील सर्व संत तिला. १८
तरि मत्पति मज द्या कीं, तुमची पावेल मान सत्या गी;
यश रक्षाया प्राणहि सत्यगुणासक्तमानस त्यागी' १९
रोमांचित धर्म म्हणे, 'बाई, गातिल तुझा प्रभाव सती,
पतिशीं अविनाभावें वसशिल, रविशीं जशी प्रभा वसती २०
राज्य चतु:शतवत्सर करिल तुझा कांत, सोडिला, जा गे!
हा त्वन्महिमा जागो, सीतेनें जेविं जोडिला जागे'. २१

---

९ भामाप्रकोप

[एकदां नारदानें कृष्णाला पारिजातकपुष्प दिलें. त्यानें तें रुक्मिणीस दिलें, यामुळें सत्यभामा रागावली. ही कथा यांत आहे.]

श्लोक

'कृष्णासि कृष्ण-पद-भक्ति-विशारदानें-
जें स्वर्ग-पुष्प दिधलें मुनि-नारदानें,
तें रुक्मिणीप्रति दिलें त्रिजगन्निवासें,
जें द्वारका करि भरोनि सुगंधि वासें'. १

अशी गोष्ट दासीजनीं बायकांनीं—
विचारूनिया सांगतां जाय कानीं;
तईं सत्यभामा महाक्रोध दावी,
बुझावी हरी, तोचि लीला वदावी. २
गडबडां धरणीवरि लोळते । वदवती न कवीसहि लोळ ते;
रडत, मूर्छित होय घडीघडी । पवन निश्चळ, नेत्र न ऊघडी. ३
रडत रडत मूर्छेमाजि वृत्ती बुडाल्या,
परम विकल, मी-तूं या स्मृतीही उडाल्या;
उचलुनि सखियांहीं मंचकीं दिव्य सेजे—
निजविलि, मृततुल्या सत्यभामा दिसे जे. ४
ये अशांत सदनांत हरी तो । जो अनादि भवशोक हरीतो;
किंकरी नमुनिया चरणांतें । सांगती सकळ आचरणातें. ५
म्हणे, 'शोक कां प्राप्त झाला महा हा ?
अशी कष्टली कां शुभांगी ? अहाहा !
न बोलेचि कां आमुशीं आज राणी ?
जिच्या बोलण्याचीच आम्हां शिराणी !' ६
जईं श्रीवत्सांक प्रभु करि निजांक-स्थित शिरा,
शिरा, नाडी, प्राण प्रकटवि न लावूनि उशिरा;
शिराणी शब्दाची पुरवि, तरि डोळे न उघडी,
घडी जों मानाची बिघडलि असे तोंवरि घडी. ७
बजागी ते जागी स्वमनिं, परि डोळे न उघडी,
घडी एक क्रोधीं मन बुडवि मानें अवघडीं;
घडी पूर्वप्रेमस्थितिस बसतां तीस विघडी,
घडी स्त्रीजातीची घडविलि असे ख्याति सुघडी. ८
वदे भामा, कोपें अतिविकल, चावूनि अधरा,
" धरा-पृष्ठीं नाहीं ठक तुज-असा, अंबुजधरा;

धरावें या अंकीं शिर आजि तिचें पक्षिगमना,
मना आलें देणें कुसुम जिस तें, कंस-दमना!" ९

जों नेत्र मोडुनि वदे, ढकलूनि मांडी,
भ्रू-मंडळीं भ्रमण, अंगुलिभंग मांडी.
तों कृष्णजी करुनि हास्य म्हणे, "अहाहा!
वेडे, अनर्थ इतुक्यास्तव का महा हा? १०

अर्पितां मुनिवरें सुमनातें। वाटलें प्रथम हेंचि मनातें—
कीं, 'असा तरु पुरींत असावा। त्यांतही स्वसदनींच वसावा'.
फूल देउनि तिला उतराई। होइं मी, समज हे चतुराई;
देतसें तरुचि तो तुजला गे। खेद हा न करणें तुज लागे.

तुतें वृक्ष देणोंचि, यालागिं आधीं,
फुलें नाशिला जो तिला होय आधी;
न जाणोनि केले तुवां कष्ट भारी!"
समाधान ऐसें करी कैटभारी. १३

अशी ते बुझावूनि रंभोरु, हातें—
तिच्या धूतसे हो मुखांभोरुहातें;
उटी लावुनी वांटल्या केशरा जी,
स्वहस्तांबुजीं विंचरी केशराजी. १४

हरिकरिं यमुना हो मृद्गंगावनाची;
मिरवि धवलपुष्पीं दीप्ति गंगा-वनाची;
सित असित नद्यांच्या संगमीं श्रीत्रिवेणी,
तशिच यदुपतीनें घातली चित्र-वेणी. १५

—वामन

---

१० भीष्मार्जुन-युद्ध

[पहिल्या भागांतील उतारा चौदावा, यांतील कथा व ही कथा एक-च आहे. तो उतारा वामनकृत आहे, व हा मोरोपंताचा आहे.]

आर्या

भीष्म ग्रीष्म-तरणिसा, अर्जुन हेमंत तरणिसा गमला;
देव म्हणे, “ बहु आला वृद्धाहुनि जिष्णुचाचि राग मला. १
हा शूर ‘दूर, ओसर,’ म्हणणार महा-प्रभावहा रविला;
हार विलासिजनेंसा, येणें कैसा प्रभाव हारविला ! २
झाला धीर परि परि-म्लान सखा जाति पुष्प-गुच्छकसा.
तुच्छ कसा हा प्रवया, चिरडिल भलता अहींद्रपुच्छ कसा ? ३
हा पांडवांसि भस्मचि करिल, उपेक्षा करूं नये याची,
पदरासि अकीर्ति श्रित-सुहृद्नवन पथकरून येयाची ! ” ४
आणुनि मनीं असें, ज्या धन्य म्हणति सर्व विप्र तो दास—
भीष्म वधाया धावे हरि, हस्तें कवळुनि प्रतोदास. ५
देव रथातें सोडुनि धावे देवापगा-विलापार्थ,
कीं दुस्तरारि-सागरिं न बुडो कासेसि लाविला पार्थ ! ६
पार्थाप्रति प्रयत्नें तो बल-कारुण्य-सिंधु राखाया,
क्रोधें गर्जत धावे, सिंह जसा मत्तसिंधुरा खाया. ७
“ एह्येहि देवदेव ! श्री-कृष्ण ! नमोस्तुते ! ” असें बोले;
ओले गळ्ल प्राज्य-प्रेमाश्रुभरें करूनिया डोले. ८
भीष्म म्हणे, “ त्वद्धस्तें व्हाया समरांत शांत नवसा जो—
होता करीत, तो हा जेविं हरिहतेभ शांतनव साजो ! ९
जरि मारशील, मज गतिलाभ, तुजहि कीर्ति-लाभ गुरु-तर तो;
विश्वगुरो ! प्राकृतही तारुनि शरणागतासि गुरु तरतो. १०
तूं हरिसा हरि, साची हरिणी सुरसिंधु मीहि पाडस-सा;
पाड, ससाध्वस हो अरि, हरिचा पावेल काय पाड ससा ? ११
ब्रह्मांड भस्म व्हावें ज्याच्या दर-रक्त-चक्षुच्या पातें,
तो तूं आंगें मारूं पाहसि मज, दावुनि प्रतापातें ! १२

झालों धन्य त्रिजगीं ! भास पळ प्राकृतांस मारकसा;
त्या प्रभुनें तो केला भस्म स्वातिक्रमेच्छु मार कसा ?' १३
धावुनि धरी धनंजय मागुनि त्या माधवासि बाहूंनीं,
मग दृढ चरणींच मिठी घाली, पहिलीच रीति पाहूनी. १४
दूर उसळला होता कोपावेशें मुकुंद कंदुकसा;
राहे उभा प्रभु, गमे इभसा; धृतचरण-भक्त अंदुकसा. १५
पार्थ म्हणे, "श्रीधर्मावरि धरितिल जे असिप्रति ज्ञाती—
मरतील; त्यजसी कां 'आयुध न धरिन' असि प्रतिज्ञा ती?
मारिन भीष्मातें मी, इतरांतेंही, भवद्दयाधारें;
बा ! त्वत्प्रसाद ज्यावरि, केवळ मेर्वग्रही तया धारें ! १७
लोक तुज मृषावादी ऐसें न म्हणोत, सत्य संध-पते !
मरतिल तव दृकूपातें भीष्मद्रोणादि सर्व अंधप ते." १८
कुरु-कुंजरासि गेला होता यदु सिंह तो खरा खाया,
परते पर तेथूनि, प्राण-प्रिय-मित्र-तोख राखाया. १९

—मोरोपंत

---

११ गुराख्याचें गाणें

[चैन, विनाकारण नाजूकपणा व कृत्रिमता यांनीं परावलंबी बनलेल्या श्रीमंती आयुष्यापेक्षां अत्यंत साधी अशी रानावनांतील गुराख्याची राहणी किती चांगली, हें कवीनें या कवितेंत वर्णिलें आहे.]

[चाल—भला जन्म हा०]

कुरणावरतीं वडाखालतीं गाई वळत बैसतों—
मजेनें गाई वळत बैसतों ।
स्फटिकापरि निर्मळ हा खळखळ झरा जवळ वाहतो॥ ध्रु०॥
पांवा फुंकुनि मंजुळ नादें रान भरुनि टाकितों—
हिरवें रान भरुनि टाकितों !

आनंदानें डोळे भरतां प्रभुजीला प्रार्थितों !
गाई-मागें रानोमाळीं शीळ भरत हिंडतों—
कधिंकधीं शीळ भरत हिंडतों—
दऱ्याखोऱ्या-राई-ओहळावरी मौज मारितों !
उन्हाची भीती कवणाला ?
पाउस काय करिल तो मजला ?
भीतों कोठें मी थंडीला ?
श्रीमंतापरि गरिबा कोठें वारा तो दुखवितो ?-
गरिबा वारा नच दुखवितो !
देवाजीवरि सदा हवाला टाकुनि मी राहतों ! १
तृषा लागतां नीर झऱ्याचें ओंजळिनें मी पितों—
निर्मळ, ओंजळिनें मी पितों !
क्षुधा लागतां कांदा-भाकर यथेच्छ मी जेवितों !
फिरतां फिरतां करवंदें हीं तोडुनि मी भक्षितों-
रानीं तोडुनि मी भक्षितों !
काठीनें मी कांटे दाबुनि बोरेंही तोडितों.
धनिका ताट रुप्याचें जरी,
पांचही पक्वान्नें त्यावरी,
नाहीं गोडि सुखाला परी !
गाई-संगें हिंडुनि रानीं थकुनि सुखें जेवितों-
जाडेंभरडें खाउनि धनिकाहूनि अधिक तोषतों ! २
पुच्छ उभारुनि थवा गाइंचा ज्या वेळीं नाचतो—
मजेनें ज्या वेळीं नाचतो,
मोर-मुकुट बन्सीवाल्यापरि मौज उभा पाहतों !
ओहळावरतीं थवा तयांचा पाणी जेव्हां पितो—
निर्मळ पाणी जेव्हां पितो,

उभा राहुनी प्रेमें त्यांना शीळ अहा घालितों !
कशाला मंदिल मज भरजरी ?
घोंगडी अवडे काळी शिरीं !
दंड करिं गाइ राखण्या परी !
कुवासना घालिति धिंगा तो महाल मी टाकितों—
नृपाचा महाल मी टाकितों !
गाईसंगें हवेंत ताज्या नित्यचि मी राहतों ! ३
क्रोध, काम, मद, मत्सर यांहीं गांव सदा गर्जतो—
भांडणें गांव सदा गर्जतो !
दूर टाकुनी त्यास शांतिनें सुखें दिवस लोटितों !
समाधान हा परिस अहा मज रानांतचि लाभतो—
अहा मज रानांतचि लाभतो,
दु:खाच्या लोहास लावितां सुख सोनें बनवितो !
चढल्या पडावयाची भिती;
गरिबा अहंकृती काय ती ?
काय करि त्याचें खोटी स्तुती ?
परवशतेच्या बिड्या रुप्याच्या पायांत न बांधितों—
मृदुळ तरि पायांत न घालितों;
निज हृदयाचा धनी धरणिचें धनित्व अवमानितों ! ४

—भास्कर रामचंद्र तांबे

---

१२ धर्म युद्धांतून पळत आहे, व कर्ण त्याचा उपहास करीत आहे.

आर्या.

हांसत हांसत तो वृष बोले, " जन्मोनि शुद्ध संतांनीं,
कोण पळेल क्षत्रिय-धर्मीं शिक्षित असोनि संतांनीं ? १

कां पळशी मरण-भयें, होतां हांसें कशास वांचावें ?
सांचावें लज्जेचें ओझें माथां सदैव कांचावें. २
युद्धीं परमार्थ मिळे, निश्चित मिळणें पलायनें तोटा,
हें जाणोनि पळे तो मातेच्या रोग पातला पोटा. ३
न क्षत्र-धर्म कुशल, ब्राह्मण-धर्म-प्रवीण तूं सौम्य !
वाटे पढवी उचित स्वाध्याय-मखक्रियाच तो धौम्य ! ४
कुंतीसुता, इतःपर युद्ध करायासि गांठि वीरांशीं--
घालूं नको नकोची, स्पर्धाहि करूं नकोच धीरांशीं ! ५
आम्हां वीरांप्रति तूं यावरि अप्रिय वदों नको लेश,
वनकोल-यूथ-नाथें जिंकावा केविं यज्ञकोलेश ? ६
जा, गा महानगुणा, दिधलें तुज जीवदान, जा जा गा;
जागा दाटुनि केल्या हरि वांचाया नसे गजा जागा. " ७

—मोरोपंत

१३ हिरण्यकशिपु–वध

[हिरण्यकशिपु नामक दैत्य होता. यास ब्रह्मदेवाचा असा वर होता कीं, त्याला मनुष्याकडून, किंवा इतर कोणत्याही प्राण्याकडून मृत्यु येणार नाहीं; शस्त्रानें मृत्यु येणार नाहीं; अथवा भूमीवर, आकाशांत, दिवसा, रात्रीं, घरांत, बाहेर, कोठेंच मृत्यु नाहीं. असा वर असल्यामुळें विष्णूनें अर्धा मनुष्य, अर्धा सिंह असें रूप धारण करून संध्येच्या वेळीं, नखांनीं, घराचे उंबऱ्यावर बसून त्यास मारिलें. या विष्णूच्या रूपास नरसिंह-अवतार असें म्हणतात. या हिरण्यकशिपूचा मुलगा प्रल्हाद हा मोठा विष्णुभक्त होता.]

श्लोक

पसरट मुख मोठें, आंत दाढा कराळा,
परम चपळ जिव्हा, खड्ग जैसा निराळा;
नयन युगुळ जाणों तापलें हेमपाणी,
बहु-भुज, नख-शस्त्रें, देखिला चक्र-पाणी. १

सिंहावरी त्या मग दैत्य—हस्ती,
    धावे गदा घेउनि थोर हस्तीं;
पतंग अग्नीवरी जेविं जातो,
    हाणी गदा थोर अधोक्षजा तो. २
विधिवर-प्रतिपालक जो हरी,
    न दिवसांत, निशींतहि, संहरी;
म्हणुनि युद्ध निशा-मुखिं तो करी,
    मग वधी बुडतां रवि, लोकरी. ३
अमर तो मरतो अतिलौकरी,
    चपळ तो पळतो धरितां करीं;
उसळला खळ लाघव-लक्षणी,
    विलपती लपती सुर त्या क्षणीं. ४
आश्चर्य हें नृहरि मानुनिया महास्यें,
    सक्रोध हास्य करि उत्कट अट्टहास्यें;
तों झांकले नयन, भीति मनीं निघाली,
    मांडीवरी हरि अशास धरूनि घाली. ५
न धरणीवरि मृत्यु न वा नभीं;
    वर असा म्हणवूनिच तो न भी;
निज-तनूवर त्या खळशेखरा—
    चिरि धरूनि, करी वर तो खरा. ६
न गेहीं, न बाहेरि, यालागिं दारीं,
    बसे उंबरा, पोट त्याचें विदारी;
स-जीवें, अ-जीवें मरेना तसाची,
    चिरूनी नखें तो करी गोष्टि साची. ७
चुळबुळे, निसटे, करि तांतडी—
    असुर; तों हरि काढुनि आंतडीं,

उदर फाडुनि घालितसे गळां,
 करि सु मंगळ देव अ-मंगळा. ८
पदतळें, कितएक नखें, करें,
 तुडविले दनुजेंद्र मयंकरें;
असुरनाथ-नृपासन, त्यावरी,
 हरि बसे, परि कोप न सांवरी, ९
स्तविति देव, 'अजी कनकांबरा,
 असुर मारियला', म्हणती 'बरा !'
परि न आंवरि कोप रमापती,
 सभय लोक चतुर्दश कांपती ! १०
मग प्रल्हादातें म्हणति अवघे, भक्त-परमा,
रमा, ब्रह्मा, खिन्न स्वकृत-विभु-कोपाभ्युपरमा;—
'रमाकांता ये ना तुजविण कृपा दैत्य-दमना,
मनाच्या विश्रामा त्वरित करिं गा कोप-शमना'. ११
ज्याला भिती देव, विरंचि, पद्मा,
 प्रल्हाद त्याच्या धरि पाद-पद्मा;
आणी जया वंदिति सर्व भूतें,
 करी तया दंडवत प्रभूतें. १२
बाळकें स्वचरणांबुरुहातें—
 वंदितां, प्रभु जगद्गुरु हातें—
उचलुनी, अवलोकुनि, ठेवी;
 मस्तकीं अभय—हस्तक ठेवी. १३
करस्पर्शें झालें परम सुख त्या दैत्य-तनया,
न या संसाराचें स्मरण उरलें त्या सुविनया,
नद्या नेत्रीं दोहीं स्त्रवति, न निघे शब्द सगळा,
गळा दाटे प्रेमें, त्वरित हरि घे मोहुनि गळां ! १४

—वामन

१४. श्रीकृष्णाचा धृतराष्ट्रास उपदेश

[कौरवपांडवांचा सल्ला व्हावा म्हणून कृष्ण कौरवांकडे वकिली करण्याकरितां गेला. त्या वेळीं त्यानें कौरवांस अनेक तऱ्हेनें बोध करून शेवटीं धृतराष्ट्रास हा पुढील उपदेश केला.]

आर्या

देव म्हणे " धृतराष्ट्रा, राया, मोठी जगीं तुझी पदवी,
पद विद्यांचें तूं, परि परिस, मज बळेंचि आत्तता वदवी. १
जें मेळविलें चंदन-सम झिजवुनि परसुखार्थ अंगातें,
केवळ कृपाळु-पूर्वज-सद्यश मळविशि बळेंचि कां गा, तें ? २
दुःख परासि न द्यावें, सत्य वदावें, क्षमा न सोडावी,
जोडावी कीर्ति, अशी कुलरीति तुम्हीं कधीं न मोडावी. ३
केले गुप्त-प्रकट व्यवहार अनर्थ-हेतु तनयानें,
ते कां न वारिले त्वां ? कैसें होईल कुशल अनयानें ? ४
मुख्य-स्वबंधु पांडव, तन्नाशातेंचि हे अकवि टपती,
विश्वस्तां मीनांतें खायाला बक जसे सदा जपती. ५
त्वन्नंदन दुर्मति हे क्षिति बुडवायासि, तापदा आली—
काळाच्या क्रीडेची तुझिया व्यसनांत आपदा आली. ६
या व्यसनातें चिंतुनि, मन कुदशेला भिऊनि हळहळतें,
शमवावें त्वां, प्रभुनें जेविं शमविलें पिऊनि हळहळ तें. ७
स्वसुतांसि शमीव, नृपा स्वसख्यासह शमविजेल भीमहि म्यां,
पुत्रा अजातरिपुच्या, तूं साक्षाद्गुरुहि, तरिहि भी महिम्या. ८
तूं प्रभु, सुयोधनादिक हे पुत्र तुझ्या करीं असावेच.
अन्यरणीं प्राणांचा योग्य, परि न योग्य हा असा वेंच. ९

वाढिव धर्मं प्रेमें, वाढवि मज जेविं नंद नवनीतें;
सत्पुत्रांनीं भवनीं, सुरतरुंनीं न सुख नंदनवनीं तें. १०
पांडव सहाय असता तुज होतिल सर्व लोक वश्य, पहा,
त्वद्भाग्योत्कर्षातें श्रवण करुनिया म्हणेल कश्यप, हा! ११
म्हणतो युधिष्ठिर, 'नको पायें लोटूं मला अवनतातें',
वचनकराऽपत्याचें न करावें काय हो अवन तातें? १२
क्रमिले तसेचि कथिले होते त्वां त्यांसि अब्द तेरा जे,
धन्य म्हणत होते जे लावितिल तुलाचि शब्द ते राजे. १३
बहु सत्य, बहु प्रिय, बहु हित, बहु मत,
बहु दुराप, बहु रुचिर,
शुचि, रम्य, क्षीराधिजानन-चंद्र-चकोर
बोलिला सुचिर. १४

—मोरोपंत

१५. केरोपंत नाना

[केरोपंत नाना वारल्यावर ही कविता दोनचार ठिकाणीं प्रसिद्ध झाली होती, व ५।६ वर्षपर्यंत ती विद्यार्थि-वर्गाचे तोंडीं होती. यांतील केरोपंत नानांचें वर्णन, त्यांजविषयीं इतर लोकांचा असलेला आदर व विद्यार्थि-वर्गाचा भक्तिभाव चांगल्या प्रकारें व्यक्त करीत आहे.]

['चाल—'कांते फार तुला मज॰']

केला काय अम्हीं दीनांनीं दोष तुझा देवा।
तो तूं आमुचा नानागुणगणमंडित
नाना ओढुनि न्यावा॥ ध्रु०॥
लवहि नसे अभिमान जयाला।
विद्याधनदानीं जो रमला।
छत्र अनाथां, मित्रां प्राणचि।
गुणि लोकांचा पूर्ण विसांवा॥ १

कोण असा गुरु हो शिष्यांसी ।
  कोण धुरंधर मान्य जनांसी ।
बाळां संगें बाळचि केवळ ।
  थोरांमाजीं थोर दिसावा । २
सत्या वाणि सदा शुचि मानस ।
  शोधकतेंसि नसे सरि ज्याच्या ।
आर्यांबेच्या पोटीं दीपक ।
  गोविंदानें कुठवरि गावा ? ३

—गो. वा. कानिटकर

---

१६. कर्णाप्रत श्रीकृष्णाचें भाषण

[कर्णाचें व अर्जुनाचें युद्ध चाललें असतां, कर्णास शाप होता त्याप्रमाणें त्याच्या रथाचें चाक भूमीनें गिळिलें व त्यास शस्त्रास्त्रें आठवतनाशीं झालीं. मग तो रथाखालीं उतरून पृथ्वीनें गिळलेलें चाक उपटीत असतां अर्जुन त्यावर बाण सोडूं लागला. तेव्हां कर्ण कृष्णार्जुनांस म्हणतो, मी विरथ असतां तुम्ही माझ्यावर शस्त्रवृष्टि करितां हें योग्य नाहीं. हें धर्मयुद्ध नव्हे. यावर कृष्ण त्यास पुढील उत्तर देतो.]

आर्या

कृष्ण म्हणे, 'राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें;
नीच व्यसनीं बुडतां निंदिति देवासि, न स्वकर्मातें ! १
जेव्हां तूं, दुर्योधन, दुःशासन, शकुनि एकमति झालां,
कैसे कपटद्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां ? २
जेव्हां सभेसि नेली पांचाली, मानिलें मनीं शर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ३
राज्य न देशी, करवुनि वनवासाज्ञातवासही जेव्हां,
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना, तेव्हां ? ४

चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले नृपें असें खोटें–
कर्म करवितां कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें ? ५
फेडी वस्त्र सतींचें जेव्हां उघडें करावया आंग,
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां ? वृषा सांग. ६
खर-दुर्वाक्य-शर शतें भेदित होतासि जेधवां मर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ७
अभिमन्यु-बाळ बहुतीं वधितां त्वां वारिलें न तें कर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ८
पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि तो जसा कुचला,
आतांचि बरा सुचला ! धर्मगृहा सर्व व्हा परासु चला ! ९
मागेंच तुम्ही भजतां धर्माला तरि तुम्हांस वांचविता;
आतां मरा; न वांचे दीप्तगृहीं, जो न तोय सांचविता ! १०
रक्षावा धर्म असा करिशी उपदेश, तरि असे मान्य;
रक्षितसों धर्मातें, आम्हांला धर्म ठाउका नान्य ! ११
हा धर्म मूर्तधर्म प्रभु, यातें भजतसों; असा मान्य–
लोकांत कोण दुसरा ? सामान्य नव्हेचि हा, असामान्य !'

—मोरोपंत

---

१७. मार्कंडेयाख्यान

श्लोक

पूर्वीं एक मृकंडु नामक मुनी सत्कर्म-धर्मार्थिला,
कांतेनें प्रियकांत तो प्रियपणें पुत्रार्थ जो प्रार्थिला;—
'संतानाविण हें जिणें जड जगीं, संसार निःसारसा-
भासे, यास्तव हो स्तवा पशुपती, मागा कुळोद्धारसा'. १

जाणोन हृद्गत तिचें मुनिराज-राजें,
हें मी सुखी करिन फार सुतातुरा जे;

आरंभिलें गिरिदरींत महातपातें,
सोसूनिया कठिण-वात हिमातपातें. २
ध्यानीं बसे मुनि उदार सदाशिवाचे,
पंचाक्षरी-प्रमुख मंत्र जपोनि वाचे;
ऐसें पुरश्चरणसंचित फार झालें,
शेखीं तयासि निजपुण्य फळासि आलें. ३
झाला प्रसन्न मुनिमान्य पिनाकपाणी,
बा रे अभीष्ट वर माग ?' म्हणे सुवाणी.
'मी तों विरक्त, विभवादि नको, परंतू-
संतान एक मज दे कुळ-हेतु-तंतू'. ४
त्यानंतरें शिव सनातन-कर्मसाक्षी,
बोले सखोल, तनुअर्ध जया मृगाक्षी;
'देईन दान परि एक विधान भासे,
तूं एक माग मग, लाग विवेक-कासे. ५

साधू, सुंदर शाहणा सुत, तया सोळाच वर्षें मिती,
जो कां मूढ कुरूप, तो शतवरी वर्षें असे स्वस्थिती;
या दोहींत कसा मनांत रुचला तो ग्यां तुतें दीधला'.
झाला थोर तटस्थ ऐकुनि मुनी दोहींकडे वेधला! ६

मग म्हणे मुनिराज, 'कृपानिधी! घरिं विचारुन येइन आवघीं;
निजवधूसि कसा सुत मानला! पुसुन येइन, सांब-शिवा, भला'.

त्वरितगति निघाला, शीघ्र सद्मासि आला,
प्रियवधुसि वराला सांगता सांग झाला;
मग सति पद माथां वंदुनी प्राणनाथा,
कथि न सुरस गाथा, सर्व संसारचाथा. ८

'सारासार विचार-पंडित, महाचातुर्य-चिंतामणी,
विद्या-वेद-विनोद-वाद बुधता, वेदांत-बोधाग्रणी,

रूपें सुंदर, देह दिव्य धरिला थोड्या वयाचा जरी,
वंशोत्तंस, अभंग, मंगळनिधी, कल्याणकारी तरी. ९
धीमंत तो करि सुकर्म निजस्वभावें;
कर्मे स्वधर्म उजळेल गुण-स्वभावें;
धर्मेंच मर्म समजेल, तदा भवारी,
तुष्टेल इष्टद सदाशिव; कष्ट वारी'. १०
आकर्णोनि सुपर्णसा पुनरपी पूर्वस्थळा पातला,
साष्टांगें प्रणिपात त्या मुनिवरें पादांबुजीं घातला;
'दे देवा, मज पुत्र सुंदर, भला, ज्ञाता, सुहृत्तापहा !'
गौरीनाथ 'तथास्तु' बोलुनि निजस्थानासि गेला पहा ! ११
आश्रमीं मग मुनि प्रमदेशीं। नांदतां गिरिगुहान्तर-देशीं;
गर्भचिन्ह धरिलें,पति पाहे। तों म्हणे मुनि,'महेश-कृपा हे'. १२
'मार्कंडेय' अशी मृकंडुमुनिनें नामाभिधा ठेविली;
वाटे बालक बोबडें जंव वदे, ते वाक्सुधा सेविली;
झाले वत्सर पांच, योग्य म्हणुनी केला द्विजाती भला,
झाला धर्म-निधान तो, गुरुकुळीं विद्या भली लाधला. १३
तर्कव्याकरणादि-नाटक-कलालंकारशास्त्रांतरीं—
ज्याचा खेळ, अशी विशाळ झळके प्रज्ञा-प्रभा अंतरीं;
लीलाप्राय समस्त प्राकृत कथा-वेदान्त-सिद्धान्त ते,
हातीं आमलका समान डुलतीं, सांगों किती काय तें. १४
वर्षावरी स्वसुख वर्षत वर्ष जातां,
चिंता तशी तशि उठे बहुहर्षजाता;
मातापिता उभयतां भय-ताप संगें,
संतप्त गुप्त रुदती बहुता-प्रसंगें. १५
'हा संकटा ! कटकटा ! विकटा ! कपाळा !
कां दीधला सुत मला, सुरलोकपाळा !

होतों सुखी न गणतांचि अशा भयातें;
दैवा! फुटे हृदय, आठवितां वयातें!' १९
मार्कंडेयाकारणें माय बापें। झालीं दीनें, शोषलीं शोकतापें;
'वर्षे गेलीं पंधरा आजि याला। एका वर्षें केविं देखों तयाला!'
धरिल धाक मनीं वदतां तया।
बहुत मानिल हा रुदतां भया;
म्हणुनि ना रुदती, वदती भिती।
उभयतां सहज स्थिति दाविती. १८
परंतु तें दुःख मनीं न झांके। सर्वेंद्रियां शोक-समुद्र फांके;
येती बळें लोचनिं बाष्पधारा। या इंगितें जाणविलें कुमारा.
जोडुनि हात वदे मृदु मात, कशास मनांत विखेद करां?
काय उणें पडलें मजपासुनि?' पाय नमी विनवी पितरां;
कंठ सगद्गद बोलति ते 'शितिकंठ-वरें दिधलासि बरा,
संकट घालुनि शंकर दे वर, शंकितसों सकळंक वरा'.२०
रुदित होति त्याप्रति निरोपितां। वदति यापरी माउली, पिता;
'शिवशिवा!असा खेद कासया।करितसां तुम्ही?नाहिं नाश या.
शिव दयाळु जो दे सुसंतती। भजति, त्यांचिया रक्षितो तती.
अजि तया उणी काय संपदा। विनटतां पदां वारि आपदा'.२२
पूजानुरक्त, बहुभक्त, विरक्त झाला,
चित्तीं जपे सतत सांब पदांबुजाला;
'मृत्युंजयाविण जगीं भय कोण नाशी?'
निर्धार हा समजुनी नियमी मनाशी. २३
जपत जपत, ऐसा तो करी तीर्थयात्रा,
धवल शुभ विभूती लावुनी सर्व गात्रा;
स्फटिक-मणि-गणाच्या रम्य रुद्राक्षमाळा,
करिं, शिरिं, निजकंठीं, नित्य घाली सुढाळा.२४

हृत्पद्मीं शिवपादपद्म धरुनी पद्मासनीं बैसला;
जैसा पद्मज पद्मपाणि-युगलीं प्रार्थी, तसा भासला;
त्या काळीं विकराळ सेवक यथाकाळीं मुनींद्रावरी—
काळें पाठविले बळें क्षितिवरी, त्या कोण बा आंवरी ? २५

आले गर्जत खड्ग-खेटक-गदा-पाणी, दणाणी धरा !
हातीं झेलित वागुरा निगदती, 'ओढा, विदारा, धरा !'
धावा घेत उफाळती द्विजवरातें लक्षिती लोचनीं,
तों भ्याले शिवमूर्ति देखुनि दिठी ध्यानीं जनीं मोहिनी ! २६

भ्याले असें समजुनी शिवपूजनातें,
लेखीच ना मुनि मनांत रिपू-यमातें !
वाचेसि नाम जपतां शिवशंकराचें,
सामर्थ्य लेश न चले यम-किंकरांचें ! २७

क्रोधें काळ उफाळला, भुजबळें जाळें झुगारी गळां,
तों झांकोनि दिठी, शिवाप्रति मिठी मारी मुनी आगळा;
लिंगाही समवेत पाश पडतां हांकारिलें ब्राह्मणें,
'शंभो, शंकर, धूर्जटे, पुरहरा ! आतां नुपेक्षीं' म्हणे. २८

निरखुनि यम डोळां मारिली लात देवें,
क्षण न लगत भूमी पाडिला वामदेवें;
सुरवर सुमनांचे वर्षती भार भारी;
मुनि नमुनि उभा तो धीट जैसा इभारी. २९

मृकंडूच्या बाळा धरि हृदयिं कालांतक करें;
म्हणे, 'बा रे वत्सा, भजन जळ मत्स्या न विसरें;
जनांमध्यें कांहीं भयलव कदाही तुज नसो,
चिरंजीवी होई हृदयिं विष-बाधा तुज नसो !' ३०

—आनंदतनय

१८ किरात-अर्जुन युद्ध.

[शंकरापासून पाशुपतास्त्र मिळावें म्हणून अर्जुन तपश्चर्या करीत होता. त्याची परीक्षा पाहावी म्हणून शंकर किरातरूपानें अरण्यांत आले. त्या वेळची ही कथा आहे.]

आर्या

जिष्णूग्रतपें भ्याले सर्व तपःश्रीविलास सदन मुनी,
कैलासाप्रति जाउनि कथिती श्रीशंकरासि पद नमुनी. १
भगवान् म्हणे, 'न भ्यावें त्याचा संकल्प शुद्ध मी जाणें,
स्वस्थ-मनें स्वस्थाना-प्रति टाकुनि भीतिला तुम्हीं जाणें'. २
मुनि जातांचि किरातत्वाच्छादन मूर्तिसम्पदेवरि घे;
जेथें पार्थ तप करी त्याचि वनीं साऽनुकम्प देव रिघे. ३
आला किरातरूपी शिव जिष्णुसमीप, तोंचि हननाश—
दानव वराहरूपी मूकहि, करि जो तपस्वि-जन-नाश. ४
दुष्टासि एकदांचि प्रोक्षिति ते वीर पार्थ-भव दोघे,
म्हणती, 'शर-प्रहारा, तापस-जन हाय हाय न वदो, घे'. ५
खरतर नर-हर-शर पर-जीवन एकक्षणींच संहरिती,
सम देवभक्त ऐसें जाणों कळवावया असें करिती. ६
अर्जुन म्हणे 'किराता, त्वां मृगया-धर्म लंघिला दर्पें,
स्वांतार्थ मजपुढें अग्र केलें, खग-पतिपुढें जसें सर्पें. ७
हा प्रथम मत्परिग्रह असतां त्वां ताडिलें कसें किरितें?
पाथरवटें स्वटंकें भेदावें वज्र-पाणिसह गिरितें?' ८
त्यासि किरात म्हणे, 'रे मद्धन हें, प्रथम म्यांचि हा पिटिला,
म्यां वधिला असतां तूं कोण शरें हाणणार या किटिला? ९
खद्योतत्व सम असो, रवि कीं तिमिरासि काजवा खाणी?
नवल, रविपुढें कीट स्वकृत तमोनाश-काज वाखाणी! १०

मिरविसि सुज्ञत्व वृथा अन्याला स्वकृत ताप लावूनी,
काय न दगड तपस्वी? भिजला वृष्टींत, तापला ऊनीं! ११
जोडुनि पुण्य-वनीं तप, बुडसी त्याच्या भरेंचि गर्वतमीं,
तूं मजपुढें किती रे! कोण हरिपुढें म्हणेल पर्वत मी? १२
हो सिद्ध जरि असेल स्व-तपो बल-गर्व सज्ज चाप करीं,
होशील विमद, पडला गरुडाच्या जेविं मत्त साप करीं'.
तें वाक्य अर्जुनाला, गरळ जसें यामुनाऱ्हदा, कढवी,
पढवी जो चापश्रुति रामासि, तयावरी स्वधनु चढवी. १४
शर ते जाणों वाहे एक निमेषांत एक लाखोली,
प्रभुची जाणेल कसा बाहुबळें तोचि एकला खोली? १५
स्वरवें गिळों न देते कवलहि सिंहा विदारितेभा, ते—
सरले शर, दोन्हीही झाले सहसा तदा रिते भाते! १६
भ्याला, परि धैर्य धरुनि ताडी त्या ईश्वरासि कोदण्डें,
देता विश्वकवळित्या उग्रा काळासि कम्प जो दण्डें. १७
जें युद्धांत म्हणे, 'हो भास्करजी, न करजाल विकिरा, तें—
गांडीव धनुहि हरिलें कामाद्यरि-मद-तमो-रवि किरातें' १८
ज्याचा पाद म्हणे, 'रे भक्तभवा स्वकुदशा न कर, वाळ,'
त्यावरि धनंजयाचा भंगे, पात्रे यशा न करवाळ. १९
प्रभुला जिंकूं पाहे भुजयुद्धीं, जेविं काजवा सवित्या,
परि तोषवी स्वधर्में आराधुनि भक्त-राज वासवि त्या. २०
'मृत्युभयासि तराया न जडसुधेचें धरा चिबुक' लीला—
ज्याच्या असें सुरासहि म्हणती, तो प्रभु बराचि बुकलीला.
शोणित वमला, श्रमला, भ्रमला गमला नुठेलसा पडतां,
परि उठला, मोह कसा राहेल दयाकटाक्ष सांपडतां? २२
न पहाते झाले हो पूर्वीं कौतुक कदापि नाकी, तें;
विजयार्थ शरण गेला नर नत कामद-पदा पिनाकीतें. २३

वाहे पार्थिवलिंगीं भावें जें माल्य तो प्रतापार्थ.
पाहे तेंचि पुरस्थ स्व-मङ्घ्र किरात मस्तकीं पार्थ. २४
पाय धरुनि पार्थ म्हणे, 'ब्रह्मांडीं अघ न माय, बा पाहें,
तूंचि हरीं पंक, हरिल अमृताचा न घन मायबापा, हें! २५
प्रभुजी, क्षमा करा जी, मागतसें पसरुनि स्वपदरा मी,
या दासींहि करो हें पदयुग, जैसें करी स्वपद रामीं'. २६
नमुनि 'क्षमस्व', म्हणतां प्रकट करुनि रूप, बाहुनीं कवळी,
अधराप्रति सितानें, स्वयशानें त्रिभुवनासही धवळी. २७
'सर्वत्र रणीं विजयी तूं नारायणसखा नगा, हो रे!
स्वप्नींहि अयश तुझिया अवलंबुनि, पदनखा न राहो रे'. २८

—मोरोपंत

१९. रुक्मिणीविवाह-कथा

[पांडवस्त्रिया व श्रीकृष्णस्त्रिया एकमेकींस आपापल्या लग्नाच्या कथा सांगत आहेत. त्यांत पहिल्यानें रुक्मिणी आपल्या विवाहाची कथा सांगत आहे.]

आर्या

प्रथम म्हणे वैदर्भी, " बाई, होतें लहान मी कन्या,
धन्या कृष्णकथा मज तेंव्हांचि रुचे, न आवडे अन्या. १
ज्या दिवशीं हरिचरित-श्रवण नसे, त्यांत मज दहा दुखणीं!
दुखणी काय, नवखणी माडी नलगे, धरा नखें दुखणीं. २
श्रीकृष्णाला द्यावी, श्रीरामा जानकी तशी, दुहिता—
ऐशी गुरुबुद्धींनीं केली, बाई, विचारणा सुहिता. ३
रुक्मी माझा दादा, जो आम्हां साजणांमधें मोठा,
खोटा नव्हेचि परि हरिचरितरसीं तो भिजे न मणिमोठा! ४
त्या स्वगुरुविचारातें निंदुनिया मोहरोगवैद्यातें,
मजला देऊं केलें दादानें हट धरूनि चैद्यातें. ५

केला लग्नाचाही निश्चय चैद्यासि धाडिलें मूळ;
गूळ क्ष्वेडचि वाटे मज, तातविचार होय पांगूळ. ६
एक ब्राह्मण केवळ साधु, दयामूर्ति, तत्पदीं नमनें—
केलीं, पाय धरुनि म्यां एकांतीं विनविला सुदीनमनें. ७
कां तो द्रवता माझा असता जरि भाव पाहिला खोटा?
जेणें अभय–वर दिला, त्या गुरुहस्तांत म्यांहि लाखोटा. ८
स्वकरें वसंततिलकावृत्तें पत्रांत सात मोजूनी—
लिहिलीं होतीं, तींहि लिहितां लिहितां क्षणांत योजूनी. ९
गेला धावत घेउनि मत्पत्र द्वारकेसि सद्विप्र,
त्या प्रणतवत्सलाला आणाया आण घालुनि क्षिप्र. १०
तों आला शाल्व-मगध-पति-सख तो चैद्य, मांडलें लग्न,
झालें पुर तत्बळ-जळ निधींत, आधींत मन्मनहि मग्न. ११
तांतडि बहु दादाची, कैंचा अवकाश, लागली हळद,
खळदर्पघ्न दिसेना, जो नतचातक-दया-सुधा-जळद. १२
चिंताज्वरांत रात्रौ माझा नाहींच लागला डोळा,
जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा! १३
तोंचि समूलाधि-ज्वर-हर मात्रा आणुनी उषःकाळीं—
आला द्विज-धन्वंतरि, सदय पिताही तसा नसे बाळीं. १४
आधीं विप्रमुखश्री कळवी येतांचि माधवागमन,
मग मुनि सांगे मज, तों ऊठ म्हणे गुरुपदास लाग, मन.
विप्रें कथिलें मज कीं, 'वत्से, लिहिलेस उत्तमश्लोक,
ज्यांच्या अर्थ-श्रवणें आला धावोनि उत्तमश्लोक'. १६
अंबेच्या नमनाला न्यावी, जीचा विवाह, नवरी ती,
धरि हरिशंका दादा, देवीयात्रा कुळीं, न नवरीती. १७
मग बाई, दादाचे, मागधशाल्वादिकांहि मेल्यांचे—
सैनिक मज रक्षाया आले, धाकें विरोनि गेल्यांचे. १८

पूजुनि पाय विनविली, 'कन्यांतें प्रसवतात ज्या माता—
त्या लटिक्या, तूंचि खरी; तुज कृष्णचि योग्य होय जामाता'.
देवीप्रासादांतुनि निघतां, द्याया करास आलीला—
आलीला धरुनि करीं दाखविली त्या गर्तेंत आ लीला. २०
त्या मेल्यास कशासी पाहूं मी प्रियतमास अवलोकीं,
कीं आला कीं नाहीं, होय तडित्स्फुरण काय तंव लोकीं!
पत्रीं लिहिलें होतें, 'देवीयात्रेंत मज पदें दावा;
दावा बहुतांशीं, हा भाव कळों दुर्जनासि नेदावा'. २२
प्रभुसि पहाया पूर्वींपासुनि मन्नेत्रपद्म बहु लोल,
तो लग्न-समय, तो उपवासहि, लावील कोण सखि बोल?
माझा मूर्त मनोरथ, तो रथ आला प्रियास घेऊन,
दर्शन नयनें घेती, जैसें शिशिरीं दरिद्र घे ऊन. २४
माळा उंचवितां, प्रिय आपणहि रथावरूनिया लवला,
लव लागेना तों घे अंकीं, करुणासमुद्र कालवला. २५
हरि-नील-निभ-वरांकीं बसलें, न श्री घनीं तशी चपळे;
गेला घेउनि हरि निजभाग सुखें, त्यासि म्हणति नीच पळे.
हंसें मुक्ता नेली, मग केला कलकलाट काकांनीं,
हाकांनीं नभ भरिलें, जाय सुरांच्याहि नाद हा कानीं. २७
पुष्कळ बळ खळ घेउनि हरिवरि आले नृपाळ ते कुतरे,
उतरे एकहि न कशीं कनकासीं कोटि मांडतां धुतरे. २८
मग आला गे बाई, दादा मज सोडवावया कोपें,
तो पेंव वृश्चिकांचें लोकां, परि या खगध्वजा सोपें. २९
स-मनोरथ-रथ शस्त्र प्रभुनें केला पळांत तो भग्न,
नग्न स्वखड्गाहि वधा तों मन्मन होय शोकाविनिमग्न. ३०
अभय-प्रद-पदपद्मीं म्यां तेव्हां घातली मिठी घट्ट,
घट्ट क्षणभरि झाल्यें, केली स्वाभाविका त्रपा गट्ट! ३१

केला न वध, तदधिक श्यालाची दुर्दशा सये केली,
केली हरि जरि करि तरि करिमदशोभा दिगंतरा केली. ३२
द्रौपदि, अशी कथा हे लग्नाची, फार मी वदों काय,
धाय प्रभुचे संतत पूजावे, तरिच सफळ हा काय." ३३

—मोरोपंत

---

२०. सुखाची कल्पना

[मनुष्यजन्मापेक्षां आपणाला ताऱ्याचा, फुलाचा, झऱ्याचा, झाडाचा, कोकिल अगर इतर एखाद्या पक्ष्याचा किंवा भुंग्याचा असा कोणचा तरी जन्म आला असता, तर बरें झालें असतें, असें कल्पून व त्या त्या जीवितांतील विशेष आकर्षक व आनंदकर अशा गोष्टी कोणच्या यांचें वर्णन करून कवयित्री या षड्विकारमय मनुष्यजन्मांतून आपणास सोडविण्याविषयीं ईश्वरास विनवीत आहे.]

[चाल—'आनंदी आनंद गडे०']

जन्म कशाला हो मजला,
ईशें न कळे हा दिधला;
तारा जरि मी नभिं होतें,
जग तेथुनिया तरि बघतें;
चम् चम् करुनी नभःपटीं,
स्थिर मनुजांच्या मनःपटीं,
जन्म सुखाचा,—तो गमतीचा,—त्या ताऱ्यांचा,
येता जरि, तें मला किती,
होतें सुख त्या नसे मिती ! १
जन्म सुमांचा जरि येता,
सुख होतें उद्यानीं फुलतां;
स्थान प्रीतिचें मनुजांच्या,
होतें मग मी सुजनांच्या;

प्रभुचरणांवरि मी जातें,
रमणीकचपाशीं वसतें;
चिन्ह प्रीतिचें,—मी गमतीचें,—युवयुवतीचें,
होउनि बसतें या भुवनीं,
मौज सुमांची किती जनीं. २

निर्झर जरि झालें असतें,
म्हटलीं असतीं मधुगीतें;
धावत हासत गाऊनी,
उड्या किती तरि घेऊनी,
जन-नयनाला सुखवीतें,
काव्यीं गुंगुनि मी बसतें.
झुळु झुळु तो,—वाहत जातो,—जना सुखवितो,
निर्झर जगतीं सुखी असे,
उपमा त्यातें कुठे नसे. ३

तरू जरी झालें असतें,
आश्रय कितिकांना होतें;
छाया श्रांत जनांस तरी,
होती माझी किती बरी;
फळां-फुलांनीं मोद-भरें,
स्वागत त्यांचें करितें रे!
विहंगमांनीं,—आनंदांनीं,—म्हटलीं गाणीं,
तरूवरी त्या बैसुनिया,
सार्थक होतें जगुनिया. ४

मधुर नाम किति कोकिल तें,
मिळतें तरि सुखी मी होतें;

फुललेल्या अम्रावरतें,
गात पंचमीं मी बसतें;
वसंत-सुख मी होउनिया,
तत्संगानें राहुनिया,
ताना घेतें,—सुंदर गीतें,—किति तरि गातें,
परि आतां तें सौख्य नसे,
हुर-हुर रात्रंदिन भासे. ५

विहंग-जन्मा मी घेतें,
सौख्य किती मज तइं होतें;
प्रातःसमयीं सूर्याचें,
स्वागत करितें मौजेचें;
वृक्षकोटरीं मी बसतें,
उंच भराऱ्या नभिं घेतें;
बहु उंच मी,—जाउनि व्योमीं,—विश्वस्वामी,
कोण असे तो कुठे वसे,
बघण्या जातें मोदरसें! ६

जन्म भ्रमरा! तव नामी,
येता तरि सुखि होतें मी;
कुसुमीं बसतें मौजेनें,
गुङ् गुङ् गातें लीलेनें;
गंधयुक्त तो मकरंद,
सेवुनि गणतें आनंद.
त्या उद्यानीं,—सुमरसपानीं,—गुंग होउनी,
बाह्य जनाला विसरुनिया,
सुखि होतें मी याहुनिया! ७

आस असे या जगीं भारी,
सोडुनि जावें गमे दुरी !
क्रोध लोभ हे खरोखर,
राज्य करीती निरंतर;
ईर्षा मत्सरही माजे,
यांचा डंका जगिं गाजे;
सोड येथुनी,—त्वत्पदसेवनिं,—सुख मी मानीं,
केशव हरि नारायण रे !
विनती माझी ऐक त्वरें ! ८

—वेणूबाई दाणी

---

२१. कृष्णानें कौरवांस व पांडवांस दिलेलें साहाय्य

[भारतीय युद्धापूर्वी कृष्ण व यादव यांचें आपणास साह्य मिळावें, म्हणून अर्जुन व दुर्योधन दोघेही कृष्णाकडे आले. कृष्ण म्हणाले, तुम्ही दोघेही आप्त, म्हणून तुमच्या युद्धांत मी शस्त्र धरणार नाहीं. तेव्हां तुम्हांला निःशस्त्र असा मी पाहिजे, अथवा यादवसैन्य पाहिजे ? दुर्योधनानें यादवसैन्य पत्करिलें. अर्जुनानें एकटा, निःशस्त्र असा कृष्ण पत्करिला.]

आर्या

जाय प्रथम कुरुप, तों निजला होता प्रभु स्वपर्यंकीं,
ज्यासि स्मरुनि निजावें स्वस्थ, स्थापूनि शीर्ष अर्यंकीं. १
प्रभुच्या शिराकडे तो स्वमहत्त्वास्तव बसे अकवि, मानी,
होईल काय हंस ब्रह्मऱ्याच्या बैसला बक विमानीं ? २
मागुनि गेला अर्जुन, बसला पायांकडेचि पाहत, कीं—
या विनतीं श्रीगुरुची बहु, त्या लेशहि नसे कृपा हतकीं. ३
कैसा असेल अन्य प्रभुच्या दृष्टीसमोर सामान्य,
उठतांचि तीस अर्जुन झाला दृष्टीस मोरसा मान्य. ४

पार्थ म्हणे, 'प्रार्थाया आलों, प्रभुजी, तुला साहायास';
कौरव म्हणे, 'बहाया प्रथमचि जो पातला पहा, यास. ५
तुजशीं याचें माझें सम सख्य जसें तसेंच सम नातें;
संत म्हणति पूर्वागत-साह्य-शिवपदीं सदा बस मनातें'. ६
देव म्हणे, 'सत्यचि हें, तरी पार्थ प्रथम पाहिला आहे,
सर्वहि संतन्यायें भेद, न आगमनिं, दर्शनीं पाहें. ७
पूर्वागत तूं जैसा, तैसा मज पूर्वदृष्ट हा मान्य,
दोघांचेंहि करावें म्यां साह्य, प्रिय तुम्ही, न सामान्य. ८
तुजहुनि कनिष्ठ अर्जुन बाळकसा, हें मनीं पहा नातें;
रीतिं दहांची हे कीं, पहिलें समजाविती लहानातें. ९
आहेत एक अर्बुद नारायणनाम गोप मजसम जे,
सर्वहि अनंत-बल ते, समजे न परा, परंतु मज समजे. १०
'ते, कीं न्यस्तायुध मी, यांत तुम्हां मान्य काय दोघांस?'
ऐसें प्रभूत्तम पुसे त्या द्वैताद्वैत-संपदोघांस. ११
पार्थ म्हणे, 'गोविंदा, न्यस्तायुध तूंचि पाहिजेस मज';
मागे सैन्य सुयोधन; वरहि वरावयासि पाहिजे समज! १२
मग साह्यार्थ विनवितां राम म्हणे, 'ऐक, भारता राया,
सिद्धचि मी स्वजनांतें उतरुनिया आधि-भार ताराया. १३
वदलों विराटनगरीं त्वद्विषयक किमपि जें विहित सुचलें,
परि परिस, त्या हरिस त्या समयीं न सभेंत तें वचन रुचलें.
दुष्कर कृष्णत्याग, स्व-प्राण त्यागही न दुष्करसा.
कृष्णाविणें क्षिति मला, नलिनी मधुपासि जेविं शुष्करसा. १५
यास्तव सहाय संप्रति हा बल न तुझा, न पांडुतनयांचा,
निश्चल निश्चय जाणा, आजि तुम्ही सर्व आप्त-जन याचा. १६
जा, आहेसि क्षत्रिय, भांड, न अभिमान सांड गा, साच-
स्वर्ग असे, काळमुखीं व्हायाचा काय सांडगासाच'. १७

ऐसें वदोनि रायें आलिंगुनि तो खलेंद्र बोळविला,
रविनें विधुसा, प्रभुनें स्वगृहागत मलिनही न पोळविला. १८
अक्षौहिणी कटक, कृतवर्मा दे त्यासि, कीं न येनाच—
कुब्जा नकार, जैसा मेल्याही पंगुला न ये नाच. १९
बहु मेळवूनि बल्लव अज्ञ पळत जाय, कृष्ण सोडून,
अधन शिशु जसा टाकुनि चिंतामणि, बहु कपर्द जोडून. २०
चित्तांत म्हणे, 'कैसा केला अरि-मीन-ऱ्हद अगाध रिता!'
भ्रांत, श्रुत स्मरेना, कीं, हा प्रभु जाहला अगा धरिता. २१
कृष्ण म्हणे, 'पार्था, त्वां अर्बुद बल हातिंचें दिलें आरिला,
जो म्हणतो, 'भांडें ना, शस्त्र धरीं ना', असा कसा वरिला?'
पार्थ म्हणे, 'तूं मुनिनीं चित्तीं षडरिक्षयार्थ धरिलास,
हरिला समस्तही श्रित-ताप तुवां म्हणुनि म्यांहि वरिलास.
न धरावें शस्त्र अशी प्रभुजी, आहे जरि प्रतिज्ञा, ते—
राहो; त्वत्स्मरणेंचि ध्वंसिति कामाद्यरिप्रति ज्ञाते. २४
तूं या धनंजयाचा सारथि, करुणानदा, समीरण हो;
वाढेल तेज माझें प्रचुर, मग करीन दास मी रण हो!' २५
स्वजनामरद्रुम प्रभु हासोनि म्हणे, 'अवश्य तुजला जो—
अर्थ अपेक्षित तो हो; मातलिसारथि महेंद्र तुज लाजो'!

—मोरोपंत

---

२१. बोधपर अभंग

(१) तुकारामाचे—

कां रे नाठवीसी कृपाळु देवासी?
रक्षितो जगासी एकलाची;
फुटे तरुवर उष्णकाळमासीं,
जीवन तयासी कोण घाली?

कोणीं केली बाळा दुग्धाची उत्पत्ती ?
वाढवी श्रीपति सवें दोन्ही;
तुका म्हणे, ज्याचें नांव विश्वंभर,
करा निरंतर ध्यान त्याचें. १
न लगे मायेसी बाळ निरवावें,
आपुल्या स्वभावें वोढे त्यासी;
मज कां लागला करणें विचार,
ज्याचा कारभार त्याचे माथां;
गोड-धोड त्यासी ठेवी न मागतां,
समाधान खातां नेदी मना,
खेळतां गुंतलें उमगोनी आणी,
बैसोनिया स्तनीं लावी बळें;
त्याचे दुःखें पीडे आपण, खापरीं—
लाही तळीं वरी होय जैसी;
तुका म्हणे देह विसरे आपुला,
आघात ती त्याला लागों नेदी. २
नीचपण बरवें देवा। मुंगी साखरेचा रवा,
महापुरें झाडें जाती। तेथें लोहाळे राहती,
येती सिंधूच्या लहरी। नम्र होतां जाती वरी,
तुका म्हणे हेंचि फळ। पाय धरिल्या न चले बळ. ३
खरें बोले तरी। फुकासाठीं जोडे हरी,
ऐसे फुकाचे उपाय। सोडुनिया वायां जाय,
परउपकार। एका वचनाचा फार,
तुका म्हणे मळ। मनें सांडीतां शीतळ. ४
काय वानूं आतां न पुरे हे वाणी,
मस्तक चरणीं ठेवीतसें;

थोरीव सांडीली आपुली परीसें,
नेणे शिवों कैसें लोखंडासी;
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती,
देह कष्टवीती उपकारें;
भूतांची दया हें भांडवल संतां,
आपुल्या ममता नाहीं देहीं;
तुका म्हणे सुख परांचिया सुखें,
अमृत हें मुखें स्त्रवतसे. ५

मोलें घातलें रडाया। नाहीं असूं आणि माया;
तैसा भक्तिवाद काय। रंग-बेगडीचा न्याय;
वेठी धरिल्या दावी भाव। मागें पळावया पाव;
काजळ्याच्या ज्योती। तुका म्हणे न लगे वाती. ६

दुर्बुद्धी ते मना। कदा नुपजो, नारायणा;
आतां मज ऐसें करीं। तुझे पाय चित्तीं धरीं;
उपजला भावो। तुझ्या कृपे सिद्धी जावो;
तुका म्हणे, आतां। लाभ नाहीं यापरता. ७

साखरेच्या गोण्या बैलाचिये पाठी,
तयासि शेवटीं करबाडें;
मालाचे पैं पेटे वाहताती उंटें,
तयांलागीं कांटे भक्षावया;
वाउगा हा धंदा आशा वाढविती,
बांधोनिया घेती यमा-हातीं;
ज्यासी असे लाभ तोचि जाणे गोडी,
येर तीं बापुडीं शिणलीं वायां;
तुका म्हणे शहाणा होईं रे गव्हारा,
चौऱ्यायशींचा फेरा फिरूं नको. ८

लोह परिसा रूसलें। सोनेंपणासी मूकलें;
येथें कोणाचें काय गेलें। ज्याचें त्यानें अहित केलें;
गंगा आली आळशावरी। आळशी देखुनि पळे दुरी;
गांवाखालील ओहोळ। रागें गंगेसि न मिळे;
तुका म्हणे, होउनि दास। गुरुसि न भजती शिष्य. ९
हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा;
गुण गाईन आवडीं। हीच माझी सर्व जोडी;
नलगे मुक्ति, धन-संपदा। संतसंग दे गा सदा;
तुका म्हणे, गर्भवासीं। सुखें घालावें आम्हांसी. १०

(२) रामदासाचे—

बाळक जाणेना मातेसी। तिचें चित्त बाळापाशीं;
तैसा देव हा कृपाळ। करी भक्तांचा सांभाळ;
धेनु वत्साचेनिलागें। धावे त्याच्या मागें मागें;
पक्षी घेतसे गगन। पिलांपाशीं त्याचें मन;
मत्स्य आठवीतां पाळी। कूर्म दृष्टीनें सांभाळी;
रामींरामदास म्हणे। मायाजाळाचीं हीं लक्षणें. ११
ऐसें कैसें रे सोंवळें। शिवतां होतसे ओंवळें;
स्नान, संध्या, टिळे माळा। पोटिं क्रोधाचा उमाळा;
नित्य दंडीतोसि देह। परि फिटेना संदेह;
बाह्य केली झळफळ। देहबुद्धीचा विटाळ;
दास म्हणे, दृढ भाव। तयावीण सर्व वाव. १२
वाजे पाऊल आपुलें। म्हणे, 'मागें कोण आलें?'
कोण धावतसे आड। पाहों जातां झालें झाड;
भावितसे अभ्यंतरीं। कोण चाले बरोबरी,
शब्द-पडसाद ऊठला। म्हणे, 'कोणरे बोलला?'
रामदास सांगे खूण। संशयाचीं हीं लक्षणें. १३

छाया देखून आपुली। शंका अंतरीं वाटली;
ऐसें भ्रमाचें लक्षण। भुले आपणा आपण;
मुखें बोलला उत्तर। तेथें झालें प्रत्युत्तर;
डोळां घालितां आंगोळी। एकाचीं तीं दोन झालीं;
पोटीं आपण कल्पिलें। तेंचि आलेंसें वाटलें;
दास म्हणे, हे उपाधी। शंका धरितां अधिक बाधी. १४

---

२३. अन्योक्ति

गजान्योक्ति

श्लोक

न ताप निवला, तृषा न शमली, रजें माखलें—
शरीर, अजुनी नसे कमल एकही चाखलें.
न सोंड उचलूनिया कमलिनी गजें स्पर्शिली,
हकाक मधुपीं पहा अधिच काय आरंभिली! १
माझी शक्ति अपूर्व, बाग अवघा म्यां मोडुनी टाकिला,
ऐसें मानुनि हर्ष फार तुजला चित्तीं खरा वाटला;
ग्रीष्मीं तीव्र रवी तपोनि करितां आंगीं तुझ्या काहली,
ती पीडा टळण्यास कोणति तुवां युक्ती गजा योजिली? २
कंठी मोठा बळकट असे पाश, पायांत बेडी,
बैसोनीया शिरिं नर तुझ्या अंकुशें गंड फोडी,
जीपेक्षां कीं मरण बरवें भासतें, त्या दशेतें—
पावोनीया अजुनिहि गजा दाविशी कां मदातें? ३

हरिणान्योक्ति

दिंड्या

मत्त असती जे धनाच्या मदानें —
न दावीशी त्यां तोंड दीनवाणें;

अर्जवाचीं भाषणें मधुर, खोटीं,
करुनि तोषविशी न त्यां कधीं पोटीं. ४
गर्ववचनेंही परिसशी न त्यांचीं,
धरुनि आशा त्यांचिया प्रसादाची,
घरा त्यांचीया करुनि येरझारा,
न घालविशी तूं स्वीय काळ सारा. ५
भूक लागलिया कोमला तृणातें,
भक्षुनीया तूं पावसी सुखातें;
स्वस्थ निद्रेसी घेसि झोंप येतां,
चित्ति नाहीं तव काडिमात्र चिंता. ६
अशी सौख्याची स्थिती प्राप्त व्हाया—
योजियेलें त्वां कोणत्या उपाया ?
काय कोठें त्वां तपश्चरण केलें ?
मृगा ! योगें ज्या भाग्य हें उदेलें. ७
नवें कोमल उगवलें गवत दाट,
स्वच्छ सुंदर वाहतो त्यांत पाट;
अशा पाहुनिया उत्तम स्थलातें—
भूल पडली तैं मृगाच्या मनातें;
व्याध चापीं योजुनी बाण राहे—
आड जाळीच्या, न तो त्यास पाहे ! ८
वनीं हिंडोनी शीण फार झाला,
घाम अंगाला तुझ्या दाट आला;
बैस येउनिया स्वस्थ आश्रमांत,
करीं रोमंथा, नीज बा निवांत. ९
दुष्ट भिल्लांचा इथे वास नाहीं,
मुनी बसले हे शांत, यांस पाहीं !

भूतमात्रीं हे दयेतें करीती,
मृगा, मनिंची बा सोड सर्व भीति ! १०

वृक्षान्योक्ति

आर्या

दाटी वाटसरांची, तीव्र उन्हाळा असा असे फार;
मार्गीं एकच तरु हा कितिकांचा ताप तो करिल दूर? ११

श्लोक

दावाग्नी खवळोनिया तरुवरां जाळावया जैं वळे,
जाती सर्व पळोनि कोकिल, शिखी, रावे, तसे कावळे,
भक्षायास इथे चहोंकडुनिया एकत्र जे जाहले;
येतां संकटकाळ होय जवळी ऐसा न कोणी मिळे ! १२

चंदनान्योक्ति

आहे एक सुगंधमात्र जवळी, तों त्यास राखावया,
ऐसे घोर भुजंग पाळिशि, जना जे धावती खावया;
येती गोड फळें, फुलेंहि बरवीं दैवें तुला चंदना,
त्यांच्या, बा, करितास काय न कळे संरक्षणा योजना ! १३

वनीं विलसती बहू विविध वृक्ष चोहींकडे,
तयांत मज चंदनासम न एकही सांपडे;
जयास न दिलीं फळें न कुसुमेंहि दैवें जरी,
शरीर झिजवूनि जो तरि परोपकारा करी ! १४

केतकीविषयीं

दलां सर्वां कांटे असति, मधुचा लेशहि नसे,
उडोनी नेत्रांतें रज बहुत पीडा करितसे;
तुझ्या पुष्पीं ऐसे अवगुण असोनी, भ्रमर हा—
कसा एक्या गंधें भुलुनि पडला केतकि पहा ! १५

वटान्योक्ति

ऐसा थोर खरा नसेच दुसरा त्वत्तुल्य साऱ्या वनीं,
वार्ता आयकिली, तुला कथितसें, कोपा न आणीं मनीं;

कोणी क्षुद्र लता मळ्यांत असते, तुंबी जितें बोलती,
येती थोर फळें जिला बहुत ती गर्वे तुला हासती ! १६

निवडुंगान्योक्ति

साकी

भुजंग वेष्टिति चंदनतरुतें, कंटक केतकिलाही,
सुगंध अंगीं आहे, म्हणुनी भीति तयांतें कांहीं; १७
रे निवडुंगा, नीचा, इतके धरिशि कशाला कांटे !
रक्षणयोग्य असें तुजपाशीं काय असे तुज वाटे ? १८

सूर्यान्योक्ति

श्लोक

होता जोंवरि अंबरीं तपत तो चंडांशु तेजें निजें,
झाला निष्प्रभ तारकाधिपतिही बोला कशाला दुजें ?
राहूच्या वदनीं अजीं गवसतां तो भानु दैवें, अहा,
कैसें क्षुद्रहि काजवे चमकती त्याच्यापुढें हे पहा ! १९

चंद्रान्योक्ति

श्लोक

आकाशांत शशांक पूर्ण उदया आला, तया पाहुनी,
झालें तुष्ट चकोरमंडळ, सुधापाना कराया मनीं;
ताप-क्लेश उणा जनास नुकता होऊं असे लागला,
तों दैवें इतक्यांत मेघ अणुनी कैसा मधें घातला ! २०

हंसान्योक्ति

श्लोक

उडत उडत जातां हंस तो मानसींचा,
मरुजनपद मार्गीं लागला त्यास साचा;
सरस कमलतंतू राहिले दूर भारी,
श्रम करुनि मिळे ना बापुड्या कूपवारी ! २१

—पद्यरत्नावलि

भाग तिसरा

१ हिमालयावर बसून केलेलें ईश्वराचें प्रातःस्तवन

श्लोक

बर्फानें असती पहा धवल जीं, मेघांस जीं भेदिती,
आरोहूनि तयां शिरांवरि बसे हा शुक्र शुभ्रद्युती;
वाटे, स्नेह असे, हिमालय ! तुझा अत्यंत त्याच्यावरी,
आहे योग्य तुम्हां; समानगुण जे त्यांचीच मैत्री खरी. १
तुझ्या तनुवरी जरी अमित ओघ हे नाचती.
उड्या बहुत मारिती, बहुत खेळती, हासती,
तरी न सखया, तुवां निज उदात्तता टाकिली,
कशी मुनिपरी, अहा ! सतत शांतता सेविली ! २
तुझ्या प्रतितटीं तरू विविध उंच गेले पहा !
प्रभातसमयीं नसे पवन; शांत अत्यंत हा—
दिसे तरुसमूह कीं जलनिधीपरी केवळ;
समीर नसतां जयामधिं उचंबळे ना जळ. ३
समीर गमतो मला परिसरीं अहा घूमसा,
विभेदुनि तया कसा अचल वाढला उंचसा;
विचार करितां पुन्हा, नच विभेदिसी, वाटतें;
सनातन तुझें खरें सहज धाम दे शांतितें. ४
अगा अचलनायका ! भय मनांत उत्पादिसी,
न भीति परि केवला, अमित शांतिही मानसीं;
न दृष्टि ढळते जरी तुजवरूनि, मोदाकरा !
तरी न मन हें तुला भजतसे, भजे ईश्वरा. ५
गमे, उदय पावतो रव मनोहर स्वांतरीं,
तशी मम विकासते हृदयिं मूर्ति तूझी खरी;

प्रमोदभर मानसा विसरवी निजा चेतना,
न केविं मग भावना त्रिजगतात्मरूपा मना ? ६
स्मरोनि विभुची कृपा नयन ढाळिती आंसवें,
मना ! तदुपकार तूं स्मरसि नित्य मोदोद्भवें;
प्रमोद, उपकार रे मधुर शब्दसंधीं वदें,
करीं मजसवें प्रभुस्तवन सानुमंता मदें ! ७
तमासह तुझें निशीं सतत युद्ध, शैलाग्रणी !
सहाय तुज तारका विखरल्या नभःप्रांगणीं !
तुझें शिखर सेवितो, उदय पावला शुक्र हा,
प्रभातरवि रंजवी तुज सुरम्यवर्णीं अहा ! ८
सखा अरुण बा तुझा तुजाचि भेट देतो अर्धी;
प्रकाशवृतसानुला तुज विलोकुनीया सुधी—
म्हणे, 'दिवस पातला; उठुनि नित्यकर्मे करा !'
नियामक जनां खरा; नगवरा ! स्तवूं ईश्वरा. ९
अदृश्य रविच्या करा तव महाश्रयस्तंभ जे,
कुणीं खणुनिया धरा अचल रोंविले ?—त्या भजें;
कुणीं विविधरंग हे—विनटतोसि ज्यांहीं—दिले ?
वदें, तुज दिले कुणीं नद, तुडुंबले जे जलें ? १०
वदाल नद हो तुम्ही, स्रवतसां प्रवृद्धें मदें—
तमोमय दरींतुनीं, जनन हें तुम्हां कोण दे ?
कशा कठिण कातळांवरुनि इंद्रवज्राहतां—
प्रसन्नजलनिर्भरें सतत या उड्या मारितां ! ११
वदें 'खळ' असा ध्वनी धवलफेनभंगावली,
अखंड जल, वेग हा, अतुल शक्ति, कोणीं दिली ?
'इथे जलतरंग हो ! स्थिर तुम्ही असां !' हा कुणीं—
निदेश दिधला तुम्हां ? अचल जाहलां त्या क्षणीं. १२

नगा ! तुजवरी किती हिममया नद्या सांचल्या !
मिळूनि नग जाहला अपर तो; नद्या गोठल्या;
तुझ्या शिखरिं आसरा नच तयां मिळाला भला,
म्हणूनि ढळला; परी प्रभुवचें मधें थांबला ! १३
प्रपात ! सरिता ! तुम्हां सतत शांति-देवी वरी,
निशाकरकरीं अहा रजतसानुमानापरी;
तुम्हांस दिधला कुणीं धवलिमा ? तुम्हां भास्करें—
वदा कवण रंग दे !—कवण मोद पुष्पाकरें ? १४
वदा ! 'प्रभु' जलौघ; हे ! हिमशिली ! प्रभूतें स्मरा,
नद्या, 'प्रभु' वदा, तुम्ही उपल हो ! स्मरा ईश्वरा !
प्रपात ! तव थोर हा रव, वदें प्रभुतें सदा,
भवन्मुख समीर हो सरलवृक्ष, ईशा वदा ! १५
अहो हिमनगोद्भवा कुसुमिता लतांनो, स्मरा !
मुदें विचरतां तुम्ही गवय हो स्मरा ईश्वरा !
स्मरा जलद हो तुम्ही प्रभुवरा मनापासुनी !
सहाय तुमची सखी कनकगौर सौदामिनी. १६
अगा अचलनायका ! प्रभुस पूजण्या साधनें--
समीप असती तुझ्या, भज तया प्रसन्नें मनें !
पवित्र जल घेउनी सुरधुनीनदीपासुनी,
करींच अभिषेक तूं, अगरु चंदना चर्चुनी ! १७
स्वयें हरिणनाभिनें प्रभुस कृष्ण लावीं टिळा,
सुगंधसुममालिका ग्रथुनि घालिं त्याच्या गळां;
प्रसन्न विभुसी करीं, अगरु धूप तूं लावुनी,
करील मग आरती जलदभाज सौदामिनी ! १८

—महाजनी

२. सदुपदेश

आर्या

श्रीरामासि भजावें भक्तें म्यां जेविं, तेविं संतांतें;
राजासि उपासावें, तैसेंचि जनें, प्रधान-पंतातें. १
रंगावें सद्वचनें मतिनें चूर्णें जसेंच हळदीनें,
भजन न सोडावें म्यां जेविं कधीं कर्षकें न हळ दीनें. २
सद्व्यसनीं वेंचावें आयू, न पुरेचि भरंवसा याचा;
झालों जीर्ण तरि, मनीं आहे रसिकांत भर वसायाचा. ३
हरि-हर-जनाश्रय बरा, होतें तदितर जनाश्रयें भंड,
लागुनि असमर्थाच्या कासेला वस्त्र पावतें दंड. ४
कांपावें मन कुजनीं वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें,
सत्संगींच शिरावें बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें. ५
सद्भक्तींच असावा प्रेमा, ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं,
रम्यहि अभक्त हो मज, मधुपा चंपक जसा असेव्य, जनीं.
वत्स जसा स्तन्यातें सादर पीतो धरोनि आम्यातें,
जें साधुमुखोद्गत यश तैसें प्यावें करूनि आ म्यां तें. ७
प्रेमें नवीं नवीं तीं माझ्या रसनेसि सुकवि-कुल-गीतें—
गीतें यावीं, येती माहेरीं जेविं बहुत मुलगीतें. ८
ज्यांत न हरि-हर-जन-यश ऐसें जें काय कीर्तनीं गान,
तें अलवण-भोजनसें नच सेवुत आर्त-बाळसे कान. ९
हरिकीर्तनीं शिरावें धनिकगृहीं जपुन जेविं चोरानें;
बहुकार्येंहि नुठावें, बहुभारें जेविं कुंजर दोरानें. १०
म्यां कीर्तना टपावें, मार्जारें सर्वदा जसें दुग्धा,
मन्मति विनयादि गुणां वाहो प्रेमें, नगां जशी मुग्धा. ११
निजदेह-गेह-भान प्रभुभक्तांच्या कधींहि मेळांत,
मज कीर्तनीं नसावें, जैसें शिरतां मुलांस खेळांत. १२

भव-गज-भय शमवाया वृत्ती हरिकीर्तनींच राखावी,
पित्तनिवारक जैशी सुलभ बरी शुंठि-शर्करा खावी. १३
नारायणनामानें नच सोडावें कदापि हें वदन,
मेल्याही लोभ्याच्या चित्तें सोडूं नये जसें सदन. १४
ज्यांचे चित्तीं हरिहर, तत्संगति दे सदा मला, देवा !
दे त्वद्भजनीं बुद्धी, आवड पुरवुनि तुझीच पदसेवा. १५
संसार दों दिसांचा, सत्संग धरी कुलीन, तोचि तरे;
ध्यावें बरें म्हणोनि स्वपरमुखीं हें कुलीनतोचित रे ! १६

—मोरोपंत

---

३. भीष्म व परशुराम

[भीष्मानें आपल्या भावासाठीं काशीराजाच्या तीन कन्या हरण करून आणिल्या व दोघींचें भावाशीं लग्न लाविलें. परंतु तिसरी प्रथमतः लग्नास कबूल नव्हती. तिनें सांगितलें कीं, आपण शाल्वनामक राजास मनानें वरिलें आहे. यावरून भीष्मानें तिला शाल्वाकडे जाऊं दिलें; पण दुसऱ्यानें जिंकलेली म्हणून तिला शाल्व वरीना. इकडे तिनें मनानें शाल्वास वरिलें होतें, म्हणून भीष्म तिचा स्वीकार करीना. तेव्हां भीष्मानें तिचा स्वतांकरितां किंवा भावाकरितां स्वीकार करावा, असें सांगण्यास त्याचा गुरु परशुराम हा त्याजकडे आला. त्याचेंही तो ऐकेना, तेव्हां दोघांचें युद्ध झालें. ही कथा पुढील आर्यांत वर्णिली आहे.]

आर्या

येऊनि कुरुक्षेत्रीं राहे, सांगोनि पाठवी, राजा !
धावोनि भेटलों मी, वेद-धनुर्वेद पाठ वीरा ज्या. १
मत्कृत पूजन घेउनि राम म्हणे, 'रे सुरापगांगभवा !
भक्त्यर्पित बहु; नाहीं तरि काय असे दुराप गांग भवा ? २
गरुडें सुधा तशी त्वां हे अंबा रण करूनि जरि हरिली,
तरि हरि-लीन-मति जनें संसृतिरुचि तेविं केविं परिहरिली'? ३

वदलों " सत्य भ्रात्यांकरितां हरिली बळें, पर 'स्वामी—
वरिला शाल्व' म्हणे हे; घेऊं जाणुनि कसें परस्वा मी?" ४
राम म्हणे " शाल्व न घे, मानी हरि गजपरें दिला न वरी,
त्वां जिंकिली यदर्थ त्वद्भ्राता तो करू इला नवरी." ५
मी वदलों, " जें दुष्कर, सुयशस्कर, सांग काज रामा, तें;
होइल अकीर्ति, देतां कां हा उपदेश-काजरा मातें?" ६
राम म्हणे, " त्वद्गुरु मी, माझें सुख-पुण्य-कीर्ति-जनकवच;
गुरुवचनासचि म्हणती सर्व भले पुण्यकीर्तिजन कवच!" ७
मी बोलिलों, " असें तों न घडेल कधीं, दयानदा, पावें;
गुरुनें ज्यासि अधर्माचरण न माने, तया न दापावें!" ८
राम म्हणे, " होय सुखी निजगुरुचें वचन शिष्यजन करिता,
नातरि गुरुकुंभ-भव-क्षोभें छात्रामृतांशु-जनक रिता. ९
मज गुरुपुढें 'असें तों न घडेल कधीं', असें कसें वदसी?
असतां समर्थ अघटित-घटना-पटु मत्कुठार, हा सदसी. १०
खचशील कौरवा तूं, कीं बहु चढला तुझा मद, सिगेला,
लंघावया पहासी, गांवाला काय रे मदसि गेला? ११
वधिले क्षितितलवर्ती क्षत्रिय म्यां एकवीसदां सारे,
माझा प्रताप गातां रुद्रभ्रम दे कवीस, दासा रे." १२
ऐसें भलतेंचि वदे, वर्णावा मुख्य जो गुरु गुरूंनीं;
पाहे राम मजकडे जेविं हरिकडे हरी गुरुगुरूनी! १३
वदलों, " धर्म-न्यायें हा देह तपोवनांत राबावा,
त्यजुनि दुरभिमान धरुनि शांतिसि तारुनि जनां तरां बावा. १४
ठाव्या आहेत मला, सांगा गोष्टी यथेच्छ अन्या या,
तरि भय भलत्यापासुन होइल जरि मी करीन अन्याया. १५
वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव, समज;
देवासि मागते ते झाले मरणीं करूनि नवस, मज! १६

गेलें गुरुत्व तुमचें, कां हो म्हणतां वधीन अनघातें?
येइल पदरांत कसें यश, धर्म-न्याय-निष्ठ जन-घातें? १७
सच्छिष्याला विद्या गुरु झांकायासि काय हो शिकवी?
पांडित्य पहा माझें, पाहोनि मज्ञ म्हणाल, 'होशि कवी,"
हासुनि राम म्हणे, " रे हितकर गुरुवचन कां न आइकशी?
साहेल तुझी तुझिया दुःसह शोकानलासि आइ कशी? १९
भीष्मा मज सिंह गणीं, वेड्या, तूं आपणासि कलभ गणीं!
न रविपुढें मिरवेसें चंद्रींहि, कसें असेल बल भ-गणीं? २०
देशिल सत्यवतीतें शोक, बहुत रडविशील गंगेतें,
समज बरें मद्दूषित जें जें तेज क्षणांत भंगे तें! २१
हो सिद्ध, ये, हरीनें व्यसु आला तो करेणु केला हो,
हो गंगेला शोकद, तीखद हें तोक रेणुकेला हो!" २२
सिंधूंत नग जसा कपि, तैसा पाहोनि गर्वनग रामी—
वंदुनि, 'येतों!' ऐसें बोलुनि, आलों फिरोन नगरा मी. २३
आम्हां गुरुशिष्यांचा अत्यंताद्भुत पहावया समर,
आले बहु सुरराज-ब्रह्मर्षिसमेत सर्वही अमर. २४
ठेवुनि चाप करींचें, उतरूनि रथावरूनि पद नमुनी,
'मम जयमाशास्व!' असा प्रार्थियला कीर्ति-केलि सदन मुनी.
मज राम म्हणे, " न नमन करितां करितोचि हानि शापानें,
वंदावा गुरु हर्षद अमलद्विजराज हा निशापानें. २५
भीष्मा, मजला म्हणसी जरि 'जयमाशास्व मे, विभो राम!'
तरि संप्रति जैसा तूं जयकाम, तसाचि हाहि जयकाम."
नमुनि रथीं बैसुनि मीं वदलों, " गुरुजी न हार नत पाहो!
तुमच्या न ब्राह्मण्या, न श्रुतिवृंदा प्रहार, न तपा हो! २८
स्वीकारिला तुम्हीं जो असमुचित क्षात्रधर्म साधूंनीं,
खंडीन त्यासि, होइन सन्मत हें साधुकर्म साधूनी" २९

गुरु खवळलाचि होता, मीहि बहु तसा कधींच न खवळलों,
एकांमेकांवरि मग साक्षात्कल्पांतमेघसम वळलों ! ३०
ऐसें तेवीस दिवस झालें युद्ध त्रिलोकमोहन हो,
म्हणतचि होतों देवा, 'समयीं समरक्रतूंत मोह न हो!' ३१

—मोरोपंत

---

४. सह्याद्री

[विहंगमदृष्टीनें सह्याद्रीपर्वताचे सर्व भागांचें वर्णन करितांना कवीला स्थलानुरोधानें तेथें घडलेल्या ऐतिहासिक गोष्टींचें स्मरण होत आहे व शिवाजीमहाराजांचे कालीं जें ह्या पर्वताचें थोर वैभव होतें त्याचा पार अस्त झाला आहे हें मनांत येऊन त्या दुःखाचे उमाळ्यानें कवीला अधिक वर्णन करवत नाहीं.]

श्लोक

कोठें दुर्गम उंच उंच शिखरीं भेदोनि तारापथा,
विंध्याद्रिव्रत आचरोनि अडवूं पाहे रवीच्या रथा;
कोठें भार्गवराममार्गणभयें जो भीरु मागें पळे,
त्याचा मारहि साहुनी पुरवितो प्रेमें मुलींचे लळे. १
कोठें खोल महाभयानक दरी पाहोनिया ज्यांकडे,
सूर्याचे करही भयें दचकुनी माघारती बापुडे;
कोठें घोष करीत पुण्यतटिनी जातां समुद्राकडे,
खालीं आदळती धडाधड जणूं पापाचलाचे कडे ! २
कोठें शीतळ वाहती झुळझुळां अच्छोदकाचे झरे,
ज्यांच्या केवळ दर्शनेंच सगळी तृष्णा जनांची हरे;
कोठें रम्य सरोवरें, स्फटिकभा शुद्धोदकें ज्यांचिया,
केली लज्जित शारदेंदुकिरणां देवोनिया आश्रया. ३
कोठें व्योमपथें महीरुह शिरें उंचावुनी आपलीं,
घालाया बघती जणूं निजगळां निःसार मेघावली;

कोठें पालवतां लता रुचिरता साऱ्या प्रदेशास ये,
वाटे पांघुरली सुरम्य हिरवा शेला वनश्री स्वयें. ४
कोठें त्र्यंबकराजपुण्यमहिमा वर्णीत गोदावरी,
जातां पंचवटीवरून नमन श्रीरामचंद्रा करी;
भीमाशंकर सोडुनी निज सखी घेवोनि नारी सवें,
कोठें नेउनि पंढरीस बसवी भीमा जनांचे थवे. ५
कोठें धौममहाबलेश्वर पदा सोडोनि जातां पथीं,
कृष्णेला बहु कोयनादिक सख्या येवोनिया भेटती;
कोठें जी म्हणती प्रयागमहिमा सारा हिरावोनि घे,
हाराया करवीरताप मलही ती पंच-गंगा निघे. ६
ताराया भजकां सदाशिव कुठे ज्योतिःस्वरूपें वसे,
कोठें येउनि ही हिमालयसुता ह्या सप्तशृंगीं वसे;
कोठें ह्या विवरीं लपोनि बसती बौद्धादिकांच्या कृती,
होते कुंठित ज्यांकडे निरखितां कारागिरांची मती. ७
कोठें हे उंच माना करुनि गड यशस्तंभ राया शिवाचे,
देती आम्हां मराठ्यां स्मरण घडिघडी आमच्या वैभवाचें;
गेला! तो काळ गेला निघुनि! विभवही नष्ट तें सर्व झालें!
गेलें तें तेज गेलें! पुरुषवरहि ते भाग्यशाली निमाले! ८
नाहीं घोरपडीशिवाय शिवली भिंतीस ज्याच्या शिडी,
फेंकाया शकले न दृष्टि रिपुही ज्याच्याकडे वांकडी,
तान्हाजीसम वीरसिंह पडला ज्याकारणें संगरीं,
त्या ह्या सिंहगडीं निरंतर शिवा स्वाराज्य आतां करी! ९
ज्याचा मावळुनी प्रतापतरणी केव्हांच गेला तरी,
गर्वे मान वरी करोनि बसला जो ह्या गिरीच्या शिरीं,
तो हा पाहुनिया प्रतापगड त्या राया शिवाची कृती,
त्याच्या वाघनखांसह स्मरुनिया तल्लीन होते मती. १०

जेथें ऐकुनि चौघडे धडकतां राज्याभिषेकोत्सवीं,
नाचे हर्षभरें विरक्तहि तरी तो जावळीचा कवी,
त्या ह्या राजगडावरोनि भगवा झेंडा पडे खालतीं,
ऐसें पाहुनिया गळे सहजची त्या मावळ्यांची धृती. ११
सह्याद्रे ! तुज पाहुनी प्रथम जो आनंद झाला मला,
त्याचा एकहि लेश यावरि नसे चित्तांत ह्या राहिला;
आतां राहुनिया इथे असुखची होणार आहे मना,
दुःखें यास्तव आज सोडुनि तुला ही चालली कल्पना ! १२

—गंगाधर रामचंद्र मोगरे

---

५. दुर्योधन स्वसैन्यास धीर देत आहे

[भारतीय युद्धांत द्रोणाचार्य पडल्यावर दुर्योधनानें कर्णास सेनापति केलें. त्या वेळचें हें दुर्योधनाचें भाषण आहे.]

आर्या

" ऐका हो वीर तुम्ही, मीं तुमच्या भुजबलाश्रयें शुद्ध—
यश जोडाया कुंतीपुत्रांसीं मांडिलें महायुद्ध. १
दिसतां विषण्ण सर्व द्रोणवधीं, मरति वीर युद्धांत,
फल जय कीं वध होणें, हा निश्चय निश्चल प्रबुद्धांत. २
द्रोण-वधें रिपु मानिति जय, मानूं द्या न चित्र हें, तोही—
क्षणमात्राचि कीं, पावति न जयातें सर्वथा गुरुद्रोही. ३
युद्ध करील महात्मा कर्ण, पहाहीं तुम्ही कुतूहल तें,
विसरेल दुःख तुमचें मन जें द्रोण स्मरोनि हळहळतें ! ४
राम-प्रसाद-लब्धें दिव्यास्त्रें योजितांचि अंगेना,
पाहों न शकेलचि पर-बल, हरिकुल हरिसमक्ष भंगेना ! ५
युद्धीं सदाहि ज्या नर-सिंहाचा पार्थ-मृग धरी त्रास,
परिसा त्याच्या रिपुमद-महिष-महा-शक्तिच्या चरित्रास. ६

मानुषयुद्धेंचि गजायुतबल खल भीम त्या अवस्थेला—
जेणें सेनापति गुरु असतां समरांगणीं क्षणीं नेला; ७
दिव्यास्त्रज्ञ घटोत्कच अतिशूर, क्रूर-भाव, मायावी,
जेणें वधिला वासव-शक्तीनें, जीस न क्षमा यावी; ८
त्या या कर्णाचें भुजबल खल बल-जलधिमाजिं देखाल,
मग संक्षुब्धौर्वानल-दर्शन झालें असेंचि रेखाल! ९
करितां विक्रम कर्ण-द्रौणी दिसतील त्रिष्णु-वासवसे,
यांच्या ठायीं चाप-श्रुति करुनि प्रकट वैभवास वसे. १०
भीष्मद्रोण-वध जयें झाला मद पांडवांसि तो यांचा—
विक्रम करिल क्षीण, ग्रीष्म जसा लघुतडागतोयांचा. ११
त्या कुंती-पुत्रांच्या अति-दक्ष तुम्ही असा सखे दमना,
तुमच्या विजयि भुजबळें न गुरुव्यसनींहि मी सखेद-मना."

—मोरोपंत

---

६. नीतिपर श्लोक

श्लोक

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें,
धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें;
न जाणे न नेणे अशा पामराला,
बुझावूं शकेना विधाता तयाला. १

बळानें काढूं ये मणि मकरदाढेंत दडला,
महासिंधू-लाटा-तरण करूं येई भुजबला;
महासर्पातेंही सुमसम धरूं ये निजशिरीं;
परंतू मूर्खाचें हृदय धरवेना क्षणभरी! २

जधीं कांहीं कांहीं हरि, कवि, असे शब्द शिकलों,
तधीं 'मी सर्वज्ञ' द्विपसम मदें याच भरलों!

जधीं 'कांहीं नेणें', म्हणुनि वदले पंडित मला,
तदा माझा गर्व-ज्वर सकळही हा उतरला ! ३
विपत्कालीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें,
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे,
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति विद्या व्यसन जें,
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा, सत्पुरुष जे. ४

वानोत निंदोत सुनीतिमंत,
नसो असो वा कमला गृहांत,
हो मृत्यु आजीच, घडो युगांतीं,
सन्मार्ग टाकून भले न जाती ! ५
जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा,
संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा ?
पद्माचा जो तंतु तो वारणाला,
वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला ! ६

झाला क्षीण बहु क्षुधेस्तव जरी कीं व्यापिला वार्द्धकें,
आली कष्टदशा, घडो मरणही, कीं तेज गेलें निकें,
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा—
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तक, शुभग्रासींच ज्याला स्पृहा ! ७
पेटीमाजि निरोधिला, न सुटका ज्याला भुकेला फणी,
तों केलें बिळ मूषकें अवचितां, तो आंत गेला क्षणीं;
त्यातें भक्षुनि सर्प, तत्कृत-पथें निश्चिंत गेला पहा !
ऐसें कर्म अतर्क्य ! यास्तव तुम्ही कीं स्वस्थचित्तें रहा. ८

आस्फालितांही स्वकरें न राहे,
चेंडू जसा तो उसळेच पाहें;
विपत्तियोगें पडले जरी कां,
तें धैर्य नोहे तरि साधुंला कां ? ९

चेंडू पडे आणि उठे तसाची—
दृष्टान्त हा सत्पुरुषास साची;
मृत्पिंड जो त्या उठणेंच नाहीं,
दृष्टान्त हा केवळ दुर्जनाही. १०

जो तोषवी स्वजनकास, सुपुत्र तोच;
जें दे पतीस सुख फार कलत्र तेंच;
जो एकरूप सुखदु:खपणीं, गडी तो;
हा लाभ पूर्वसुकृताविण केविं होतो ? ११

संपत्काळीं कोंवळें सज्जनाचें—
होतें चित्त ज्ञाति पंकेरुहाचें;
आपत्काळीं शैलही आदळो कां—
भाकेना जें, गाजवी धैर्य डंका ! १२

विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा,
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा;
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं,
तो सर्प काय न डसे खल अंतरंगीं ? १३

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्मे,
वर्णी बरेच गुण, झाकुनिया कुकर्मे;
दे आरणास असतां, व्यसनीं त्यजीना,
सन्मित्रलक्षण असें वदतानि जाणा. १४

तोयाचें परि नांवही न उरतें संतप्तलोहांतरीं,
तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी !
तें स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें,
जाणा उत्तममध्यमाधम-दशा संसर्गयोगें टिके. १५

पुष्पापरी दों परिंचीच साची। हे वृत्ति संभावित जे तयांची,
लोकांचिये एक शिरीं सजावें। वनींच एक कीं सुकोनि जावें !

भाग्याला सुजनत्व भूषण असे, कीं मौन शौर्यास तें,
ज्ञानाला शम, त्या शमास विनय, द्रव्यास दातृत्व तें,
अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दंभता,
या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्त्वतां. १७

खरें वचन बोलवी, जडपणास कीं मालवी,
महोन्नतिस डोलवी, दुरित मारुनी चालवी,
मनीं सुख अमोल वी, यश जगत्त्रयीं कालवी,
अनेक गुण पालवी, सुजनसंग तो भूलवी. १८

वांच्छा सज्जनसंगमीं, गुरुकुलीं वंद्यारुता, नम्रता,
निंदेचें भय, तुष्टता परगुणीं, लोकार्जनीं लुब्धता,
विद्याभ्यास, महेशभक्ति, खलसंसर्गीं अनासक्तता,
चित्ताचा जय, या गुणांस निधि जे त्यां वंदिजे तत्त्वतां. १९

खोटें बरें कार्य असो तयाचा। विचारिजे कीं परिणाम साचा,
कर्तव्य कीजे विबुधें विवेकें। तें अन्यथा शल्य घडे विपाकें. २०

अब्धीमाजि बुडो, प्रयत्न करुनी हेमाद्रिशृंगीं चढो,
शत्रूतें रगडो रणीं, क्रयकृषिव्यापारकर्मीं भिडो,
विद्या सर्व पढो, कडेविकडिच्या व्योमास लंघो, उडो,
जें होणार चुकेचि ना, विधिबळें, बेटा रडो ना रडो! २१

मरावें कीं होतें सुरपतिसिं देऊनि झगडा,
प्रहारें वज्राच्या करुनि धरणी इंगळसडा,
पित्यातें संग्रामीं त्यजुनि भय निःशंक भिडणें;
नव्हे त्या मैनाका उचित जलधीमाजिं दडणें. २२

कर्मानुसार घडते गति सर्व लोकां;
कर्म-अधीन फल, येथ नसेच शंका;
हें सत्य यद्यपि तरी, असतां विवेकें—
होणार हो मग सुखें निजकर्मपाकें. २३

वनचरांसह शैलवनांतरें। निजसुखें फिरणें तरि तें बरें;
जरि घडे सहवासचि पामरीं। तरि जळो असणें सुरमंदिरीं.
श्रुतेंचि कीं श्रोत्र, न कुंडलानें। दानेंचि कीं पाणि, न कंकणानें,
साजे तसा देहहि हा न आनें। परोपकारेंचि, न चंदनानें.

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना—
दावी धन्यास, जठरार्थ कसें पाहा ना!
दे आळवूनि जरि हस्तिप, बाप! भाई!
घेतोचि घास गजराज कशी बढाई? २६

प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा;
नृपा तूं करीं फार सांभाळ याचा;
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें,
अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें. २७

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें,
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें;
जाणोनि हें सुजन, ज्या दुबळीक आली,
त्याची कधीं न करिती सहसा टवाळी. २८

बरें तें या देहीं महिवरि कडेलोट करणें,
महासर्पाच्या कीं वदनिं तरि हा हात धरणें,
उडी कीं वन्हींत त्वरित जरि घालूनि मरणें;
जळो तें कीं लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें. २९

विद्या हें पुरुषास रूप बरवें, कीं झांकलें द्रव्यही,
विद्या भोग-सुकीर्ति-दायक पहा, ते मान्य मान्यांसही;
विद्या बंधु असे विदेशगमनीं, विद्या महादेवता,
विद्या पूज्य नृपास, हा नर पशु तीवेगळा तत्त्वतां! ३०

उपजणें मरणें न चुके नरा,
फिरत नित्य असे भवभोंवरा;

उपजला तरि तोच मला गमे,
कुल समुन्नति ज्यास्तव घे रमे. ३१
वृक्ष फार लवती फलभारें । लोंबती जलद घेउनि नीरें;
थोर गर्व न धरी विभवाचा। हा स्वभाव उपकारपराचा. ३२
जें पात्र कां पुरुषरत्न महागुणांचें,
तें निर्मितो विधि विभूषण भूमिकेचें;
कीं त्यासही त्वरित मृत्युमुखांत लोटी,
त्याची गमे मज अपंडितता करंटी ! ३३
जसा वर्ततो लोककल्याणकारी,
जगीं वर्तती लोकही त्या प्रकारीं;
वदे तो सदाचार, शास्त्रार्थ जैसे,
जगीं वर्तती लोकही सर्व तैसे. ३४
जे मायबाप, जन-शासन-दंडधर्ते,
जे साधु सर्वसम, जे नयनीतिकर्ते;
ऐशांसही विषमता उपजेल जेव्हां,
कोणास हे शरण जातिल लोक तेव्हां ? ३५
—वामन

---

७. हिमालयपर्वतावरील सृष्टिशोभा

श्लोक

जेथें प्रकल्पितजटेंतुनि शंकराच्या—
ही येतसे प्रथम दृष्टिपथा जनांच्या,
तेथें घडीभर बसून समग्र सृष्टी-
सौंदर्य भोंवतिल देउन सूक्ष्मदृष्टी, १
जातां बघूं मग किती तरि जागजागीं—
चोहींकडील सुमनोहर भूविभागीं—

शोभा दिसे ! विविध रम्य किती पदार्थ—
देऊन दर्शन तिला करिती कृतार्थ ! २
जैसें वसंतसमयीं मधुमाक्षिकेला,
चोहींकडून फुलल्या सुमवाटिकेला—
दैवें प्रवेश मिळतां, तिजला अपार—
होतो प्रमोद, मनिं उत्सुकताहि फार; ३
तैसेंचि मन्मनहि या बघतां नगातें,
आनंद-सिंधु-लहरींत बुडून जातें;
जो या स्थळीं रुचिर वस्तुसमूह थाटे,
तो पाहण्यास मज कौतुक फार वाटे ! ४
त्यानंतरें, मग जशी मधुमाक्षिका ते,
सानंद पंख अपुले उडवीत जाते;
एका फुलांतिल पिऊन रसा, दुजातें,
तेथीलही रस पिऊन पुढें तिजातें, ५
त्या रीतिनेंच मम दृष्टिहि या स्थळाची—
शोभा विचित्र रमणीय पहावयाची—
इच्छा धरून हृदयांत, यथाक्रमानें—
सारे पदार्थ निरखी परमादरानें. ६
जातां दृष्टी प्रथमचि पहा या गिरीच्या तळातें,
जें रानाचें वलय दिसतें रुंद त्याच्या सभोंतें,
त्या 'तार्यानी' म्हणुन वसतें देशभाषेंत नांव,
लोकीं त्याच्यापरि न दुसरा सांपडे घोर ठाव. ७
होती या उद्गम जवळच्या उंचभागीं जयांचे,
त्या साऱ्याही सलिल जमतें या स्थळीं निर्झरांचें;
त्यायोगानें बहु दलदली थोर या घोर रानीं—
होती तापे रविहि वरतीं लंबरूपी करांनीं. ८

त्यानें तेथें विपिन इतकें किर्र माजून जातें,
कीं त्यामध्यें स्थळ न गवसे पायही ठेवण्यातें;
कोठें माजे यवस, झुडुपें कंटकांचींहि कोठें,
कोठें जाती सरळ गगनीं वृक्षही मोठमोठे. ९
कोठें होती अविरल वनें वेतसाचीं अफाट,
कोठें साधारण गवतही वाढतें उंच दाट.
जागोजागीं पडुनि तरुंचीं जीर्णपर्णें, कुजून-
जातां वाफा विषमय निघूं लागती त्यांमधून; १०
त्यांनीं वातावरण भरतें भोंवतालील साचें,
त्यायोगें या स्थळिं न घडतें राहणें मानवाचें.
ऐसें आहे तरिहि, विविध श्वापदें क्रूर, चंड,
रानीं या निर्भय चहुंकडे हिंडती हीं उदंड. ११
कोठें मत्त द्विरद फिरती थोर यूथें करून,
कोठें व्याघ्रप्रवर करिती वास खिंडींमधून,
कोठें कुंजाश्रय करुनिया वन्य गाई रहाती,
कोठें वस्ती वरिति तरुच्या कोटरीं ऋक्षजाती. १२
यांतें स्वप्नामधिंहि न असे मानवी शक्ति ठावी,
तेव्हां तीपासुनि मरणभी केविं यांतें असावी ?
हे सोडून प्रविततविषोद्गारगंधी अनूप-
जातां कांहीं चढुनि वरतीं या नगाचें स्वरूप- १३
पूर्वीपेक्षां अधिक दिसतें सौम्य; पाहून ज्यातें-
होतें दृष्टीप्रति सुख, महानंदही मानसातें.
जातां मार्गीं बघत, लवणांतून दोहींकडे तें,
येथें दृष्टी पडति हिरवीं गार विस्तीर्ण शेतें. १४
कोठें त्यांच्यामधुनि दिसती ओघ हे निर्झरांचे,
वाहे शुद्ध, स्फटिकसदृश, स्वच्छ वारी जयांचें;

कोठें कोठें मधुनि दिसती रम्य गांवें; तयांच्या-
भोंतीं ताट्या अविरल पहा लागल्या या फुलांच्या ! १५
चांफा, जाई, गुलतरु, गुलाबादिकांतें विकास-
होतां, त्यांचा मधुर पसरे गंध दाही दिशांस.
कोठें सौगंधिक शतदलीं पद्मखंडें विकास-
कासारांच्या धरिति सलिलीं; त्यांमधें राजहंस- १६
आनंदानें प्रियसहचरींयुक्त राहून शांत,
संसारींचीं सकळहि सुखें पूर्ण हे भोगितात !
जे उत्पत्ती धरिती समशीतोष्ण वा उष्णदेशीं,
ते एकत्र द्रुम सकलही वाढती या प्रदेशीं. १७
कोठें माळावरि उगवती देवदारू विशाल,
कोठें ओकद्रुम विलसती, उंच कोठें तमाल,
पारंब्याही सुटुनि धरणीमाजिं कोठें वडांच्या,
जीं कां त्यापासुनि उगवती अन्य झाडें, तयांच्या- १८
गुंफा होती निबिड, तरुणादित्य तापातें ज्यांतें-
कस्तुरीचे मृग निपजती प्रत्यहीं आश्रयातें.
ज्यांतें आलिंगिति मधुलता मुग्ध-शाखा-करांनीं,
ऐसे आम्रद्रुमहि दिसती नम्र भारी फलांनीं. १९
जो या स्थानीं सतत घुमतो कंदरांतून वारा,
त्या मानून स्तनित, अपुला चित्रवर्णी पिसारा-
सारा प्रेमें पसरुनि, गलत्प्रेम-नेत्रांबु-पूर,
वृक्षस्कंधीं रुचिर करिती तांडवातें मयूर ! २०
जी या स्थानीं निबिड जमते शीतकाळीं हिमानी,
ती ग्रीष्मींच्या द्रुत वितळतां भास्कराच्या करांनीं,
मोठीं मोठीं हरित कुरणें वाढती या विभागीं,
त्यांच्यामध्यें चरति पशुंचे संग्रही जागजागीं. २१

काहीं जागीं हरिण चरती हे निजेच्छानुसारें,
कोठें वन्यच्छगल, इकडे ग्राम्य कोठें खिलारें;
कोठें दृष्टी पडति बकरीं, आत्मजांतुल्य ज्यांसी--
शालीसाठीं जतन करिती लोक काश्मीरवासी. २२
जातां हाहि चढून भाग वरतीं, तेथें दिसूं लागती—
साऱ्या वस्तु उदास, रूक्ष; अवघें ओसाड दृष्टीप्रती;
भासे हें स्थळ पाहतां, मधुरसा चाखून त्याच्यावरी—
खातां तिंतिडिका, घडे तशि अतां मच्चित्तवृत्ती बरी. २३
जातां या स्थलिं खालतीं, वरि, पुढें, मागें, चहूंहीकडे—
सारें बर्फ दिसे, तयाविण दुजें कांहीं न दृष्टी पडे;
वर्षांतून सदैव शीत अपुला आवास येथें करी,
तेणें वृद्धि न उद्भिजा घडतसे या शून्यभागावरी. २४
भूर्जाचे तरु जे क्वचित् खुरटले थंडीमुळें राहती,
त्यांवांचून न कोणतेहि दुसरे तेथें तरू वाढती;
कस्तूरी-मृग वा मदोद्धत करी वा हिंसक श्वापदें,
किंवा पक्षिसमूहही न करिती तेथें निवासास्पदें. २५
जातां प्राणिनिवासचिन्हहि बघूं कोठें नसे तत्त्वतां,
सारा भाग दिसे भयाण, अवघी भासे उदासीनता;
कोठें उंच कड्यांवरून पडतां वेगें नद्या खालतीं,
त्यांचीं पातविशीर्ण तूर्ण शतधा धाराजळें वाहती. २६
तीं वेगें खडकांमधून पुढतीं वाहूं जशीं लागती,
त्यांच्या भीमरवें प्रपूरित दऱ्या तैशाहि नादावती.
या येथून विलोकितां दिसति जीं जातां नभोभ्यंतरीं,
स्वर्गारोहण-हेतु-निर्मित महासोपानमार्गापरी, २७
एकामागुन एक, उंच शिखरें या अद्रिचीं, त्यां शिरीं—
शोभे क्षीर-विपांडु-निर्मळ हिम-प्रावार वस्त्रापरी;

ग्रीष्मींचा प्रखरप्रतापहि जरी भास्वान् सहस्त्रां करीं—
प्रत्यब्दीं हिम येथलें वितळण्यासाठीं प्रयत्नां करी, २८
सारें व्यर्थ तरीहि; बर्फ न कधीं येथील जातें लया;
ज्यातें थोर निजाश्रया वितरती, कांहीं नसे भी तया.
जीं येथून समीप फार दिसती तीं स्वच्छ नेत्रांप्रती;
त्यांमागील लगेच अंधक जरा कांहीं दिसूं लागती; २९
त्यांहीहून विशेष अंधक दुजीं त्यामागचीं यापरी—
ओळीनें शिखरें जशीं चढत हीं जाती नभोभ्यंतरीं,
तैसा आदिमवर्ण पालटुनिया नीलत्व त्यां येतसे,
यायोगें गगनास आणिक तयां वर्णैकता होतसे ! ३०

चिंतामणिपेठकर, गंगावर्णना

---

८. शल्यकर्ण-संवाद

[शल्य हा पांडवांचा मामा, तथापि तो भारतीय युद्धांत कौरवांकडे होता. हा सारथ्यकर्मांत फार कुशल होता. अर्जुनाचा सारथी कृष्ण असल्यामुळें अर्जुन कर्णापेक्षां युद्धांत वरचढ होईल, हें मनांत आणून दुर्योधनानें शल्यास विनवून त्याचेकडून कर्णाचें सारथ्य स्वीकारविलें. तो सारथी झाला असतां त्याचें व कर्णाचें जें भाषण झालें तें पुढें वर्णिलें आहे. शल्य हा कर्णाचा मुद्दाम पाणउतारा करून त्याचें मन युद्धांत उदास करीत असे व निरंतर त्यास टाकून बोलत असे. उताऱ्यांतला कर्णाचा स्वाभिमान लक्षांत ठेवण्यासारखा आहे.]

आर्या

कर्ण म्हणे, " शल्या, गति भीष्माची शत्रुंनीं तशी केली,
गुरुहि अधर्में वधिला, विजयश्री ओढुनी बळें नेली. १
पार्थप्रताप साहे आहे मजवेगळा असा कोण ?
गंगासुत वृद्ध भला, तो ब्राह्मणही पुरातन द्रोण. २

माझें प्रिय बहु केलें धृतराष्ट्रसुतें तदर्थ साधीन,
ह्याविषयीं प्रिय-भोगांसह जीवित करिन अंतकाधीन." ३
इत्यादि आत्मविक्रम जेव्हां स्वमुखें यथेष्ट कर्ण वदे,
शल्य तया उत्तर दे, उग्र जसें विष हरासि अर्णव दे. ४
"नरवर अर्जुन कोठें, पुरुषाधम सूतपुत्र तूं कोठें ?
वाचाळा नाचावें सत्स्तवनीं, न स्ववर्णनीं ओठें. ५
तुज नित्य घोष-यात्रा-स्मरण असावें परंतु हा मद तों—
आहेचि विस्मृतीचें बीज, म्हणुनि लेशमात्र मी वदतों. ६
बद्ध विमुक्त सुयोधन तेंव्हां त्वां, कीं धनंजयें केला ?
राधेय अन्य तूं, तो अन्यचि जाणों, पळोनि जो गेला! ७
त्या गोग्रहप्रसंगीं, भीष्म-द्रोणादि सर्व एकानें—
केले भग्न, दशा ते तुमची क्षण आयकों नये कानें ! ८
तेंव्हां त्वां तो अर्जुन, राधेया कां न जिंकिला ? शस्त्रें—
अस्त्रें गेलीं होतीं कोठें ? नेलीं हिरोनि जैं वस्त्रें ? ९
झालें युद्ध उपस्थित; आजि पळेनासि जरि, तुला पार्थ—
मारील निश्चयें, हें कर्म करिशि निजवधू—विलापार्थ." १०
कर्ण म्हणे, "गा शल्या, मागील कथा कशास जरि आजी,
मज जिंकील तरि खरें तव कथन; शीघ्र चालवीं वाजी."
शल्य म्हणे, "बहु बरवें, पार्थाशीं गांठि घालितों तूर्ण,
ईश्वर-वरानुकूलें दैवें होतात कामना पूर्ण !" १२
कर्ण म्हणे, 'सुज्ञवाया भूप-सखा करुनि शत्रुचें निधन,
सांगेल पार्थ मज जो, देइन मागेल जें तयासि धन.' १३
शल्य म्हणे, "राधेया वांटिशि धन कां कुबेरसा ? अज्ञा,
पार्थ पहाशील सुखें, व्ययवेत्ते वित्त वेंचिती यज्ञा. १४
कंठीं बांधोनि शिळा, बाहुबळें जेविं सागरीं तरण,
कीं भृगुपतन, तसें हें, जें तूं करणार त्या अरींत रण! १५

व्यूह रचोनि, सकळ नृप, बंधु, सुत, सुयोधनादिकांसहित,
पार्थाशीं युद्ध करीं, जरि म्हणसी स्वजय, हो न हो अहित."
कर्ण म्हणे, " शल्या, मी स्वभुजबळें प्रार्थितों रणीं पार्था,
हे प्रभु सहाय असतां साधीना कर्ण कोणत्या स्वार्था ? १७
या दृढ मदभिप्रायापासुनि वारूं शके न शक्र मला,
मर्त्याची काय कथा ? प्राकृतसा काय कर्ण हा गमला ?" १८
शल्य म्हणे, " राधेया, जेव्हां तुझिया स्मरोनि कर्मातें,
अर्जुन तीव्र शरांनीं समरीं भेदील सर्व मर्मातें, १९
तेव्हां पश्चात्तापा, बापा, तूं पावशील पापानें,
सापानें धरिला प्लव न जगे, बडबडासि तूं जसा पानें ! २०
तूं विजयासि वधाया वांच्छिसि, हें कोण जाणता साहे ?
अंबांकस्थित शिशु शशिमंडळ कवळावया जसा पाहे ! २१
स्वबिलस्थ कृष्णसर्पा काष्ठें टोंचोनि खवळिशी कां गा,
तीव्र त्रिशूळवदनें तूं खाजवितोसि आपुल्या आंगा. २२
पार्थ-पयोधर गर्जे, स्पर्धा मंडूक तूं वृथा धरिशी,
त्याच्यापुढें टुरुटुरू टरोंटरों शब्द हे किती करिशी ? २३
श्वान स्वपोषकाच्या सदनाच्या आश्रयें उभा राहे,
जिकडे वनांत गर्जे शार्दूल तया दिशेकडे पाहे ! २४
शशमंडळांत कोल्हा म्हणतो, 'मी सिंह !' वल्गना करितो,
जोंवरि न पाहिला गज-मुक्ताफळ-कवळ-भक्षिता हरि तो."
कर्ण म्हणे, " गुणवद्गुण जाणे गुणवंत, अगुण नेणेची,
प्रसवे तीच अभिज्ञा, शल्या, तैसी न वांझ वेणेची. २६
मी आपणास जाणें, जाणें त्या जिष्णुलाही तत्त्वानें;
तैसें न जाणिजे त्वां इतरें, बा सत्त्वहीन सत्त्वानें. २७
पार्थवधाचें साधन आहे, तें सांगतों तुला जेणें—
आज द्वैरथयुद्धीं विजयाचे प्राण निश्चयें घेणें ! २८

भ्यालासि मूढबुद्धे, बडबडसी, फार वानिसी अरिला,
भाव तुझा मज कळला, धीर तुझा मृत्युच्या भयें हरिला. २९
ते मारितील मज कीं त्यांला मारीन मी, स्व-बळ जाणें,
कृष्णाला कर्ण न भी, तनु टाकुनि एकदां असे जाणें ! ३०
दोघांची काय कथा, जरि कृष्णार्जुन सहस्र येतील,
तरि माझे शर त्यांच्या प्राणधनातें हिरोनि घेतील ! ३१
मज युद्धाभिप्रायापासुनि मागें बळेंचि फिरवील,
ऐसें भूत नसेचि त्रिजगीं, जें या यशास मिरवील ! ३२
भ्याडासि भेडसावीं, मी भ्याया उपजलों नसें कांहीं,
विक्रमयश साधाया झालोंसें, चाल, पथ पुढें पाहीं !"३३

—मोरोपंत

---

९. माझे सृष्टीचे शिक्षक

[सृष्टींतील प्रत्येक वस्तूपासून काय काय शिकतां येण्यासारखें आहे हें कवि यांत दर्शवीत आहे.]

[चाल—'भूपती खरें •'—]

मम शिक्षक असती जगतिं दयाळु अनेक
सच्छिक्षण देती तेचि मला बहुतेक १
ही शिला शिकविते, हृदय असूं दे थोर
जरि प्रहार त्यावरि होय असह्य अपार २
हा पवन शिकवितो, स्वैर फीर कोठेंही
निष्कलंक राहीं, चित्त न ढळुं दे लवही ३
हा वृक्ष शिकवितो, मुदित मनें नित डोलें
व्यसनीं न त्यजिं, जरि महान शिरिं कोसळलें ४
हा सागर शिकवी, परोपरीनें सत्य
कीं निश्चल ठेवीं वृत्ति तुझी तूं नित्य ५

हा पर्वत शिकवी, धैर्य धरीं रे पूर्ण
मग आहे सुखकर हा भव दुस्तर जाण ६
हा चंद्र शिकवितो, प्रशांत, शीतल राहीं
निज शरीर मत्सम करिं न कलंकित कधिंही ७
तारका शिकविती, धरीं ऐक्यता समता
त्याविणें न वाटे मौज खरी जगिं चित्ता ८
ही भूमि शिकविते, उदारता हृदिं ठेवीं
निजकृतिनें कवणा विन्मुखता नच दावीं ९
हा मेघ शिकवितो, मुखें सुधामय धारा
कीं, वर्षीं प्रमुदित होइल जनगण सारा १०
ही निशा शिकविते, कपट न शिवुं दे मतिला
करिं धारण मानसिं प्रेमळता ती विमला ११
ही सरिता शिकवी, लोभ धरीं या भुवनीं
सकळिकीं सुष्टखल भेद न ऐसा मानीं १२
हा भानु शिकवितो, प्रकाश निज कीर्तीचा
पसरवीं असा कीं, स्पर्श न होय तमाचा १३
हें गगन शिकवितें, सत्पथ सुखद विशाळीं
या नश्वर जगतीं कुणि न कुणाचा वाली १४
ही चपला शिकवी, क्षणिक भ्रमाचा भास
भुलुं नको तयामधिं हरिपदिं लावीं ध्यास १५
बुडबुडा जलाचा शिकवी जीवितकाल
क्षणभंगुर, बघ तव वाट बघे हा काल १६
आणीक असति बहु गणाति न होय तयांची
विधिनिर्मित वस्तू नीति शिकविती साची १७
त्यां त्रिवार करितों प्रणाम कर जोडोनी
तद्बोध वसो दृढ मम या अंतःकरणीं. १८

—आनंदकृति

१०. मोरोपंतांची केकावलि

['**केकावलि**' या नांवाचें मोरोपंतांचें एक काव्य आहे. मोर या पक्ष्यास मेघाची आवड फार, तेव्हां मोरोपंत आपल्या नांवावरून आपल्यास मोर व परमेश्वरास मेघ कल्पून कवितेंत तसा संबंध वारंवार आणितो. परमेश्वराच्या दयाळूपणाची व उदारत्वाची कल्पना मेघाच्या उदाहरणावरून व भक्ताची कल्पना मोराचे उदाहरणावरून चांगली होईल. या काव्यांत परमेश्वरानें आपणावर कृपा करावी म्हणून मोरोपंत त्यास हाका मारीत आहे. 'केका' म्हणजे मोराचें ओरडणें व 'केकावलि' म्हणजे केकांची पंक्ती–पुष्कळ केका किंवा मोराच्या पुष्कळ हाका, असा अर्थ समजावा.]

श्लोक

तुझ्या बहुत शोधिले अघनिधी पदाच्या रजें,
न तें अनृत, वर्णिती बुधजनीं सदाचार जें;
असें सतत ऐकते, सतत बोलते, मी च ते—
प्रमाण न म्हणों जरी, उचित माझिया नीचते. १
तसाचि उरलों कसा? पतित मी नसें काय कीं–
कृपाचि सरली, असेंहि न घडे जगन्नायकीं!
नसेन दिसलों कसा? नयन सर्वसाक्षी रवी;
विषाद धरिला म्हणों, न सुरभी विष, क्षीर वी! २
सदैव नमितां जरी पद, ललाट केलें किणें,
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें;
नता करुनि मुक्तही म्हणसि, मी बुडालों रिणें!'
अशा तुज न जो भजे मनुज, धिक् तयाचें जिणें! ३
धना परिजना घरीं तुमचिया उणें कायसें?
न लाभ, मणिहेमभूपतिस जोडिल्या आयसें,
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुंला ठेविती,
गुणा, न म्हणतां उणाअधिक आदरें सेविती. ४

अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार, बा हे विधि,
श्रुतिज्ञहि म्हणे सदा; स्तविल आमुची केविं धी ?
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती;
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ५
गमो मधुर हें विषस्तवन, सेवितां माजवी;
करी मलिन सद्यशोमुख, हलाहला लाजवी;
हरापरिस तूं बरा प्रभुवरा, सदा जो पिशी;
असा रस समर्पि, त्या अमृत आपुलें ओपिशी ! ६
शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो, चुकतसों तरी करिशि तूंचि संरक्षण;
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि ती;
रुचे विषय; ज्यां मिळे अमृत ते न मद्या पिती. ७
न जें प्रिय, सदोष तें; प्रिय सदोषही चांगलें;
स्वतोक पितरां रुचे जरिहि कर्दमीं रांगलें;
तुलाचि धरि पोटिशीं काशि तदा यशोदा बरें—
जरी मळविशी रजोमलिन-काय तूं अंबरें ? ८
पिता जरि विटे, विटो; न जननी कुपुत्रीं विटे,
दयामृत रसार्द्र-धी न कुलकज्जलें त्या किटे;
प्रसादपट झांकिती परि परागुरूचे थिटे,
म्हणूनि म्हणती भले, न ऋण जन्मदेचें फिटे. ९
प्रभो, शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे,
म्हणोनि इतुकेंच हें स्वहितकृत्य जीवांकडे;
प्रसाद करितां नसे पळ विलंब, बापा, खरें;
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पाखरें. १०
म्हणा मज उताविळा, गुणचि घेतला; घाबरें—
असो मन असेंचि, बा भजक बर्हि-मेघा, बरें;

दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें—
धरील मन, आधिनें बहु परिभ्रमे चाकसें ! ११
कृतांत-कटकामल-ध्वज जरा दिसों लागली,
पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली;
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा,
न हों जरि उताविळा, स्वरिपु कापितो हा गळा. १२
सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रि-कमळीं दडो, मुरडितां हटानें अडो,
वियोग घडतां रडो मन, भवच्चरित्रीं जडो ! १३
न निश्चय कधीं ढळो, कुजन-विघ्न-बाधा टळो,
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्त मार्गीं वळो,
स्वतत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो,
पुन्हा न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो ! १४
दयामृतघना, अहो हरि, वळा मयूराकडे,
रडे शिशु, तयास घे कळवळोनि माता कडे;
असा अतिथि, धार्मिकस्तुतपदा, कदा सांपडे ?
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासा पडे. १५

—मोरोपंत

११. भीम आणि दुर्योधन यांचा गदायुद्धाच्या अगोदरचा संवाद

[भीम आणि दुर्योधन दोघेही शेवटच्या गदायुद्धास आरंभ करण्यापूर्वी एकमेकांचीं मागलीं उणीं काढून एकमेकांस रागानें बोलत आहेत.]

आर्या

भीम म्हणे, "रे अधमा, केलें त्वां आणि जें तुझ्या तातें,
चित्तांत आठवावें, पदरीं फळ घ्यावया, कुजाता, तें. १

विष चारिलें, बुडविलें डोहांत करावयासि वध मातें,
स्मर वारणावतीचें जतु-सद्म-छद्म-कर्म अधमा तें. २
कपट-द्यूतें हरिलें सर्वस्व पुढें करूनि कितवातें,
नेली सभेंत साध्वी, व्हावें शिवतां जिला चकित वातें. ३
त्वां नागवी करविली सुगुणांची प्रीतिहेतु जी वसती,
छळिली परोपरि, खळा अस्मत्सर्वस्व-कीर्ति-जीव-सती, ४
ऐशीं अनेक पापें केलीं त्वां, भरत-कुलकळंका रे,
तूं जेविं दुर्गुणांहीं, न असा दशतुंडही अळंकारे. ५
भीष्मप्रभु शरतल्पीं पडला, दुष्टा, तुझ्याचि पापानें,
त्वां बहु कुळें बुडविलीं, घननादाच्या अशीं न बापानें. ६
गुरु, कर्ण, शल्य वधिले, भगदत्तादिक अनेकशत राजे,
मथिले, त्वदनुजहि, म्हणत होते आम्हां रणांत न तरां जे. ७
जेणें कपटद्यूतें करुनि दिली हे तुला वश कु निखिळा,
मदुरांत पुन्हा परिभव-तापाचा हेतु लाव शकुनि खिळा! ८
क्षम सज्जनच्छळासिच सर्व तुम्ही पाप, अक्षम रणाला,
पांडव न हेतु, तुमच्या जे फिरले तेचि अक्ष मरणाला. ९
उरलासि एक, सोदर गेले तिकडे तुलाहि पाठवितों,
तुज देय फळ दिलें किति किति उरलें हें मनांत आठवितों. १०
कुरुराज म्हणे, " मंदा मेळविलें बहुविकत्थनें काय,
हाय म्हणवितों, युद्ध-श्रद्धेसह भंगितों तुझा काय. ११
न्यायें शत्रु मज गदा-युद्धीं जिंकी असा असे कोण?
तूं महिष तोंचि, जोंचि न शोण-गदा-शक्ति-दृष्टिचा कोण. १२
न्यायें मज जिंकाया न समर्थ गदारणीं सुनासीर,
ये भूमींत, वितिलका व्हाया त्या पांडुच्या सुना, सीर. १३
वदलासि दुर्विचेष्टित माझें जें जें खरेंच भीमा तें;
मंदा, न तदेकप्रति-कृत घडलें म्हणुनि लाज, भी मातें! १४

म्यां करुनि तुम्हां वल्कल-धर, दीन सुचिर वनोवन फिरविलें,
अज्ञातवास, दास्यहि करवुनि निजतेज दुःसह मिरविलें. १५
तुज लाविलें स्वतेजें म्यांच कढी, भात, वरण घाटाया,
वांटाया प्राज्य पुरण, पापड, पोळ्या प्रभूत लाटाया. १६
माझे, तुझेही मेले आप्त बहु क्षय समान दोघांचा
कालें, जैसा घटजें त्या पूर्वापरसरस्वदोघांचा. १७
भाग्यें घडेल जरि, तरि मज परमश्लाघ्य संगरीं पतन,
जतन क्षत्रिय न करिति, जोडिति नाकीं तनुव्ययें वतन. १८
अद्यापि मला कोणी धर्में जिंकी असा असे न गदी,
छद्में वधितां तुमची होइल अपकीर्ति विषाचि ती अगदीं. १९
कौंतेया, त्वां शारद-वारिघनापरि वृथा न गर्जावें,
बळ असल्या दावावें, प्रथम विकत्थन समग्र वर्जावें!" २०

—मोरोपंत

---

१२. मनुष्य तितका एकच आहे

[स्थलांतरानें गंगेतील पावित्र्य बदलत नाहीं, समुद्राची स्थिति बदलत नाहीं, वायूचें वायुपण बदलत नाहीं, अगर जलकणांच्या आर्द्र-गुणांत फरक होत नाहीं. हीं उदाहरणें देऊन, कवि मनुष्याबद्दल सिद्धान्त स्थापित करीत आहे कीं, याचप्रमाणें मनुष्यें कितीही विभक्त राहिलीं, भांडलीं तंडलीं तरी त्यांच्यांतील मानवधर्माचें मूळ तुटत नाहीं, तें कायमच राहाणार, व त्या दृष्टीनें मनुष्य तितका एकच मानला पाहिजे.]

अंजनीगीत

मनुष्य तितका एकच आहे। सत्-चित्-सरिता एकच वाहे
राहो नाना देशीं राहे। मूळ कसें सुटतें? १
हिमालयाच्या तुंग शिरावरि। गंगोत्रीच्या हिममय पात्रीं
प्रयाग-काशी या देशान्तरिं। गंगा का बदले? २

अमेरिकेच्या फिरे भोंवतीं। स्थिर ध्रुवाच्या बर्फप्रांतीं
अथवा खरतर विषुवावरतीं। समुद्र का बदले ? ३
हाणी, जुळवी, विखरुनि टाकी। घन मेघांना क्षणें ।वितळवी
सळसळ पानांची आयकवी। तो का वायु नव्हे ? ४
जलराशींचे तुषार उडवी। तरंग चंचळ नाचूं लावी
लाटांचा कल्लोळ उसळवी। तो का वायु नव्हे ? ५
वेणूंतुन मंजुल रव उठवी। लतांमधें भ्रमरांस गुंगवी
गिरिकुहरांस घुमाया लावी। तो का वायु नव्हे ? ६
नरकंठांतिल तारा नादवि। हशा-रडयाचे शब्द वाजवी
रागरागिणी गाऊं लावी। तो का वायु नव्हे ? ७
म्हातारीला जगभर फिरवी। पाचोळा गगनांत भिरकवी
तरुवर धरणिवरतीं नमवी। तो का वायु नव्हे ? ८
सुसाट अथवा संतत वाहो। स्तिमित शांत वा गुंगत राहो
भरो दुमदुमो गगन-कटाहो। वारा तो वारा ९
जाती अथवा धर्म मिळेना। राग-द्वेषीं सख्य जुळेना
परि अंतरिंचा तंतु गळेना। मानवधर्माचा १०
संसारांतिल पंथ जमेना। हिताहितांचा मेळ बसेना
परि हृदयींचा सूर बुजेना। मानवधर्माचा ११
वेशांचें वैचित्र्य सुटेना। वर्णांचेंही वैर मिटेना
परि अंतरिंचा रव थांबेना। मानवधर्माचा १२
बळाबळाचा झगडा चाले। जयापजय ते कलहीं रमले
परि अंतरिंचे वेग न विरले। मानवधर्माचे १३
जलराशींचे डोंगर उठले। परस्परांवरि अपटुनि फुटले
जलकण परि ते लेश न मुकले। आर्द्रगुणा अपुल्या १४
नानादेशीं भटकत फिरले। मनुवंशाचे रोपे तुटले
मूळभाव परि नाहीं सुटले। मानवधर्माचे १५

—वा. ब. पटवर्धन (वसंत)

१३. धर्म-भीमांचें दुर्योधनाशीं त्याच्या अंतकाळचें भाषण

[भीम आणि दुर्योधन यांचें गदायुद्ध होऊन दुर्योधन मरणोन्मुख पडल्यावर त्याला भीम खोंचून बोलला व त्याचें शिर त्यानें पायानें तुडविलें. दुर्योधनास युवराजपदाचा अभिषेक झालेला होता यामुळें हें भीमाचें करणें धर्मराजास आवडलें नाहीं. त्यानें भीमाचा निषेध केला, व दुर्योधनाचें समाधान होण्यासारखें तो बोलला, त्या वेळेचा हा उतारा आहे.]

आर्या

पांचाळ मुदित झाले, जैसे होतांचि वृत्रहानि सुर,
होय वृकोदर मारुनि कुरुपतितें, जेविं वृत्रहा निसुर. १
दशमुखवधें कपिनिकर, कीं कंसवधें, नृपा, जसा नंद,
साप्त-सुयोधन-हननें होय तसा धर्मराज सानंद ! २
पतितातें भीम म्हणे, " रे कुर्वधमा, कुबुद्धिच्या कंदा,
" 'गौर्गौः' म्हणोनि, हासत होतास सतीस तूंच कीं मंदा ! ३
दुःशासनासि सांगुनि करवित होतासि तूंचि कीं नग्ना,
कृष्णा कपिला केली, क्रूरा, त्वां कष्ट-कर्दमीं मग्ना ! ४
त्या कर्मांचें घे फळ ! " ऐसें गर्जोन वामपादानें-
शिर तुडवी ईश्वरसा दे भीम कृतानुरूप बा दानें. ५
'गौर्गौः' म्हणोनि हांसत नाचत होते यथेष्ट जे दुष्ट,
आम्ही तसेंच 'गौर्गौः' म्हणतों, हासोनि नाचतों तुष्ट ! ६
जिंकाया शत्रूंतें विष, वन्ही, द्यूत, वंचना कांहीं-
निज-बाहु-बळा-वांचुनि आम्हांस उपाय ठाउका नाहीं. ७
वस्त्र सतीचें फेडित होते, छळुनी प्रभूत पापिष्ट !
तीच्याचि तपें झाले हे देवा सर्वभूतपा, पिष्ट ! ८
कृष्णा, धर्मा, विजया, माद्रीसुतहो, समस्त परिसा रे !
'षंढतिल' म्हणत होते ते म्यां वधिले रणांत अरि सारे ! ९

जो 'गौगौंः' 'षंढतिल' इत्याद्युपहास करुनिया हासे,
तो हा दुर्जन, याच्या पडले कंठांत मृत्युचे फांसे !' १०
ऐसें गर्जुनि मस्तक मर्दी चरणें पुन्हाही कोपानें,
तें साहिलें परोपरि पर-पादाक्रमण जेविं सोपानें. ११
त्यासि अजातारि म्हणे, " केली, बा त्वां खरी प्रतिज्ञा ती;
मूर्धाभिषिक्त कीं हा संमत शौर्यें हरीप्रति ज्ञाती. १२
झालासि निपट वश तूं कोपाला उचित काय बापा हें ?
लिंग पदच्युत, भग्नहि, लंघ्य नव्हे; साधुनीतिला पाहें. १३
सद्ब्राह्मणाभिमंत्रित शत-तीर्थजलाभिषिक्त कीं शिर हें;
अर्घ्यार्ह नव्हे काय ग्रहणीं रविमंडळ प्रभाविरहें ? १४
सर्व जण म्हणाति धार्मिक भीम, असें यश तुवां न बुडवावें.
चरणें राजोत्तमशिर बहुमत-शतपत्रसें न तुडवावें." १५
वदुनि असें गहिंवरला महिवर लावूनि बोल भावास,
मग जाउनि जवळ म्हणे पतिता अतितापद-प्रभावास. १६
" बापा सुयोधना, तूं आतां कांहीं करूं नको शोक,
जो कर्म जसें करितो तैसें सुखदुःख भोगितो लोक. १७
बा, बहु अपराध करुनि, बुडवुनियां स्व-पर, बहु बुडलास,
सुमतांतुनि तूं तोया-आंतूनि अलाबुसा उडालास. १८
रणमखहतासि तुज सुख देतिल आदित्य, रुद्र, वसु नाकीं;
मज दुःखाचि राजाच्या करितिल सविलाप उद्भव सुना कीं !
गुरु-बंधु-सुत स्वजनावांचुनि सुखभोग ते नरक सारे;
बा वर्तेल अवीरा-शत-धिक्कृत मज-असा नर कसा रे ?२०
त्या म्यां कशा पहाव्या झाल्या तुमच्या वधू अवीरा ज्या,
त्वां दुस्तरा मज पराभूति दिली हे सदा नवी, राजा !"२१
यापरि विलाप बहुतचि करिता झाला नृपा, अजातारी,
समजावी मधुपासुनि जो देव करुनि कृपा अजा तारी.२२

—मोरोपंत

१४. लीला

[अनाथबालिकाश्रमांतील एक पांच वर्षांची मुलगी.]

दिंडी

दिसे मजला हें पुढें गोड मूल
पडे कोमेजुनि रम्य तसें फूल
एक निर्णय मनिं होत नसे साच
विषय दृष्टीचा द्विविध हा तसाच १

जसें वेलीचें दलित गलित फूल
बालविधवेचें तसें पतित मूल
दिसाति दोन्हीही सारखीं मलूल
कृपादृष्टीची कुणि न घालि झूल २

पांच वर्षांची छबकडी सुरेख
जणूं चिमणीशी हिरकणीच देख
कशी चित्रासारखी उभी राही
नांव ठेवाया सोय मुळीं नाहीं ३

कुण्या ऋषिच्या यानास अडखळून
पडे निखळुनिं जणुं नील पटांतून
आलि खालीं ही चांदणीच एक
तरिच इतकी ही चमकते सुरेख ४

बाल अवयव रेखींव एवढाले
कल्पनेच्या जणुं भ्रमें चित्र हाले
काव्य तरळत जणुं हृदयिं कविजनाचे
बाल-सौंदर्यहि असें देहिं नाचे ५

बाल-सौंदर्यहि असें देहिं नाचे
तरी वाटे हें स्वप्न निर्धनाचें

यास कारण तें पाहतां दिसेची
जोड सौंदर्या उदासीनतेची ६
किती लीले ! तव वदन उदासीन
सांग बाळे ! कां दिसशि अशी दीन
बघावेंसें वाटतें जरी त्यास
तरी बघतां मन होतसे उदास ७
तोंच माझ्या लागलें कुणी काना
जन्मवार्ता कथि चित्तसमाधाना
बालविधवेनें टाकिली अनाथ
मिळाली ती बालिका कंटकांत ८
जणूं कळुनी ही जन्मकथा नीच
असे तेव्हांपासून ही अशीच
किती हंसवावी तरी हंसत नाहीं
दृष्टि भूभागीं यापरी सदाही ९

—गोविंदाग्रज

---

१५. प्रद्युम्नाख्यान

[शिवांनीं मदन जाळला, तो कृष्णाचा पुत्र म्हणून रुक्मिणीच्या पोटीं जन्मास आला. त्याच्या हातून असलेला आपला मृत्यु टाळण्याच्या उद्देशानें शंबरासुरनामक दैत्यानें त्यास जन्मतांच पळवून नेऊन समुद्रांत टाकिलें. पुढील कथा या उताऱ्यांत आहे.]

श्लोक

पूर्वीं रुद्र-ललाट-लोचन-शिखि-ज्वाला मुखीं जो जळे,
तो रुक्मिण्युदरासि ये रतिपती, हें शंबराला कळे;
कीं स्वप्राणहर स्मर प्रगटला, 'जों अप्रगल्भ स्वयें--
तों मारीन' म्हणे; 'उपेक्षित रिपू देतो अनलें भयें'. १

ऐसें चिंतुनि, कामरूप खळ तो पावे पळें द्वारका,
प्रासादांत शिरे, हरी हरिचिया मायाबळें दारका;
ने व्योमीं सहसा अनिर्देश शिशु प्राणक्षया दांडगा,
जैसा कीं मृगशावकास पळवी भक्षावया लांडगा. २
काम, श्रीहरिजात बाळ, वधवे कैसें सपत्ना करीं ?
टाकी झांकुनि नेत्र निर्दय बळें तें रत्न रत्नाकरीं;
तो मीनें नवनीत-पिंड-मृदुल प्रेक्षूनिया भक्षिला,
जाणों, रम्यकरंडकींच सुमणी रत्नाकरें रक्षिला ! ३
दुष्टें नेउनि पुत्रशोक दिधला श्रीरुक्मिणीच्या मना,
झाला खेद महोत्सवांत सहसा त्या द्वारकेच्या जना;
जो देतो बहुतांसि दुःख कुमती, स्वार्थार्थ तो नाडिला,
कामाद्युग्ररिपुत्रयेंचि नरका बांधोनिया पाडिला. ४
भक्षावा जलजंतुंनीं म्हणउनी टाकूनि तो अंबुधी—
मध्यें बाळक, शंबर स्वसदना निश्चित गेला कुधी.
जो निःशेष न जाहला जरि हर-क्रोधानळें जाळिला,
केला अंबुधिमग्न, दुर्मति म्हणे, 'मृत्यु स्वयें टाळिला !' ५
पसरुनी गुरुजालक धींवरीं; । धरियले बहु मीन नदीवरी;
यदुदरीं शिशु तो झष सांपडे, । विधिबळें व्यसनीं सहसा पडे.
दाशांहीं बहु-पीन मीन-निकरीं तो देखिला जो बरा,
भावें भेटविला तयाचि असुरा राष्ट्राधिपा शंबरा;
तेणें सूदकरीं दिला, मग तिहीं पाकस्थळीं कापिला,
पोटीं बाळ; करंडकांतुनि निघे जैसा मणि स्थापिला ! ७
होती तेथ पतिव्रता रति पतिप्राप्त्यर्थ रम्याकृती,
आच्छादूनि महानसीं करि तदादेशेंचि पाकाप्रती;
मानी पाचकमंडळी स्वगुरुता देऊनि सारी तिला,
कीं तो शंबर मानवे बहु तिच्या पाकाचिया रीतिला. ८

परम कोमळ रम्य शरीर ती—
झिजवि, दुर्जनदास्य करी रती;
प्रियपदींच सती धरि भाव, कीं
उचित मृत्यु तदर्थहि पावकीं ! ९
जैसें रूप, तसेंचि नाम दुसरें मायावती हें धरी,
शत्रूच्या सदनीं न पाक, तप ती पत्याप्तिसाठीं करी;
सूदांहीं शिशु पोषणार्थ दिधला प्रार्थूनि तीकारणें,
त्याचें रूप विलोकितांचि घडलें तल्लोचना पारणें. १०
मायावतीस शिशु अर्पिति सूपकार;
सांगोनि तत्त्व, करि नारद सूपकार;
होतां अकल्पितचि तो पति लाभ, जाया—
पोषी सुखासह तया पतिला भजाया. ११
रक्षी ज्यासि पतिव्रता प्रियतमा मायावती मायसी,
शंभूची अभयोक्तिही, मग तया चिंता असे कायसी ?
संसाराब्धि-निमग्न जे जन तयां ज्याचीं पदें पारदें,
योगीन्द्रें अवलोकिलेंहि करुणालीलालयें नारदें. १२
महामाया माया रतिपतिस दे, जी न उरवी—
अनेका मायांतें, निबिड तिमिरा ज्यापरि रवी;
गदाही दे, मायाशत-निपुण-शत्रु-प्रमथन—
क्रिया-सिध्युत्साहा उपजवि, करी युक्तिकथन. १३
उठे काम क्रोधेंकरुनि कलितोद्दामगद या—
रिपूतें माराया कलह करि, कैंची मग दया ?
सभेमध्यें होता असुरपति, त्याच्याचि जवळी—
बसे, बोले कार्ष्णि श्रवणकटु, दुष्टास खवळी. १४
स्वाधिक्षेप-विवृद्ध-मन्यु खळ तो दंडाहतव्याळसा,
धावे, शीघ्र गदा तदा धरि, न जीही सोत्सवीं साळसा;

कोपानें करि अस्त्रशस्त्र कपटें वेंचूनिया युद्ध तें,
तैसें जें हरिबाळकोन्मुख बळें येणें गजें उद्धतें. १५
काळ-व्याळ-विषाग्निचीच धरिली जाणों करीं जीभ, या-
माराया तरवारि वारिदनिभा देवाहि दे जी भया;
शत्रूचें सकिरीट-कुंडल, शिर च्छेदी क्षणें होय ज्या-
कांहीं न श्रम, कोमळेंहि खुडितां जैसें नखें तोयजा ! १६
जे होते उत्सवा त्या निरखित अमर व्यापुनी अंबरा, 'रे-
दुष्टा, जा दुर्गतीतें;' म्हणति, 'निजपुरा जा प्रभो, शंबरारे !
प्रद्युम्ना, तूं स्मर, स्त्री रति; बहु दिवसां युक्त झाला बरा हो,
हा योग स्वाक्षमूर्तोत्सवचि न घटिका यावरी लांब राहो.
गेले ते पुष्पवृष्टि, स्तुति करुनि मुखें शंबरान्तोत्सवासी—
पाहूनि प्रेक्षणीयाकृति रतिपतिला, स्त्रीसख स्वर्गवासी;
नेला मायावतीनें मग गगनपथें मन्मथ द्वारकेला.
विद्युन्मेघभ्रमेंचि क्षणभरि कुतकी तो सुहृद्वार केला ! १८
व्योमापासुनि जेधवां उतरला अंतःपुरीं देखिला—
दारांनीं प्रभुच्या, क्षण स्वहृदयीं तो श्रीहरी लेखिला !
शोभा, आकृति, वर्ण, वेष, सकळ, भ्रांतिप्रद; स्त्री-सती-
लज्जेनें लपती, प्रभु-प्रतिनिधित्वें तींच त्यां दीसती ! १९
पतिप्रतिनिधिप्रति प्रभुवर स्त्रिया पाहती,
तयाचि भंवत्या उभ्या परमकौतुकें राहती;
परस्पर असें तदा वदाति, कीं 'कसें यास ये-
मुकुंदनिजरूप, हें हरिस जाणवूं या, सये !' २०

—मोरोपंत

१६. महाराष्ट्रदेश

[कोटा नांवाच्या एका रजपूत संस्थानांतील वकील पेशव्यांकडे कांहीं बोलणें करण्याकरितां येत आहे; त्यास येतांना महाराष्ट्रप्रदेश कसा दिसत आहे याचें वर्णन तो आपल्या बरोबरच्या सरदाराजवळ करीत आहे.]

श्लोक

" बघ सख्या ! रमणीय सुदेश हा
दिसुन येइ अशा समयीं अहा
उगवुनी नुकता मिरवे रवी
महि-तला कनकें जणु सारवी ! १
इथुन तेथुन शेतमळे किती
उठुन भूमिस व्यापुन टाकिती
अजुन कार्तिक मास न संपला
म्हणुनि गारच देश दिसे भला २
दंव नसे सुकलें अजुनी जरी
प्रखर भास्करही न करां करी
जमिन हीच धनीण, इची करीं
कठिण शेतकरी करि चाकरी ३
बसुनिया छपरावरि गोफणी
धरुन हाकिति पाक्षि-गणां कुणी
झणझणां करिं गोफण जों फिरे
पळति दूरचि बापुडि पांखरें ४
कितिक पेटविती जन आगटी
जवळ बैसुन शीत निवारिती
हळुहळू पडतो हुरडा मुखीं
बसुन सांगति गोष्टि तिथे सुखीं ५
वय दहा वरुषें शिशु धाकुटे
चपळ धावति घेउन आउतें
कितिक येथ पतींस गुणी स्त्रिया !
मदत देति पहा तिकडे सख्या ! ६

हरभरा, गहुं, बाजरि, जोंधळा
पिकुनि गार इथे दिसतो मळा
जमिन देइल धान्य सुखें जर
कितिक खाइल मानव हा तर ७
कितिक जुंफुन मोट जन स्वतां
वृषभ सुंदर हाकिति तत्त्वतां
श्रम गमो वृषभां हलका सुखें
करिति गायन सुस्वर हें मुखें ८
पसरती निजपक्ष जशीं शिडें
उडति घारि नभीं दिसती पुढें
नजर कोसभरी दुर फेंकिती
त्वरित शोधुन भक्ष्यहि काढिती ९
धरुन वेष निळे हिरवे असे
उडति पक्षि तरूंवरुनी कसे
करिति नादित देश मधुस्वरें
सुख खरें जगिं भोगिति पांखरें १०
घरटियांत बसून पिलांसवें
दवडिती निशिला अति उत्सवें
उठति जों अरुणोदय जाहला
धरिति संतत उद्यम आपुला ११
गगन-राज्य अफाट तया रवी
उगवुनी नृपती बहु तोषवी
म्हणुन पक्षिच भाट सुखावले
करिति गायन ही स्तुतिं भासलें १२
पसरलें जरि दाट दिसे धुकें
किरण त्यांत परी शिरकूं शके

खुलति दोनहि एकच होउन
दिसति पारद आणखि दर्पण १३
दिसति अस्फुट त्यांतुन डोंगर
पसरलीं बहु दाट वनें वर
म्हणति सह्य जया गिरि हा असे
सकल पश्चिम व्यापुनिया बसे १४
कितिक जाति नभांत निमूळते
किति सपाट शिरीं गिरि देख ते
कितिक एकच रांग धरूनिया
असति, खिंड दिसे न कुठे तयां १५
गरुड तो शिवभूपति यावरी
रचुन दुर्ग पहा घरटीं करी
तिथुन घालुन झेंप दिनोदिन
लुटित देश करी रिपु-मर्दन १६
म्हणुन पुज्य समस्त मराठियां
असति डोंगर हे नमिती तयां
इथुन राज्य-नदी उगवूनिया
पसरली अरिला करि ती भया १७
शिव अचाट अशी करणी करी
स्वरिपु जिंकुन थोर यशा वरी
म्हणुन तत्स्मरणार्थ असे भले
विजयदर्शक खांबच रोंविले १८
भरभराट नवाच दिना दिना
सुखवि राज्य मराठि कसें जनां
अचल बैसुन पाहति हे असे
विगत-पक्ष-जटायु शरीरसे" १९

—वासुदेव वामनशास्त्री खरे

१७. सीतारामायण

[राम, लक्ष्मण व सीता अरण्यांतून परत आल्यावर चौघां भावांच्या बायका गोष्टी सांगत बसल्या व सीतेनें अरण्यांत गेल्यापासून परत येईपर्यंतची सर्व कथा त्यांना सांगितली. यामुळें या रामायणास 'सीता-रामायण' असें नांव कवीनें दिलें आहे.]

श्रीजनकसुता-सीता-प्रभृति सुखें भेटल्या स्वसा, जावा,
तत्संवाद वदावा, सज्जन पावुनि महत्त्व साजावा. १

भरताची मांडवी स्त्री, लक्ष्मणाचीहि ऊर्मिळा,
श्रुतकीर्ति रिपुघ्नाची, जगीं यद्रीति दुर्मिळा. २

पडुनि गळां गहिंवरल्या, सीतेच्या कन्यका तशा गमल्या;
श्रमल्या विरहें, श्रीनें भेटुनि कुरवाळितां करें शमल्या. ३

म्हणति 'सुदिन भाग्यें आजि हें प्राप्त झालें,
अमृत परमरुग्णा वांचवायासि आलें,
सुभगिनि, चवदा कीं कल्पसे अब्द गेले,
स्व-सम, सखि, निजेनें निष्ठुर स्वप्न केले'. ४

आलिंगुनि कुरवाळुनि, हुंगुनि शिर, पुसुनि लोचनें पदरें,
श्री सांगे निजवृत्त, श्रवणीं ज्याच्या उरीं नयेचि दरें. ५

भावोजी चित्रकूटीं परतुनि नगरा न्यावया शीघ्र आले,
माझे डोळे तुम्हांतें निरखुनि बहु हे तेधवां तृप्त झाले;
स्वामींच्या पादुकांतें वरुनि परतले बोध मानूनि मागें,
विप्रांच्या मानिलें हो परम सुख अविघ्नत्व पावोनि यागें ६

देउनि अभय मुनींतें, आशीर्वाद-प्रसाद जोडून,
अत्र्याश्रमासि गेले स्वामी तो चित्रकूट सोडून. ७

जैसे वसिष्ठ, गाधिज, जेविं भरद्वाज गुरु, तसे अत्री—
नमिले शमिलेखर्षभ, जे सुधवळ मानसीं जसे पत्री. ८

जेविं भरद्वाज, तसे द्रवले पाहोनि तेहि मामाजी;
झाले अतितर सुखकर, कर जैसे भानुचे हिमामाजीं. ९

तद्भार्या अनसूया मजवरि करि सासु-मायसी माया,
स्वकरेंचि अळंकारी, आहे प्रेमासि काय सीमा या? १०
वेणी घालुनि, लोचनीं निजकरें ती लेववी कज्जळ,
लावी चंदन सव्रता, मज गमे गंगाचि तें तज्जळ;
गुंफी सत्कुसुमें शिरीं सुरुचिरा माळा गळां अर्पुनी,
प्रेमें धर्म कथी सुधाधिक-रसें सूक्तें मला तर्पुनी. ११
तैसाचि मल्ललाटीं साध्वी सिंदूर-तिलक जो लावी,
तोहि अगत-प्रौर सदा, कैसी तत्सुकृत-सिद्धि बोलावी? १२

तो अंगराज चिरकाल तसाचि ओला,
यत्सौरभीं भ्रमरपंक्ति सदैव लोला;
घ्राणेक्षणांसि म्हणती कुसुमेंहि डोला,
वेणी नवीच, न सती-यश शक्य बोला! १३

उष्णा उटी हिमीं ती, उष्णींही सर्वकाळ परम हिमा;
वृष्टि न मदतिक्रम करि, माध्वीचा न वदवेचि पर महिमा!

वत्से मांडवि, मद्विवाह-चरित प्रेमें पुसे ती सती,
सांगावी मज लागली निजमुखें सर्वा कथा तीस ती;
आशीर्वाद बहु प्रसन्न हृदया दे, मायसी लोभवी,
त्या आर्येसि, तसेंचि हीसहि महावात्सल्य हें शोभवी!

मग तेथुनि, ऊर्मिळे, निघाले। प्रभु, जों दंडक-काननीं रिघाले,
धरि राक्षस तो शरीर हातें, । न च हें, हे नसतां शरीं, रहातें.
स्वामिंनीं वधुनि तापसारिला, त्या क्षणें सकळ ताप सारिला,
हा विराध सुरमान्य तारिला तुंबरु, प्रबळ-शाप वारिला.
लोपामुद्रापति, श्रीघटजमुनि, जिहीं प्राशिला सिंधु, अन्या—
सांगावी ख्याति काय, त्रिभुवन-महिता; सत्तपःसिद्धि-जन्या
प्रेमें मानूनि पुत्रापरि रघुवर हे मानिली होहि कन्या,
दिव्यें अस्त्रें दिलीं हो,म्हणुनि,'वरि जयश्री,दुजी कीर्ति, धन्या.'

त्यावरि मामाजींचे गृध्रेंद्र सखे, जटायु या नांवें,
स्नेहाब्धि भेटले हो, त्यांचें साधुत्व काय वानावें ? १९
विनयें करितांचि वंदनातें, । द्रवले भेटुनि, जेविं नंदनातें;
प्रभु मानिति गेह काननातें, । निववि तें बहु देह कां न नातें ?
आम्हां ते वदले, " स्व-तात-सदना आलां सुखें या वनीं,
वर्ता पंचवटिस्थळीं मुनिनुतीं गोदा-तटीं पावनीं." २१
मत्स्वामी विनयें असें विनविती, " बा, हे स्नुषा आपली,
रक्षावी समयीं, निवो मति इची स्वादर्शनें तापली !"
निववी मज मातासी श्रीमत्त्र्यंबकजटोद्भवा गंगा,
स्मरणें, स्तवनें, स्नानें शुचि करिती विश्वचित्तवागंगा. २२
सांगे भूमिसुता, दशास्य-भगिनी मांसाशनें मातली,
नामें शूर्पणखा, कुबुद्धि, विधवा, नक्तंचरी पातली;
माया-रूपवती प्रभूंसि भुलली, मोहीं स्मरें घातली,
ती त्यांच्याहि गळां पडे मति तुझी ज्यांच्या पदीं रातली २३
'मला आहे स्त्री, हो मदनुजनि-सौमित्र-दयिता,
वधू तूं योग्या त्या, सुमुखि, गुणरूपातिशयिता'.
असें स्वामी तीतें कथिति; हित ती मानुनि भजा—
म्हणे मातें त्यातें, तिस म्हणति ते भानु-निभ 'जा'. २४
त्या आर्यांच्या पदांचा, सुदति, सतत मी दास; तूं कायदासी
होशी ? मत्स्वामिनी हो, सुमुखि, भज तया मानदा कायदासी;'
ऐसें जें ऊर्मिळे त्वत्प्रियतम वदला, ये पुन्हा तन्मनातें.
लावूं पाहे प्रभूशीं, समुचित नसतां सद्यशा, जन्मनातें. २५
प्रभूंतें म्हणे, 'हें पहा आंग, लीला—
वती मी, वरावें मला चांगलीला.'
स्तवी, दाखवी ती, सये, आस्य, काय,
स्वयें तें पहातां न ये हास्य काय ? २६

कृत्यासी क्रुद्धा ती माझ्या मंदेंहि केलि गे, हास्यें,
प्रभु देखतांहि धावे मज खाया भीतिकेलिगेहास्यें. २७
भ्यालें मी, स्वामींनीं 'हूं' म्हणतां क्रोधमद तिचा मथिला—
लक्ष्मण-भावोजींनीं, केला तो दंड, योग्य जो अशिला.२८

कथूं दुर्दशा ती तिची काय गे! हा—
वदे स्वापराधें कुधी जाय गेहा;
खरा बंधुला अन्यथा आरडोनि,
स्वयें ताप सांगे, करी आ रडोनी. २९

जनस्थान-वासी खर, क्रूरकर्मा,
न पाहे नया, जो विचारी न शर्मा,
स्व-सैन्यासि आज्ञा कुधी दे वधाया,
प्रभू सिद्ध झाले यशें देव धाया. ३०

प्रेमें लक्ष्मणजींसि सांगति रणारंभींच मद्रक्षण,
स्वामी लाविति न द्विपद्दळवधें व्हायासि भद्र क्षण;
हे तार्क्ष्य प्रभु, ते चतुर्दशसहस्र क्रव्यभोक्ते अही;
बाई, देखिलि दूरुनीहि रुधिरें धाली, निवाली, मही! ३१

माया-सुवर्ण-मृग राक्षस त्या खळानें—
जो धाडिला, परमरम्य, विश्रृंखळानें,
तो वाटला निरखितां मजला धरावा,
न्यावा पुरा, स्वजन सर्व सुखी करावा. ३२

देऊनि चाप भाते, वदल्यें, 'लांबेल मृग, धरा, जाच!'
ठेवुनि लक्ष्मणजींतें गेले; स्त्रीचा नव्हे बरा जाच! ३३

पळे मृग, कळे छळ; प्रभु तया शरें ताडिती,
हरूनि असु, काननीं असिस, बाइ हो पाडती;
तशांत खळ हाक दे प्रभुवर-स्वरासारखी,
खरेंचि म्हणती श्रुती मनाहि, जें बरें पारखी. ३४

'हा सीते, हा लक्ष्मणा !' या परीची,
दीना वाणी ऐकिली म्यां अरीची;
बाई हो, ती मद्विचारासि मोडी,
धैर्या सोडी, शोक चित्तांत जोडी. ३५
वदल्यें मी, 'लक्ष्मणजी, स्वाम्यसुसंरक्षणार्थ धावा हो—
धावा हो ! विपदोघीं म्हणतां सर्वस्व, भव्य कां वाहो?' ३६
तों भावोजी वदले, 'आर्ये, हें स्पष्ट राक्षसच्छद्म,
पद्मच्छदाक्ष आहे विजय-श्री-नित्य-केलीचें सद्म'. ३७
गमलें लक्ष्मणजींचें वच कटु, मधुरहि, असत्य, सत्यहि तें;
त्यांतें वदल्यें वचनें हृदय विदारावयासि अत्यहितें. ३८
गेले लक्ष्मणजी त्यजूनि उटजा जों, तोंचि ओका यती—
तैसा ये दशकंठ, दाखवि तनू जी उग्र ती काय ती—
सांगावी भयदा. तरी न वदल्यें पावोनि मी कंप, हा !
मंदावो, परि तेज सोडिल निजज्वाला हिमीं कां पहा ?; ३९
लंघुनि बहु-नग-गहनें, जलनिधि, सोडूनि मरणशंकेला,
लंकेला खळ गेला वेगें घेउनि मला विपंकेला. ४०
स्वामींचा मज न कळे माझा स्वामींसही समाचार,
सोसित होत्यें सत्त्वें अहितांचे मी महीसमा चार. ४१
सुज्ञाना सरमा, बिभीषण-वधू, विद्यांचि माना; कळा—
तत्कन्या त्रिजटाहि, रंजवि, जशी गानाभिधाना कळा;
चिंतीं लक्ष्मणजींसमेत सतत स्वामींस मी चातकी—
जैसी जीवनदासि, बाइ, तिळही तो न द्रवे पातकी. ४२
मामाजींचे शतमख सखे धाडिती अन्नपात्र,
स्वामींतें मी स्मरत कवळीं तत्प्रिया ग्रासमात्र;
केलें देहावन मुनि-सती-निर्मितें अंगरागें,

हा वातभू कुशलवृत्त समग्र सांगे,
दे हर्ष, जेविं, जवळ स्वकुमार रांगे!
जे मन्मनोरथ महाधिगदार्त, पांगे,
झाले समर्थ, अमृतें नुठतील कां गे? ४४
मज चवथे भावोजी सुगळ मिळाले वनीं, असें कळलें;
टळलें व्यसन, उजळलें यश, मद्धरणेंकरूनि जें मळलें. ४५
मिळालीं उत्साहें बहु कपि-बळें, ऋक्ष-कटकें-
कळे; वाटे केली मजवरि दया विश्व-घटकें;
खुणेला म्यां चूडामणि निज दिला, 'जा न अटकें'—
म्हणे या; हा भासे जनकाचि, वदावें न लटिकें! ४६
जोडी हात मला, निघे पवनभू, खोडी करी हा बळें,
मोडी वृक्ष सुरम्य जे उपवनीं, झोडी अरींचीं बळें;
तोडी मस्तक-लक्ष राक्षस-रणीं, सोडी न एकासही,
थोडी यातुचमू उरे, बहु असुगोडी सुखें घे मही! ४७
माराया कपिला दशास्य असितें घे घोरकर्मा, सये,
प्रार्थी साधु बिभीषण, 'क्षितिपते, हा दूत मारूं नये';
वैरी पेटवि पुच्छ बाइ, सरमा सांगे तदा अंजली—
केला म्यां ज्वलनासि, कीं, महित जें तद्धी स्तवीं रंजली.
ज्या मत्ता राक्षसांच्या पद
अतिकुतुकें होय हास्या सभा जी,
तीतें, त्यांच्या तयांचा मळ—
मति पतिच्या त्याहि आस्यांस भाजी;
तेजें सर्वांसि घोळी; करि कनक—
पुरी हा कृती वत्स होळी;
याच्या पुच्छा न पोळी दहन,
खळ सये 'हा' म्हणे, हात चोळी. ४९

'रक्षू मला करुनिया अरि-हानि रोप',
स्वामीस सिद्ध सखि हो, करि हा निरोप;
आले महाकपि-चमूसह सागरातें,
प्याया परायु, शिवसे सहसा गरातें. ५०
स्वामींनीं श्रितशर्मद धर्म, दया करुनि, सनय आठविला,
त्या ताराबाईचा सुत, अंगद, पूत दूत पाठविला. ५१
धर्मज्ञ, नयज्ञ, कुशळ, ऐसा लोकांत बोलका नाहीं,
परि त्या अरिनें याचा एकहि वरिला न बोल कानांहीं. ५२
वदला, 'घेउनि देवी प्रभुच्या चरणांसि चाल वंदाया,
मंदा, याद जलधिशीं विटतां वांचविल कोण धंदा या!' ५३
कोपें दुष्ट म्हणे, 'धराचि!' चवघे बाहुद्वया झोंबले,
तों हा अंगद-वत्स जाय गगनीं; क्रव्याद ते लोंबले;
वेगें जाउनि, दूर भव्य भुज या शूर-स्तुतें झाडिले,
झाले पंक धरातळीं सकळही, तत्काळ जे पाडिले. ५४
ज्या वृत्रारि चमू-समूह समरीं दे पाठ वीरा वण—
स्वांगीं जो पविचे प्रहस्त मिरवी, त्या पाठवी रावण,
सेनानी प्रथमाहवींच खपला; घेऊनि सैन्यास हा–
बोले 'पावुनि भंग, हीन कटका देऊनि दैन्या, सहा'. ५५
त्याचा दारुण इंद्रजित्सुत, सये, युद्धांत मायाबळें–
कीशांचीं अतिशोक पावुनि पळें सारीं शमाया बळें,
विस्तारूनि भुजंग-पाश समरीं स्वामींस बांधी, सये,
स्वोत्कर्षें मग उद्धतत्व अरिच्या तेंव्हां न कां धीस ये? ५६
केले लक्ष्मणजीहि बद्ध अहिंनीं, मर्मस्थळीं चाविले,
दोघांनींहि सुनेत्रपद्म, मुलि हो, मूर्च्छाभरें लाविले;
दासींनीं मज पुष्पकीं बसवुनी त्रासावया दाविले,
शोकें मी रडल्यें बहु, व्यसुचि मत्स्वांतें, सये, भाविले. ५७

मत्संगतिशी त्रिजटा नाशी बोधेंकरूनि मन्मोहा,
वदलि, 'महाभागे, या मायेनें त्वन्मुखीं न जन्मो हा!' ५८
मातें घेऊनि गेल्या फिरुनि उपवनीं राक्षसी नागपाशा—
संपूर्णो यत्प्रसादेंकरुनि; परिहरी तत्सखा नाग-पाशा;
दोघांचे देह केले स्वकर फिरवुनी स्वस्थ, तत्काळ जाला-
सर्वां साधूंसि मोठा मह, दशमुख जो, ताप तत्काळजाला;
तेव्हां तो कुंभकर्णा उठवि अहित, कीं यत्न कांहीं न चाले,
गत्स्वामी सानुजन्मे कटकसह पुन्हा संगरा सिद्ध झाले;
भ्याले उग्रा पहातां कपि सकळ, सये, काळसा वाटला गे!
प्राण-त्राणा धरावी त्यजुनि रण तयां सेतुची वाट लागे! ६०
कळेच्या तातानें निपुण कथिलें हें बुजवणें,
फिरावें त्यांहीं, ज्यां स्वजनु पति-कार्यें उजवणें;
धरी सुग्रीवातें, पळवुनि भयें सर्व, परते;
सये बाई, तेव्हां सकळ धरिती गर्व पर ते. ६१
मूर्च्छा जातां हरिती तन्नासा-श्रुति सुकंठभावोजी,
ती त्यांसाहि दे समर्थीं, प्रेमें श्रीनरहरीस भा वो जी. ६२
खिजोनि परते अरी, गिळि न चावितांही हरी,
कितेक पळती परी वरुनि कर्ण नासा दरी;
अनर्थ बहु तो करी नळ-वनांत जैसा करी,
गति प्रभु बरोबरी करि तयासि दे ती बरी. ६३
इंद्रजित् पुत्र तद्बुद्धि भेदी, रहा—
स्वस्थ ऐसें वदे, मूढ दे धीर हा;
श्मश्रु हातें पिळी, वीर सारे खिळी,
मोह सेना गिळी खंडि खड्गा त्रिळी. ६४
स्वामी, लक्ष्मणजी, सुकंठ अवघे शस्त्रव्रजें ताडिले,
शल्यार्त क्षणदाचरेश्वर-सुतें निःप्राणसे पाडिले;

होता सावध वत्स मारुति सुधी, कीं हा कळातात, मी—
सांगों नेम कसे धरूनि फिरले हस्ती अलाता तमीं. ६५
मामाजींसम वृद्ध, मान्य सकळां ऋक्षेंद्र हे. औषधी—
आणाया पवनात्मजासि कथिती, पावावया तोष धी;
कैलासाजवळील शृंग गिरिचें वत्से पळें आणिलें,
केलें सर्व विशल्य, निर्व्रण बळ प्रेमाश्रुंनीं न्हाणिलें. ६६
तो अरि लक्ष्मणजींनीं साधु बिभीषण मतें रणीं वधिला.
सखि, काढिला शर-करें हरिच्या कांटाचि काळजामधिला.
मारावे अरि सर्व आपण रणीं, किंवा मरावें असा—
चित्तामाजि करूनि निश्चय निघे तो दुष्ट, कांपे रसा;
क्रुद्ध व्याघ्रचि रावण क्षण रणीं, कीशौघ भासे ससा,
पाडी लक्ष्मणजींस शक्ति अरिची जी स्पष्ट काळस्वसा. ६८
हा साधुवत्स आणी ओषधि शृंगासमेत पुनरपि त्या,
विनवी स्वयशें प्रभुसह, सज्जन-निकरासि, जेविं सुनर पित्या.
युद्धीं भूमिवरि प्रभूंसि सुरथीं दिक्पधरा पाहिलें.
शुक्राच्या सखि हो, न तें अनुचित स्वांतें तदा साहिलें;
प्रेमें मातलिनें शतक्रतु-रथीं प्रार्थूनिया वाहिलें.
तेव्हां राक्षस-सैन्य-रक्त विपुल क्षोणीतळीं वाहिलें. ७०
होय द्वैरथ-युद्ध, रावण-शर स्वामींसही लागले.
स्वामींचे शर दिङ्मुखांसहि, न हे दोघे, सये, भागले;
सप्ताहर्निश निर्निमेष अतुळीं त्या अध्वरीं जागले.
तेव्हां वात न, बाण-रुद्ध-गगनीं सूर्यांशुही, वागले. ७१
खंडिलीं शत शिरें पर तो न। प्रेत होय, उठलीं परतोन;
म्लानिलेशहि शिवेनच काया। लाविनाच हृदया वचकाया.
कुंभज मामाजींनीं केला मंत्रोपदेश समरांत,
उर भेदुनि अरि वधितां 'जय ! जय !' हा शब्द होय अमरांत !

झाली प्रभूत्तम-शिरीं वर-पुष्प-वृष्टी,
स्वर्वाद्यनाद भरि तत्क्षणिं सर्व सृष्टी;
देवांगना करिति हर्षित-बुद्धि नृत्यें,
गंधर्व गाति मधुरस्वर पुण्यकृत्यें ! ७४
स्वामींनीं पाठविला मारुति मच्चित्तताप पळवाया,
कळवाया प्रिय, बाई, कीं करि देहा वियोग पळवा या. ७५
निरोप म्यां पाठविला, 'दावा चरण-सारसें,
वियोग-तापें गमलें मना मरण सारसें !' ७६
आज्ञा होय बिभीषण आले घेऊनि भव्य शिबिकेला,
नेउनि दाखविले ते, यत्स्मरणें प्राप्तभव्य शिबि केला. ७७
स्वामी सर्वज्ञाचि, परि जपती निंदक यशा विटाळाया,
म्यां दिव्य म्हणुनि केलें प्राकृत जनसें, यशा पिटाळाया.
होत्यें मी अग्नि-कुंडीं प्रमुदित-हृदया, जेविं पाटीर पंकीं,
स्वामींच्या मूर्तिधारी दहन मज सये, स्थापिता होय अंकीं;
राहे नाथप्रसादें असुख न, निधिनें जेविं रंकत्व रंकीं,
तेव्हां माझ्या न मावे मदभर सखि हो मानसीं त्यक्तशंकीं !
तों मामाजी विमानीं बसुनि तरणिसे शक्रसे पातले ख—
व्यापूनि स्वप्रकाशें स्तविति बहु तयां जोडिती हात लेख;
त्यांहीं स्वाराज्य आम्हां निपट गमविलें वंदितां पाय सानें,
कीं द्यावें प्राशितां जें सुख अमृतरसें काय तें पायसानें ?
मातें ते वदले, " तुवां उपवनें, तैसींच वत्से वनें,
केलीं पूत; पतिव्रताव्रत सती-सर्वस्व, तत्सेवनें—
भर्ता तारुनि संकटीं कविसभाश्रीसंपदे, वारिला—
विश्वोपद्रव, जाहला तव तरीं या कंप देवारिला. ८१
त्वां सूर्यवंश सुयशें सति धन्य केला,
वैदेह धन्य तुज पावुनि कन्यकेला."

प्रेमें असा मज दिला बहु मान लज्जा—
सांगें मदीय नयनांसि पदींच मज्जा. ८२
विमानीं बैसले स्वामी मज सादर बाहिलें,
वाहिलें बाई अंकीं हें प्रेम कोठें न पाहिलें! ८३
कांहीं स्वामी कांहीं लक्ष्मणजी सांगती कथा सारा;
साराया क्षिप्र पथ स्वामींचा विरहतापही सारा. ८४
तीर्थक्षेत्रतपोवनें मुनिजन प्रेमार्द्रधी पाहुनी,
स्वामी या विषया, पुरा, विसरते पुण्याश्रमीं राहुनी;
स्वप्नीं न त्यजिते विरक्ति; नसती चित्तें सखी हो ढिले,
आले गाय तसेचि वत्स भरत-स्नेहेंचि हे ओढिले. ८५
भक्त-प्रेम-वश प्रभु प्रिय नसे यांला दुजें काय ती—
जातीनें शबरी बरी गति जिला भव्या दिली आयती;
बाई हो गुह हा सखा भरतसा जो गृध्र तो तातसा,
यांना प्राप्त असे दयालु नसतां सत्कार हो तो तसा. ८६
मागें शत्रुघ्न, आले कवि भरत महाभाग मेघांसमोर;
प्रेमें जें प्रेक्षिति क्षुद्विकळ कवळिती हा गमे घांस मोर;
श्रीकंठीं बाष्प दाटे, न विजय मिळतांही असा हर्ष वाटे,
जाणों, ग्रीष्मीं तृषार्ता विपुलतर मिळे तें सुधावर्ष वाटे! ८७
श्रीसीता भगिनींतें अर्पी, सांगोनि अशि कथा, रतितें;
प्रभुचें पुण्ययशोमृत ईत सकल, ज्यांत रसिक थारति, तें. ८८

—मोरोपंत

१८. सृष्टीची आरती

[मूळ बंगालीमधून डॉ० भांडारकर यांनीं रूपांतर करून घेतलेली आहे. ही "प्रार्थनासंगीतांत" आहे. सर्व सृष्टि परमेश्वराची आरती करीत आहे असें कल्पून सृष्टींतील विविध गोष्टी या ह्या आरतीचें साहित्य आहेत, असें कवि मानीत आहे. हें रूपक रमणीय आहे.]

(राग— अल्हैया, ताल–आडताल.)

तुझी आरती करी सकल भूवन ।
देखुनि निर्वृत होती नयन ॥ ध्रु० ॥
विशाळ पात्र हें गगन । त्यांत दीप अनुक्षण,
शोभती शशी-तपन । हे हृदय-रंजन;
मुक्तामाला जैशा काय । तारका-समुदाय,
किती नभा शोभा होय । हे भवभयभंजन ॥ १
धूप मलयपवन । निरंतर समीरण,
करी चामरवीजन । हे विश्व-कारण;
सर्व वनें उपवनें । अर्पिती सदा सुमनें,
वाजे भेरी उच्चस्वनें । ऐकती भाविक जे जन २
तुझी आरती करी० ॥

—भांडारकर



स्पष्टीकरण व टीपा

भाग पहिला

१—१. हेर—याचा नेहमींचा अर्थ गुप्तपणें धाडलेला दूत असा आहे. पण येथें नुस्ता दूत. रुचिरीं द्वारीं—मराठींत आकारान्त विशेषणांशिवाय बाकीच्यांना लिंगादि भेद नाहीं. पण कवितेंत पुष्कळदां सर्व प्रकारचीं विशेषणें विशेष्याच्या लिंगादिकांप्रमाणें फिरतात. ४. नयनगति इ०—पूर्वी ईश्वरासंबंधीं अज्ञान हा पडदा डोळ्यांवर होता, पण आतां तो निघून जाऊन समजण्यास अशक्य असें कांहीं राहात नाहीं.

२—४. स्वैर-गती—स्वच्छंद-वृत्ती. ५. भर्तृहरि या नांवाचा एक राजा होऊन गेला. हा मोठा विद्वान् व कविही होता. याचें नीतिशतक व वैराग्यशतक हे संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ७—८. यांत पंचमहाभूतें मनुष्यानें आपलीं दास केलीं असें सांगितलें आहे, हें स्पष्टच आहे. वाफेचें यंत्र वगैरे अग्नि, पाणी इत्यादिकांचे साह्यानें चालतात. १०. ही कविता लिहिली, त्या वेळेपेक्षां सांप्रत मनुष्य विजेपासून फारच जास्त कामें करून घेतो हें सर्वांस माहीत आहेच. ११. रवि चित्रकार केला—रविकिरणांचे योगानें पदार्थांचें हुबेहूब चित्र (Photograph) काढतात हें प्रसिद्धच आहे. सुस्वरें गानें वायु तुष्ट करि-एक तंतुवाद्य आहे. तें वाऱ्यावर ठेविल्यानें वाजतें. १७. कल्पतरु—स्वर्गलोकांचा वृक्ष, हा इच्छित पदार्थ देतो. २०. परि तें फळ, इ०—कवीचा भावार्थ असा कीं, व्यास, वाल्मीकि यांनीं जर भारतरामायणादि ग्रंथ लिहिले नसते, तर रामयुधिष्ठिरादि राजांचें यश पृथ्वीवर पसरलें नसतें.

३—१. पवित्रसृष्टी—पवित्र रीतीनें किंवा स्वच्छ रीतीनें. संस्कृत शब्द हेंच कोणी सुवर्णताट, कर्मधारय स० २. महाराष्ट्रभाषा-रंभापर्ण=महाराष्ट्रभाषारूपरंभापर्ण [केळीचें पान]; कर्म० समास. सेविजे, अर्पिजे इत्यादि हीं जुनीं कर्मणी रूपें आहेत [पाहा बाल० व्याक० पु० २, क० १११.] ७. म्हणे—मी—कवि.

४—२. वीचार—येथें 'वी' असें दीर्घ लिहिलें आहे. कवि कवितेंत ऱ्हस्व-दीर्घ इत्यादींत फेरफार करितात. ३ ऱ्या कवितेंत 'वीषयाचा' येथें तसेंच आहे. ४. मत्सरू, दंभभारू–जुन्या मराठींत 'ऊ' व 'ओ' हे प्रथमेचे प्रत्यय होते. (पाहा, बाल० व्या० पु० २ क० २००) ६. होचि क्रीया इ०—ती, जी, ही, हीं सर्वनामें कवितेंत ते, जे, हे अशीं पुष्कळ वेळा येतात. ८. पुरे ना जनीं लोभ, इ०—जगांतल्या इच्छा तृप्त होत नाहींत म्हणून मन क्षुब्ध होतें, व यामुळें जीव सृष्टीमध्यें पुनः जन्मास येतो. तृष्णा म्हणजे जगिक इच्छा हें पुनर्जन्माचें कारण मानिलें आहे. १३. सगूणीं–साकार ईश्वरास. आपले साधु दोन प्रकारची भक्ति सांगतात; एक निराकार परमेश्वराची; ही, मोठे ज्ञानी आहेत त्यांनाच साधते. दुसरी साकार परमेश्वराची; म्हणजे शिव, विष्णु, गणपति अशा देवांच्या मूर्ति करून, ही अज्ञान लोकांकरितां. १४. जनीं बोलण्यासारखें, इ०—याचे दोन अर्थ होतील; एक जनीं म्ह० लोकांनीं तुझ्याबद्दल बोलावें म्हणजे स्तुति करावी असा वाग; दुसरा, जसा बोलतोस तसा जनीं म्ह० लोकांत वाग, म्हणजे बोलांत व कृतींत साम्य असूं दे. १९. द्वैत–द्वेषभाव किंवा दुजाभाव; अथवा वेदान्तमताप्रमाणें ईश्वर व जीव यांचा भिन्नभाव.

५—१. ईषत्प्रफुल्ल–किंचित् फुललेलें. मृदुस्मित–थोडें गालांतल्या गालांत हसणारें. बहु० स०. उत्फुल्ल करावें–मनःकुसुम प्रफुल्लित करावें. ५. सुवाचे–सुवाचेनें (सामान्यरूपी तृतीया) ८. करगत–स्वाधीन.

६—हा उतारा सीतास्वयंवरांतील आहे. यज्ञरक्षणार्थ राम व लक्ष्मण विश्वामित्राबरोबर गेले. त्यांनीं तें कार्य साधल्यावर विश्वामित्र त्यांस घेऊन जनकाचे घरीं स्वयंवराची मौज पाहण्याकरितां व शिवधनुष्य म्हणून जें प्रसिद्ध होतें तें रामास दाखविण्याकरितां घेऊन आला. या उताऱ्यांतील नृप म्हणजे जनकराजा व मुनिराज म्हणजे विश्वामित्र. १. भवतापविमोचन–भवतापाचा विमोचन, सोडविणारा राम. षष्ठी तत्पु० २. स्वानंद-संभ्रम–स्व म्ह० अंतःकरण याचा आनंद, व संभ्रम म्ह० आश्चर्य यांचा

भर. ३. धर्में करूं रक्षणीं–धर्मानें प्रजेचें रक्षण करण्यामध्यें. कृपा-ईक्षणीं—कृपेनें पाहाणें, हा समास संस्कृताचे रीतीनें केला आहे, पण मध्यें संधि केला नाहीं. ४. या श्लोकांतील ताटिका राक्षसी व मारीच व सुबाहु राक्षस यांच्या कथा लोक-प्रसिद्धच आहेत. हे राक्षस यज्ञाचा विध्वंस करीत म्हणून यांना रामानें शिक्षा केली. याच मारीच राक्षसानें पुढें राम बनांत असतां सुवर्णहरिणाचें रूप घेऊन रामास फसविलें व रावणास सीतेला चोरून नेण्यास संधि दिली. ५. चाप–शिव-धनुष्य, याची कथा अशी आहे, कीं हें धनुष्य परशुरामानें जनकाचे घरीं ठेविलें होतें. एक वेळ तें सहज घरांत पडलें असतां जवळ सीता बाळपणीं खेळत होती, तिनें त्याचा घोडा केला. हें पाहून जनकानें पण केला होता कीं, जो हें धनुष्य उचलून सज्ज करील, त्यालाच सीता द्यावी. अहिल्या शिला मुक्त केली, इ०—अहिल्या ही गौतम-ऋषींची स्त्री. ही फार सुंदर व पतिव्रता होती. तिच्या बापानें लग्नसमयीं पण लाविला होता, कीं जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा करून येईल, त्यास ती द्यावी. इंद्र या पणाप्रमाणें पृथ्वीप्रदक्षिणेस निघाला. पण गौतम ऋषीनें एक धेनु प्रसूत होत असतां तिला प्रदक्षिणा घातली, तेव्हां शास्त्राप्रमाणें ती पृथ्वीप्रदक्षिणा होऊन इंद्र परत येण्यापूर्वीं गौतमाचें अहिल्येशीं लग्नही झालें; परंतु ह्या गोष्टीमुळें इंद्रास फार वाईट वाटलें. त्यानें कोणत्या तरी उपायानें अहिल्येचें पातिव्रत्य भंगण्याचा निश्चय केला. एक वेळ ऋषि घरीं नाहीं असें पाहून इंद्र त्याच्यारूपानें आला, व त्यानें बिचाऱ्या अहिल्येस फसविलें. गौतम घरीं येतांच इंद्र मार्जाररूपानें पळत होता, त्याचेवर ऋषीनें झारीनें पाणी ओतलें, यामुळें त्याच्या शरिरास सहस्र छिद्रें पडलीं; व अहिल्येस त्यानें शापानें शिळा बनविलें. पुढें रामाच्या पादस्पर्शानें ती पुन्हा पूर्ववत् झाली. अशी कथा आहे. ७. विखीशशिमुखी–पूर्ण चंद्रासारखें जिचें मुख आहे अशी. मानीचना आन–नृपाकृति म्हणजे रामाची राजपुत्रास योग्य अशी आकृति याशिवाय दुसरें मानीचना. कौतुकीं–कौतुकानें; किंवा 'कौतुकी' असें रामाचें विशेषण, अर्थ, कौतुक वाटण्यासारखा;

तुकी माथा मनीं-मनचे मनांत मान हालवी, म्हणजे संतोष मानी.

७-२. अश्वमेध हा एक यज्ञ आहे. यांत हवनासाठीं घोडा मारितात. तो घोडा श्यामकर्ण म्हणजे सर्व अंग पांढरें व कान काळे असा असावा. हा घोडा प्रथम सर्व पृथ्वीवर हिंडण्यासाठीं सोडतात. त्याला जो शरण येऊन करभार देणार नाहीं, त्याला युद्धांत जिंकावयाचें. अशा रीतीनें एक वर्ष दिग्विजय करून मग यज्ञ करावयाचा. असे शंभर यज्ञ केल्यानें इंद्रपद मिळतें, अशी समजूत होती. मेरुसर्षपदृष्टान्तें—मेरूला जशी सर्षप म्ह० मोहरी त्याप्रमाणें. ३. सांग ज्ञान—वेदांचीं अंगें म्हणून कांहीं प्रकरणें आहेत. त्यांच्यासहित वेदांचें ज्ञान. ६. नाम-नांवदेखील. कल्पांत—कल्प+अंत, कल्प म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस, तो भरला म्हणजे सर्व सृष्टीचा लय होतो. ८. नातळे-न आतळे-स्पर्श करवत नाहीं.

८-२. इंद्रचाप इ०—इंद्रधनुष्यासारखे पण त्याहून उत्तम रंग आहेत म्हणून लाजे. ७. जवळाहि असतां मानस—हंस मानससरोवरावर न जातां येथेंच राहतात. ९. विजेसहित—वीज ही मेघाची स्त्री असें कवि समजतात. ११ चंचल-पल्लव--चंचल—हालणारे आहेत पल्लव ज्याचे बहु० समास.

९-३. अरिमित्रांची विचारणा करावी, म्हणजे शत्रु कोण, मित्र कोण हें नीट पाहावें. ६. उपाधीस कंटाळला-ज्याचें मन संसारानें त्रासलेलें आहे असा. विचार-ईश्वराचे विचार. ८.कार्य-कर्ते-फार हुशार लोक. यांना नेहमीं दूरची कामगिरी सांगावी, असा अर्थ. ९. धकेचपेटे सोसून-जगाच्या सुखदुःखांचा चांगला अनुभव घेऊन. १२. जी गोष्ट खुणेनें सांगावयाची ती बोलूं नये, जी लिहावयाची ती तोंडानें सांगूं नये.

१०-१. चौगुणीनें-चौपटीनें, चंद्रास सोळा कळा असतात व नळाला त्यांचे चौपट म्हणजे चौसष्ट कळा माहीत होत्या. २. गंगेसि भंग—गंगेच्या भरतीस भंग असें म्हणतात. ३. वाजीचें मन जाणता—घोडा स्वाधीन ठेवणारा, अश्वपरीक्षक. ४. सांग नोहे तो कुसुमचाप इ०—सांग=स+अंग=ज्याला अंग आहे

असा.–कुसुमचाप [मदन], यास शंकरानें जाळल्यावर त्याचें शरीर नाहींसें झालें म्हणून तो सांग नोहे असें म्हटलें. मदनास अनंग असें नांव आहे. तुल्यरूप–रूपानें सारखा. ५. वरि वरि=पुनःपुन्हा. ६. धाले धनीं इ०–नळाचे पुढील [पुढें आलेले] याचक धनीं म्हणजे धनांनीं धाले म्ह० तृप्त झाले. किती तृप्त झाले तर, येतां फिरोनि समुदाय इ०–म्हणजे मागून जे आणखी याचक आले, त्यांस त्यांनींच धन देऊन तृप्त केलें.

११–१. कविजांबर=कविजा–देवयानी, तिचें अंबर–वस्त्र. तत्परिहितात्मवास–तिनें परिहित म्ह० नेसलेलें आपलें वस्त्र. २. समुदाचारलोप–चांगल्या आचाराचा लोप. ४. बंदी—शुक्राचार्यांचें नांव कवि असें होतें. म्हणून त्यास शर्मिष्ठा 'बंदी' म्हणजे स्तुतिपाठक म्हणते. ७. मी तों–मी तर सर्वसेव्यदात्याची, सेव्य म्हणजे सेवन करण्यास योग्य असें सर्व देणाराची, मुलगी आहें.

१२–हें वर्णन एका अमेरिकन मुलीचें म्हणून कवीनें केलें आहे. परंतु हें साधारणपणें कोणच्याही देशांतील एका लहान मुलीचें वर्णन म्हणून म्हणतां येईल. ३. तयांप्रति–नेत्रांप्रती. लोल–चंचल. ४. नतिमान अग्र–अणकुचीदार टोंक. आर्यान्वयोद्भव–(आर्य+अन्वय+उद्भव) थोरकुलांत जन्मलेली. ७. अव्याजता–अंतःकरणाचा निर्मळपणा. चवथ्या कवितेचा अन्वय—ज्याचें हें नेत्रसुंदर चारुतेचें अग्रनतिमान [अपूर्व] सारल्य मज अपूर्व दिसे, [असें] हिचें नासिक जगाला सोत्कंठ म्हणतें, [ही] रम्य बाला खरोखर आर्यान्वयोद्भव [आहे].

अर्थ—ज्याचा हा नेत्रांना सुंदर दिसणारा, गमतीचा (मौजेचा) शेवटीं अणकुचीदार झालेला सरळपणा मला अपूर्व (विशेष प्रकारचा–क्वचित् आढळणारा असा) दिसत आहे, असें हिचें नासिक जगाला (सर्वांना) मोठ्या उत्कंठेनें सांगतें, कीं ही मुलगी खरोखरीच आर्यवंशांत (श्रेष्ठ कुळांत) उत्पन्न झाली आहे. असा नाकाचा सरळपणा उत्तम कुळाशिवाय इतरत्र सांपडणार नाहीं. अथवा, आर्य लोकांचा वंश (race) याचें नाक अणकुचीदार

सरळ असणें हें लक्षणच सांगितलेलें आहे. ही एक आर्यवंशाची दुसरे कोठें न सांपडणारी खूण सांगतात.

१३-२. जें शास्त्र० इत्यादि-रामशास्त्री यांचें काम शास्त्रार्थ सांगण्याचें होतें. ऐसें अकर्म-तुमच्यासारख्यास देहान्तप्रायश्चित्त सांगणें हें अ-कर्म-वाईट कर्म, न आवडणारें काम.

१४-२. समकरुणेची-सारख्या दयेची. ईश्वराची दृष्टि सर्वांवर समान असते. ४. प्रवृत्तिविषयीं०—लोकांचीं मनें जरी संसाराकडे लागलेलीं असलीं तरी; प्रवृत्ति म्ह० संसार.

१५-२. डोंबल-डोकें [तिरस्कारानें हा शब्द उपयोगितात.] ६. सुधें-सरळ. मानवी-मनुष्य प्राणी.

१६-७. हा उतारा पांचव्या उताऱ्याची पुरवणीच आहे. ३. ती भूमीसि इ०—या श्लोकांत सीता भूमि, शेष, कूर्म इत्यादिकांस रामाला जड धनुष्य उचलण्यास साह्य करण्याविषयीं विनवीत आहे. उभार्नि-उचलून धर. पृष्ठीसीं-पाठीवर. कूर्माच्या पाठीवर पृथ्वी आहे अशी समजूत आहे; म्हणून सीता कूर्मास म्हणते, कीं तूं धनुष्य पाठीवर धर. ४. पुरश्चरण-मोठा जप; उद्यापन-व्रत पुरें करणें. ९. श्लोकाचा भाव असा:—रामानें धनुष्य वर उचललें, त्या वेळीं ऋषीलाही वर उचललें, म्हणजे त्यास इतका अभिमान वाटला. व, हा पोर धनुष्य काय उचलतो, हा राजांचा संशय आणि रामाच्यानें धनुष्य उचलेल कीं नाहीं, हा जनकाचा संशय, उडविला; धनुष्याच्या दोरीबरोबर सीतेचें चित्तही ओढलें, परशुरामासारख्याचा गर्व हरण केला व सर्व धनुर्भृत् म्हणजे वीर यांना त्यांच्या आकृति टाकावयास लाविलें, म्हणजे त्यांनीं एवढा वेळ ज्या वर माना केल्या होत्या, त्या लज्जेनें खालीं घातल्या. १०. सर्वे भुप-सर्वे हें 'सर्व' याचें संस्कृतामधील बहुवचन. भुप-यांतील 'भू' दीर्घ असून छंद जुळविण्याकरितां ऱ्हस्व घातला आहे; असाच पांचव्या श्लोकांतही घातला आहे.

१७-१. जनमेजय-परीक्षिताचा पुत्र व अर्जुनाचा पणतू; ह्याला सर्व भारती कथा वैशंपायन नामक ऋषीनें सांगितल्या. २. दृढतरे-प्रतिज्ञेचें विशेषण; दृढतरा-अत्यंत दृढ अशी, याचें

सामान्यरूप. ३. असे गर्व तोही इ०—अर्जुनाच्या मनांत गर्व होता कीं आपण फार पराक्रमी, आपणास कोण जिंकील ? श्लोक ६ वा पाहा. वामनावतारीं प्रभूंनीं बळीचा गर्व हरण केला होता, म्हणून येथेंही वामन हें नांव घातलें आहे. ५. सव्यसाची—सव्य—डावा, साच—बाण जोडणें; अर्जुनास दोन्ही हातांनीं सारखेंच शर-संधान करतां येत असे, म्हणून त्यास 'सव्यसाची' असें नांव होतें. अर्जुनाचीं दहा नांवें खालच्या श्लोकांत आहेतः—अर्जुनःफाल्गुनो जिष्णुःकिरीटी श्वेतवाहनः। बिभत्सुर्विजयी कृष्णःसव्यसाची धनंजयः'. ६. काळखंज—काळखंज नांवाचा राक्षस. ८. हुतवहार्पितखांडवानें —हुतवह म्ह० अग्नि, त्याला अर्पित आहे खांडव (वन) ज्यानें; बहु. स०. १७. मारावें इ०—भीष्म म्हणतो कीं, 'तुझ्या मनांत जर मला मारावयाचें असेल, तर माझें रक्षण कोण करणार आहे ? पण तसें तुझ्या मनांत नाहीं; तर मी जो तुझा भक्त त्याची प्रतिज्ञा तुला खरी करावयाची होती, म्हणून तूं शस्त्र धारण केलें आहेस, मला मारण्यासाठीं नव्हे'.

१८—१. संसार-गज-केसरी—संसाररूप हत्तीचा सिंह. शौरी —कृष्ण; 'शूर' हें कृष्णाच्या वंशाचें नांव होतें, त्यावरून त्यास शौरी म्हणत. १८. आर्त पुरो पांडूची—पांडवांनीं राजसूय यज्ञ करावा असा त्यांचा स्वर्गस्थ पिता पांडू यानें त्यांस निरोप धाडिला होता. २२. भैरवाकार दृष्टी-दृष्टीनें. येथें केवळ सामान्यरूपानें विभक्ति दाखविली आहे. (बाल० व्या० पु० २ क० २०० (१) पाहा.) ३४. जरेनें सांधिला इ०—जरासंध याच्या दोन आया होत्या. प्रत्येकीच्या पोटीं याचें उभें अर्ध जन्मास आलें. जरा म्हणून कोणी राक्षसी होती, तिनें तीं शकलें सांधून असा वर दिला कीं, हा सांधा जसा जुळविला आहे तसाच सोडविला तर-मात्र जरासंध मरेल. हा सांधा उखळण्याचा संकेत कृष्णानें भीमास दाखविला.

१९—१. कैटभ—कृष्णानें मारलेला एक दैत्य. २. रथचरण-पाणी, रथचरण=चक्र. ३. लोक-भयकारक—लोकांना भय वाटण्यासारखा. आश्चर्य टाका—आश्चर्य सोडून द्या. असें

म्हणण्याचें कारण पुढील श्लोकांत आहे. ६. खळ-दंड-पाणी—खळाला दंड करणारे आहेत पाणी म्ह० हात ज्याचे असा; बहु० स०. ८. कर्णहीन नयनें इ०—अशी समजूत आहे कीं सर्पास कर्ण नाहींत. तो ऐकण्याचें काम डोळ्यांनींच करितो. हल्लींच्या शोधाप्रमाणें सर्पाला ऐकण्याचें इंद्रियच नाहीं. २० दुःशब्द—अभद्र, वाईट असे शब्द. २१. जीर्ण तृणाचें विशेषण.

२०—१. कवण्या बोलें—कोणच्या शब्दांनीं. २. पक्षिकुलें—पक्ष्यांचे समुदाय. ३. हा गुलाब०—हा फुलला, त्यामुळें बागेंत सुंदरता (ये). मधुकर—भुंगे.

२१—१. माधवी कुंज—उन्हाळ्याकरितां माधवी वेलाचे कुंज—मंडप. ३. हरिखूनिया—संतोषून. अल्प पुष्पही०—लहान फूलसुद्धां आपल्यांत येणारे दंवाचे थेंब खालीं टाकून आपल्या इतर भावंडांना देतें.

२२—४. शस्त्रजवन्हि-शस्त्रांच्या आपटण्यानें उत्पन्न झालेले अग्नि. ५. तुमुल—आवह—मोठें, भयंकर युद्ध. १०. शरभ हा एक कल्पित पशु असून तो सिंहास मारितो असें मानतात ११. न आटे—हार गेला नाहीं. १२. मूर्तवात—मूर्तिमंत वारा. १३. सुषेण, दीर्घलोचन, कुंड, हीं कौरववीरांचीं नांवें आहेत.

२३—१. कोठें जातां इ०—मनुष्य उद्योगास निघालें म्हणजे त्यास कोठावूं नये, ही समजूत सर्वप्रसिद्धच आहे. २. हरिणापरिस—हरिणास गीत म्हणजे गाणें आवडतें अशी समजूत आहे. ३. शरणागतभयशमन—शरण आलेल्याचें भय नाहींसें करणारा. ४. तत् शुभ दैव म्हणजे चांगलें दैव हाच कोणी अनुकूल समीर म्हणजे वारा, त्याच्या योगानें करुणेचा मेघ जो प्रभु तो त्याकडे वळला. ६. सागर फुटतां इ०--सागरच फुटला तर सिकतासेतूचें म्हणजे वाळूच्या बांधाचें त्यापुढें काय चालेल ? १०. रुक्मिणीचे चित्ता—“ मी देवीयात्रेंत येऊन तुला घेऊन जाईन.” असें आश्वासन कृष्णानें रुक्मिणीस दिलें असतांही तिचें चित्त अधीर झालें होतें. (भाग २ उतारा १९ यांतील कथासंबंध पहा.) त्याप्रमाणें तुझ्या सदय मनांत मला योग्य समयीं पावावें

असें जरी असलें, तरी माझें मन अधीर झालेलें आहे. ११. पुराणपुरुष–परमेश्वरास म्हणतात; पुराण–जुना, म्हातारा; म्हणून भागलास, असें म्हटलें. १२. उगाळितां कोळसा इ०—मी कोळशासारखा बाहेर जसा तसाच आंत आहें. कोळसा आंत कसा आहे, हें पाहण्यासाठीं कोणी उगाळूं लागल्यास उगाच हात-मात्र दमतील. १३. धनवंत कण कसा वेंची–धनवंत झाला तरी तो धनाचा एक कणही टाकीत नाहीं. तेव्हां मला ठेवायला जागा नाहीं म्हणून तुम्ही टाकून कसे देतां ? जागा दुसरी तयार करा. १४. चारीही मुक्ती–सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता अशा चार मुक्ति आहेत. १५. भेटि बहु दिसां इ०— बारा वर्षांत कोणाची भेट नसल्यास प्रथमतः शिवालयांत भेटावें असें शास्त्र आहे. १८. तूं जर मला पापाचें बीज, म्हणजे रुजविण्या-साठीं बीं म्हणून जतन करून ठेविलें असें म्हणावें, तर तुझें नांव माझ्या तोंडांत कसें येतें ? कारण नांव तोंडांत आलें तर मुक्ति मिळालीच पाहिजे, असा अर्थ.

२४-१. शब्द-सृष्टि–भाषा, वाङ्मय, सारस्वत. ४. वैरागार किंवा वैरागर=खाण. १२. नाना-घाटी-मुद्रा-छंद=नानाप्रकारचे कवितांचे प्रकार, रचना, वृत्तें वगैरे ज्यांत आहेत असे प्रबंध म्हणजे काव्यें. २३. सरोवर–हा शब्द संस्कृताप्रमाणें येथें पुल्लिंगी घातला आहे.

२५–८. उभविले–उभे केले. ९. कासारांत–सरोवरांत.

२६.—हें पद 'प्रार्थनासंगीतांत' आहे. पण त्यांत व यांत बराच पाठभेद आहे. हें, कवि वामन आबाजी मोडक यांनीं मागा-हून सुधारलेल्या हस्तलिखित प्रतीवरून घेतलें आहे. १. आपुलें नातें–एकाच परमेश्वराचीं बालकें असल्यामुळें असलेलें बहीण-भावंडांचें नातें. २. नयनीति–न्याय व नीति. असदाचरण–खोटें दांभिक आचरण. जनशास्ता–विभु अगर धर्मनयनेता. (अन्वय) विभू समस्तां वंद्य आणि भक्तराज असा धर्मनयनेता निर्मितो. ३ जिन–जैनधर्मसंस्थापक. शंकर–शंकराचार्य. मूशा–ईशा–मोझेस् आणि जीझस् (येशू). जरदुस्त–पारशीधर्मसंस्थापक.

२७-७. चातक नांवाचा एक काल्पनिक पक्षी आहे. याच्या मानेची रचना अशी आहे कीं, तो तोंड वर करून ठेवील तरच त्यास मेघापासून पडणारे जलबिंदु मिळतील. ८. मोरास मेघ फार आवडतो; तिकडे या श्लोकाचा संबंध आहे. ९. मुकुटाला मोराचीं पिसें लावतात हें प्रसिद्धच आहे. १४. वनांतरीं-वन-अंतर-दुसरें वन; संस्कृत समासांत 'अंतर' हा शब्द 'अन्य' या अर्थीं येतो. १५. एक कावळा तोंडीं मांसखंड घेऊन झाडावर बसला असतां खालून सिंह चालला; तो आपल्या मांसखंडाकडे पहात आहे असें कावळ्यास वाटलें, अशी कल्पना करून कवि कावळ्यास म्हणत आहे. १६. 'जो (जो नाद, शब्द) ऐकून मत्ताहि करी भिउनि पळती, त्या नादातें तो पामर, क्षणभरि (तरी) कसा करील'? असा अन्वय.

भाग दुसरा

१--१. जगदंड-जगत्+अंड=ब्रह्मांड. २. चर्म-चक्षु-शारीरिक डोळे; दुसरे ज्ञानचक्षु म्ह० ज्ञानरूपी नेत्र. 'मनोहरा' व 'साधारणा' हीं विशेषणें विशेष्याचे लिंगाप्रमाणें फिरलीं आहेत. ३. किन्नराख्यपरिजनगण=यक्ष, गंधर्व, किन्नर, इ० हे देवांचे परिजन म्हणजे चाकर आहेत. हे देवांचीं अनेक कामें करीत असतात; त्यांच्या मनोरंजनासाठीं गायनवादनादिक करितात. त्यासि-परिजनगणास. 'तें' याचें दर्शक, जें मागावयाचें तें. ४. याचीं-प्रार्थना करीं. ५. दूत-सूर्याचे अगोदर थोडा वेळ उगवतो म्हणून शुक्र हा सूर्याचा दूत. ६. अंतरात्मा-अंतर-हृदय, आत्मा सर्वांचे हृदयांत असणारा, परमेश्वर. ७. चंद्र रवीच्या घराला अमावास्येस येतो. ९. पंच द्रव्यें-जुनी समजूत अशी होती कीं, पृथ्वी, आप (पाणी), तेज, वायु आणि आकाश (पोकळी) हीं पंचमहाभूतें, त्यांपासून जगांतले सर्व पदार्थ बनले. हल्लींच्या शास्त्रांवरून मुख्य तत्त्वें सुमारें साठ मानिलीं आहेत; पूर्वीं मानिलेलीं पंचमहाभूतें खरीं नाहींत. ज्यांच्या संयोगें षड्ऋतु सुखद होती-ज्या पंचमहाभूतांचा उत्तम मेळ बनल्यानें वर्षाचे जे सहा ऋतु ते सुखकारक होतात. ११.

श्रवण-रंध्र-विहार—श्रवणरूपी रंध्रांत विहार करणारे. १२. सत्पक्ष—ज्यांचे पंख सुंदर आहेत, असे—बहु. स.

२–४. दहिवरतोयें—दहिवराचे पाण्यानें. ८. वैतालिक—भाट. १०. तरुवसनावृत—तरु हींच जणुं काय वस्त्रें तीं अंगावर घेतलेले. तुंग—उंच.

३–४. औदासीन्य—उदासीनपणा; नावड. ६ अनघा मन घालुनियां इ०—तूं अनघा म्ह० पुण्ययुक्त पदार्थांत मन घालून अतिपूर्वक म्ह० मोठ्या प्रयत्नानें, पहिल्या चरणांत सांगितलेले पदार्थ म्ह० गोष्टी साध. १०. वचां—वचांवर (सदा विश्वास धरीं). ११. पुरुषार्थाचें साधन इ०--शरीर हें धनाप्रमाणेंच पुरुषार्थ म्हणजे पराक्रम करण्याचें साधन आहे. १३. आपलें शरीर जें सात विती आहे, तें अपकार सोसून सहा विती होत नाहीं, अथवा न सोसून आठ विती होत नाहीं. १५. व्यसनीं सहाय होऊनि इ०—जो स्वकीयांना संकटांत सहाय होऊन परासु होतो म्हणजे मरतो, तो इतका पुण्यवान कीं त्यास स्वर्गीं देव मान देतात. २०. त्यांच्या कुदृष्टिपातें-वाईट लोकांच्या दृष्टीनें (दृष्ट पडून) तेजस्वी अशीं पुरुषरत्नें उलतात म्हणजे फुटतात.

४--२. कपि-कटक-उत्तर-सिंधु-उद्गत—कपींचें प्रचंड कटक हाच कोणी लंकेच्या उत्तरेकडचा सिंधु त्यांतून उद्गत म्ह० निघालेला. ३. भू-देवीनें वेणी ओढिली—बायका भांडूं लागल्या म्हणजे एकमेकींचे केस ओढतात. पृथ्वी—सीतेची आई, इकडे यांत संबंध आहे. ५. प्रभु-प्रताप-असित-पथ—राक्षसरूप अरण्य जाळावयाचें, मग जलधिरूप तृण कोण जाळतो, म्हणून प्रभूचा जो प्रताप-अग्नि तो वरच्यावर जसा काय समुद्ररूप गवताचे शेंडे जाळीत गेला. त्याचा जो काळा मार्ग तो सेतु असा भाव. ७. महा-सुधी—मोठा बुद्धिमान असा सेतु रचणारा नळ नांवाचा वानर.

५–१. अणि -आणि. कवितेंत " आणि " " व " या अव्ययांचा उपयोग केलेला बरा दिसत नाहीं म्हणून तो सहसा करीतही नाहींत. येथेंही तो शब्द टाकला असता तर बरें झालें असतें.

६–२. जें कांहीं स्वर्द्रुसुम—जें कल्पवृक्षही देण्यास अक्षम म्ह०

असमर्थ, तें कर्णाचें तोंड देऊं म्हणतें. ९. कूपदेशाला—विहिरीच्या प्रदेशास म्हणजे विहिरीवर. १०. विष्णुहि म्हणेल कीं, रमेला म्हणजे आपल्या बायकोला, शोकद असला तरी यशस्वी असा पुत्र व्हावा. ११. स्ववधेच्छु धनंजय—आपल्या वधाची इच्छा करणारा अर्जुन. १२. ऐसा स्वप्न--संस्कृतांत 'स्वप्न' शब्द पुल्लिंगी आहे, तसाच त्याचा उपयोग येथें केला आहे. १३. द्विज-काम-पूर्ति-पर्वी इ०—कर्णाचा रोजचा मंत्र-जप झाल्यावर तो जे ब्राह्मण आले असतील त्यांच्या इच्छा पूर्ण करी; येथें तें पर्व म्ह० नियमित वेळ. १४. तुजचि पुढें 'दे' हें उच्चारितां कवि न भी; कारण कोणी निराश होतच नाहीं १९. स्व-जीवनहेतु-सरस्दान—आपल्या जीवनाचें, प्राणरूपीं जें पाणी त्याचें, कारण असें जें सरस म्हणजे सरोवर त्याचें दान. २०. न्यायव्रत वर्ती—न्यायरूप व्रतानें वर्तणारा. २२. ही माझी शक्ति कन्या, आली म्हणजे सर्पिणी व अशनि म्हणजे वज्र याच्या अनेकविध लीला दाखविते.

७–१. वाम-बाहु-सुरता—डाव्या हातास चिकटून बसलेली. वल्कलांबर-जटा-अभिरामा-वल्कलरूपी वस्त्रें व जटा यांच्यायोगानें अभिराम म्हणजे सुंदर. ६. तों माउल्या तिघिहि इत्यादि—कैकेयीनें जरी हट्ट धरून रामास वनास धाडिलें, तरी दशरथ मृत झाल्यावर व भरतानें तिचा निषेध केल्यानंतर तिला पश्चात्ताप झाला होता व त्यामुळें या प्रसंगीं तीहि बरोबर आली होती. ७. सूप-राम—सु-उप-राम--शेवटची शांति, किंवा मरण. ९. देखतां सुरवरांस इत्यादि—रावणादिकांच्या वधार्थ रामानें दक्षिणारण्यांत जावें अशी देवांची खटपट होती. १४. पाहे वसिष्ठ-मुनि-वक्त्र-सरोरुहातें इत्यादि-रामानें वसिष्ठाकडे पाहून त्यास भरताला अवतारकथा सांगून त्याचें समाधान करण्यास सुचविलें. १५. गुह्य-अवतार-चरित्र—जें कोणास ठाऊक नव्हतें असें राम-अवताराचें चरित्र—राम पुढें अरण्यांत जाऊन काय करणार वगैरे. २१. तव-पद—अंबुज-लाभ-कामी· तुझ्या पदकमलाचा लाभ व्हावा अशी इच्छा करणारा.

८–१. जें ब्रह्मलिखित इ०—कवि म्हणतो कीं यमानें ब्रह्म-

लिखित म्हणजे सत्यवानाच्या कपाळावरचा लेख बरोबर वाचला नाहीं; वाचला असता तर त्याला एव्हां मरण नाहीं असें त्यास समजून त्यानें त्यास नेलें नसतें. २. स्नेह--ऋण इ०—नवरा मरेपर्यंत सावित्री पतीची ऋणी होती. पुढच्या गोष्टी तिचे हातांतल्या नव्हत्या. ४. सन्मित्र इ०—सत् म्ह० साधूचें मित्र संकटीं पडत नाहीं. दुसऱ्या सर्वांचें मित्र संकटांत पडतें. येथें 'मित्र' शब्द संस्कृताप्रमाणें नपुंसकलिंगी योजिला आहे. ८. चक्षुस्तेजःसंपन्न-चक्षूंच्या तेजानें युक्त, ज्यास सतेज डोळे आहेत असा. १३. हा लक्ष्मीसुत इ०--जें यश उमासुत (गणपति) न लिहील तें मी जो लक्ष्मीसुत (मोरोपंतांच्या आईचें नांव लक्ष्मी होतें) तो किती लिहीन? जें काम गणपतीच्यानें होणार नाहीं तें माझ्यानें कसें होणार? १९. सत्यगुणासक्त--मानस— सत्य हा जो गुण त्याचे ठायीं आसक्त आहे मानस ज्याचें असा; बहु० स०. २०. अ--विनाभावें--विनाभाव म्ह० वियोग तो झाल्याखेरीज.

९--१. कृष्णपद-भक्ति--विशारद--कृष्णाची भक्ति करण्यांत कुशल. ३. पवन--येथें अर्थ श्वासोच्छ्वास. ५. अनादिभवशोक-प्राचीन काळापासून चालत आलेला किंवा ज्याचा आरंभ कोणास माहीत नाहीं असा भवशोक. ६. आमुशीं--आमच्याजवळ. ८. अवघडीं--हें क्रोधाचें विशेषण. पूर्व-प्रेम-स्थितिस घडी बसतां तीस विघडी; म्ह० नेहमींप्रमाणें मनाची स्थिति प्रेमयुक्त होतांच ती चटकन पुन्हा बदलून टाकी. १५. हरिकरिं इ०—कृष्णाच्या हातांतली गंगावनाची म्ह० केसांची मूद म्ह० पेड; तो काळा होता म्हणून तीच यमुना, (यमुनेचें पाणी काळें आहे); त्यांत जीं धवल म्ह० पांढरीं फुलें घातलीं होतीं, त्यांच्या योगानें गंगावनाची म्ह० गंगेच्या प्रदेशाची शोभा आली होती. (गंगेचें पाणी पांढरें आहे); याप्रमाणें सित म्ह० शुभ्र, व असित म्ह० कृष्ण, अशा नद्यांचा (गंगायमुनांचा) संयोग व्हावा, त्याप्रमाणें यदुपतीनें चित्रविचित्र वेणी घातली. गंगा व यमुना यांच्या संगमास त्रिवेणीसंगम असे म्हणतात. तेथें तिसरी नदी सरस्वती ही गुप्त

आहे. 'वेणी' म्हणजे नद्यांचा संगम किंवा पाण्याचा डोह असाही अर्थ आहे.

१०–२. हा शूर दूर ओसर–हा असा शूर व तेजस्वी आहे कीं, तो महाप्रभु जो रवि त्याला, 'दूर हो ! बाजूला सर'. असें म्हणणार. महा प्रभा वह–मोठी प्रभा धारण करणारा. हार विलासि-जनेंसा—विलासि-जनानें जसा आपल्या गळ्यांतील हार देऊन टाकावा, त्याप्रमाणें. ४. श्रित-सुहृद्-अनवन करून—आपले आश्रित व मित्र त्यांचें अनवन म्हणजे अरक्षण करून म्हणजे रक्षण न करून. ६. देवापगा–विलाप देवांची आपगा म्ह० गंगानदी ही भीष्माची आई; तेव्हां तिला शोक होईल हें उघड आहे. ९. हरि हत इभ–सिंहानें मारलेला हत्ती. ११.ससाध्वस–भ्यालेला; हें अरियाचें विशे०. १२. दर-रक्त चक्षु–किंचित् लाल डोळे १३. त्या प्रभुनें शंकरानें.

११–२. नीर पाणी. ३ मोर मुगुट वन्सीवाल्यापरि मोराचे पिसांचा मुगुट असलेला, व हातांत पांवा असलेला श्रीकृष्ण, त्याप्रमाणें. ४. समाधान हाच परीस, तो दुःखरूप लोहारा लावतांच त्या दुःखाचें सुखरूप सोनें होतें. परिसाचा दगड लोखंडारा लाविल्यास लोखंडाचे सोनें होतें, अशी कल्पना आहे. निजहृद-याचा०–मी फक्त आपल्या हृदयाचा धनी आहें, व एवढ्या स्वामित्वापुढें मी पृथ्वीचें स्वामित्वही तुच्छ मानतों.

१२–३. युद्धीं परमार्थ मिळे क्षत्रिय रणांत मेला असतां त्यास स्वर्ग प्राप्ति व्हावयाची, अशी समजूत आहे. ४. धौम्य–पांडवांचे उपाध्याय. ६. वन-कोल-यूथ नाथें रानडुकरांच्या राजानें. यज्ञ-कोलेश–वराह अवतार. ७. जागा दाटुनि इ०–'हरि दाटुनि जागा केल्या गजा वांचाया जागा नसे.' असा अन्वय.

१३–५. भीति मनीं इ०–दैत्याच्या मनांत भीति उत्पन्न झाली. ७. उंबरा–उंबऱ्यावर. नखें–नख सजीवही नाहीं व निर्जीवही नाहीं; कारण त्यांत रक्त नाहीं म्हणून सजीव नाहीं व वाढतें म्हणून निर्जीव नाहीं. ८. करि सुमंगळ–अमंगळ जीं आंतडीं तीं गळ्यांत घालून सुमंगळ केलीं. १०. चतुर्दश लोक–विश्वामध्यें

निरनिराळे चौदा लोक पुराणांत सांगितले आहेत. ११.स्वकृतविभुकोपाभ्युपरमा–विभूला म्ह० देवाला आपण आणलेला कोप त्याचा उपरम करण्यास म्हणजे तो घालविण्यास.

१४–१. कृष्ण म्हणतो, तूं सुज्ञच आहेस, तुला कळतें, पण मी तुझा आप्त म्हणून सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. ४. गुप्त-प्रगट-व्यवहार–कौरवांनीं पांडवांस मारण्यास अनेक गुप्त व उघड गोष्टी केल्या. त्यांतल्या बऱ्याच धृतराष्ट्रास माहीत होत्या. ७. प्रभुनें–शंकरानें. ९. अन्यरणीं इ०–शत्रूबरोबर लढण्यांत प्राण वेंचले तरी चिंता नाहीं, पण आपसांत लढण्यांत वेंचूं नका. ११. कश्यप–देवांचा बाप, हा तुझे मुलगे देवांपेक्षां गुणांनीं श्रेष्ठ झाले, म्हणजे 'हा' म्हणेल. १२. वचनकराऽपत्य--वचनकर म्ह० आपली आज्ञा मानणारा, अपत्य म्ह० मुलगा. १४. क्षीरधिजाननचंद्र-चकोर--क्षीरधीची मुलगी जी लक्ष्मी तिचें आनन म्ह० मुख हाच कोणी चंद्र, त्यास चकोरासारखा.

१५-३. आर्यांबेच्या पोटीं–आर्यमातेच्या पोटीं.

१६–१. राधेय–कर्णाचें पालन करणारी राधा म्हणून होती, म्हणून त्यास राधेय व तिचा नवरा सूत म्ह० सारथि होता, म्हणून त्यास सूतपुत्र म्हणत. या आर्यांत कौरवांनीं पांडवांस ज्या गोष्टीं-च्या योगानें त्रास दिला त्यांचा संबंध आहे. त्यांची थोडक्यांत हकीकत:—विषान्न चारणें व डोहांत बुडविणें व त्यास सर्प चावविणें या गोष्टी कौरवांनीं भीमास केल्या होत्या. जतुगृह–धृतराष्ट्रानें वारणावती पांडवांस देऊन तेथें त्यांस राहण्यास पाठविलें. तेथें पांडवांस राहण्यासाठीं जो वाडा बांधिला होता, तो दुर्योधनानें जतु म्ह० लाख व दुसरे शीघ्रज्वालाग्राही पदार्थ यांचा बांधविला व त्यास आग लावून पांडवांस जाळण्याचा विचार होता पण ते सुटले. २. कपटद्यूत–कौरवांचा मामा शकुनी हा कपटद्यूत खेळण्यांत प्रवीण होता. त्याच्या साह्यानें कौरवांनीं पांडवांचें सर्वस्व हरण करून द्रौपदीस दासी म्हणून सभेस आणिलें, पांडवांस वनवास करावयास लाविलें, व वनवास, अज्ञातवास वगैरे सर्व पांडवांनीं कबुलीप्रमाणें केलें असूनही त्यांस त्यांचें राज्य दिलें

नाहीं. ७. खरदुर्वाक्यशर-शत–तीक्ष्ण अपशब्द हेच कोणी शेंकडों शर. ९. धर्मगृहा--यमाच्या घरीं. १०. येथून पुढें 'धर्म' या शब्दाचे धर्मशास्त्र व धर्मराजा असे दोन अर्थ घ्यावयाचे. न तोय सांचविता–पाणी सांठवून न ठेवणारा.

१७--५. तनुअर्ध–शंकराच्या अर्धांगीं पार्वती आहे, म्हणजे तो अर्ध स्त्रीरूप आहे. ८. कथि न सुरस गाथा सर्व संसारचाथा–तिनें त्यास गोड गोष्टी किंवा संसाराच्या कंटाळवाण्या गोष्टी सांगितल्या नाहींत. चाथा–बडबड, वटवट. १४.हातीं आमलका-समान–हातावर आंवळा ठेविला असतां त्याचा प्रत्येक भाग जसा स्पष्ट दिसतो, त्याप्रमाणें त्यास शास्त्रें अवगत होतीं. मूळ संस्कृतांत 'हस्तकामलक' असें असून, त्याचें मराठींत 'हातचा मळ' असे झालें. याचा अर्थ एकाद्याच्या अगदीं हातची गोष्ट. २०. शिति-कंठ-वरें दिधलासि बरा--'शितिकंठवरें' कर्तृपद; तूं अध्याहृत कर्म, व येथें उद्देश्य, दिधलासि क्रियापद, कर्मणिप्रयोग; मराठींत कर्मणिप्रयोग प्रायः प्रथम व द्वितीयपुरुषीं होत नाहीं; तसले प्रयोग कवितेंतमात्र आढळतात. (बाल० व्या० पु० २ क० १४(१०) टीप पाहा). ३०. चिरंजीवी–जगाचे अंतापर्यंत वांचणारा. असे चिरंजीव पुराणांत सात सांगितले आहेत. तेः—अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, बिभीषण, कृपाचार्य, आणि परशुराम. विषबाधा –संसाररूप विषाची बाधा.

१८–१.तपःश्री-विलास-सदन-तपःश्रीच्या विलासाचें स्थान.३. मूर्तिसंपदेवर किरातत्वाचें आच्छादन घेतलें. ४. 'मूक' हें राक्षसाचें नांव. ७. मृगयाधर्म–मृग ज्याच्या आटोक्यांत आला असेल, त्याची ती शिकार; मग दुसऱ्यानें त्यास मारण्याचा यत्न करूं नये, हा मृगयाधर्म; असा नियम अजूनही मानितात. ९. किटी-किरी–डुकर. १०. खद्योतत्व० इ०–खद्योतत्व म्ह० आकाशांत प्रकाशणें हें रवि व काजवा यांचें काम समान असतें; पण तिमिरास म्ह० काळोखास रवि खाणी म्ह० खणून काढतो, कीं काजवा खणून काढतो ? १२. हरिपुढें पर्वत इ०–इंद्रानें पर्वतांचा गर्व वज्रप्रहार करून घालविला; पूर्वी पर्वतांस पंख असून ते

पक्ष्यांप्रमाणें उडत. त्यांचे पंख इंद्रानें तोडले अशी पौराणिक कथा आहे. १४. गरळ जसें यमुनाऱ्हदा-कालियामर्दन या आख्यानांतील कथा पाहा. पढवी जो चापश्रुति रामासी-शिवानें परशुरामास धनुर्वेद शिकविला. १८. कामाद्यरि-मद-तमो-रवि—कामादिक जे रिपु त्यांचा गर्व हाच कोणी तम त्यास रवीसारखा. २१. ज्याच्या म्ह० ज्या शंकराच्या लीला देवांसही म्हणतात कीं, मृत्यूचें भय हरण्यास सुधेचं चुबुक (हनवटी) धरूं नका, म्ह० तिला विनवूं नका. इ०. २३. नत-कामद-पद--शरण आलेल्यांच्या इच्छा पूर्ण करणारे आहेत पद ज्याचे असा; बहु० स०. २४. पुरस्थ-स्वमदघ्न-आपला गर्व हरण करणारा असा जो पुढें असलेला किरात, त्याच्या मस्तकीं शंकरमूर्तीवर वाहिलेलीं फुलें पडलीं.

१९–२. धरा नखें दुखणीं--मी नखांनीं जमीन खणीत असें—चिंताभ्रमणानें ५. मोह-रोग-वैद्य–मोहरूप रोगाचा वैद्य. चैद्य-चेदी देशाचा राजा शिशुपाल; यास रुक्मिणी द्यावी असा तिच्या भावाचा विचार होता. शाल्व, मगधपति (जरासंध) हे त्याचे मित्र. १२. नत चातक इ०—भक्त हेच चातक त्यांची दयारूप सुधा तिचा जलद म्ह० मेघ. २१. तडित् स्फुरण–अकस्मात् कृष्ण दिसला तेव्हां विजेचा झटका बसल्यासारखें वाटलें; याचीं कारणें पुढील दोन आर्यांत सांगितलीं आहे. २४. मूर्तिमंत मनोरथ असा रथ (कृष्णाचा). २५. माळा–गळ्यांतली; कृष्णानें रथावर ओढून घ्यावें म्हणून उंचविली म्ह० वर केली. २६. हरि-नील-निभवरांकीं–हरीचा नीलरत्नाच्या प्रभेनें युक्त असा अंक म्ह० मांडी; कृष्ण मेघश्याम होता म्हणून. ३०. स-मनोरथ-रथ-शस्त्र—मनोरथ, रथ, शस्त्र यांसहवर्तमान तो म्ह० रुक्मी प्रभूनें भग्न केला. ३२. दुर्दशा–या वेळीं कृष्णानें रुक्मीच्या डोक्यावर सात पाट काढले; ही दुर्दशा.

२०–१. स्थिर–स्थीर. २. रमणीकचपाशीं–स्त्रियांच्या वेणींत. ५. पंचमीं–पंचमस्वरांत. कोकिलेचा सूर हा पंचमांत असतो अशी समजूत आहे.

२१–६. संत म्हणति इ०–संत मनाला म्हणतात कीं, पूर्वी-

गत जो त्याला साह्य करणें हेंच शिवपद, तेथें बैस. म्हणजे पूर्वी जो येईल त्यास साह्य करावें अशी साधूंची चाल आहे. ७. सर्वहि संत इ०-संत आगमनामध्यें भेद पाहत नाहींत; तर अगोदर ज्याची भेट झाली तो अगोदर आला असें समजतात. ११. दैव-अदैव-संपद्-ओघ-दैव व अदैव या ज्या संपत् त्यांचे ओघ; अनुक्रमें अर्जुन व दुर्योधन. २०. बल्लव-मूर्ख लोक, टोणपे; २३. तूं मुनिंनीं चित्तीं षड्रिक्षयार्थ धरिलास-येथें द्वितीय पुरुषी कर्म असतां कर्मणिप्रयोग केला आहे. २६. मातलिसारथि-मातली आहे सारथी ज्याचा असा महेंद्र. बहु० स०.

२२-१. तरुवर-श्रेष्ठ, मोठा, उंच वृक्ष. उष्णकाळमासीं-उन्हाळ्यांत. सवें-बरोबर;-मूल जन्मलें कीं दूध उत्पन्न होतें; व मूल जसजसें वाढतें तसें दूधही जास्त होत जातें. २. वोढे-त्याजकडे तिचें मन ओढलें जातें. गोडधोड-गोड पदार्थ. कारभार-कारभाराची, कामाची काळजी. उमगोन-शोधून. बळें-मुद्दाम, त्याची इच्छा नसतांना. ५. अमृत हें इ०-भगवन्नाम हेंच अमृत, तें नेहमीं मुखांतून पाझरत असतें. ६. मोलें-गुजराथी, मारवाडी वगैरे लोकांत मृताच्या शोकार्थ मजुरीनें माणसें रडावयास लावितात. रंग बेगडीचा-बेगडीचा रंग कायम नसतो तसा. वेठ-जबरीनें कामास धरणें. ११. घेतसे गगन-आकाशांत उडत असतो. मत्स्य आठवितां पाळी, कूर्म दृष्टीनें सांभाळी-मासे आपल्या पिलांचें रक्षण नुसती आठवण करून व कूर्म म्हणजे कांसवें नजरेनें, नुस्तें पाहून करितात, अशी समजूत आहे. १२. बाह्य झळपळ-बाहेरची स्वच्छता. १३. शब्द-पडसाद-शब्दाचा प्रतिशब्द. १४. डोळां घालितां-डोळ्यांत बोट घालून पाहिलें तर एका पदार्थाचे दोन पदार्थ दिसतात. बाधी-बाधते.

२३-४. हरिणान्योक्तीमध्यें ४ ते ७, ८, ९ व १०, अशा निरानिराळ्या अन्योक्ति आहेत. त्यांच्या अर्थाचा परस्परसंबंध नाहीं. १२. इथे-या वृक्षावर. २०. चकोर म्हणून एक पक्षी कल्पिला आहे; त्याला चंद्राचा व चांदण्याचा आनंद वाटतो. सुधापाना-चंद्र हा सुधा म्ह० अमृत यानें पूर्ण आहे, व त्याच्या

प्रत्येक किरणांतून अमृत येत असतें अशी कल्पना आहे. २१. मानसींचा—मानससरोवरावरील; हंस हे मानस सरोवरावर असतात. मरुजनपद–मारवाड देश.

भाग तिसरा

१–१. समान–गुण—हिमालय बर्फामुळें शुभ्रद्युती, (शुभ्र आहे द्युति ज्याची, बहु०) व शुक्र हा शुभ्रद्युती. हे समान गुण. समान आहेत गुण ज्यांचे बहु० समास. ५. तुझें भव्य स्वरूप पाहून जरी आनंद होतो, तरी मन तुला थोर मानीत नाहीं, तर ईश्वरासच थोर मानतें. मोद-आकर–आनंदाचें स्थान. गमे, उदय पावतो, इ०—वाद्यांचा रव बहिर्विषयक आहे, तरी तो मनांतच उत्पन्न होतो. तशी हिमालयाची मूर्ति जरी दृष्टिविषयक आहे, तरी ती मनांतच जशी काय उत्पन्न होते; मग मानस प्रमोदभर म्ह० आनंदयुक्त होऊन निजा (आपली) चेतना (शुद्धि) विसरतें, व ईश्वरीं तल्लीन होतें; असा भाव. त्रिजगदात्मरूपा–सर्व सृष्टि आत्मरूप आहे अशी (भावना). ९. येथपासून कवि पुढें पर्वत, नद्या, वगैरे यांना ईश्वरानें दिलेल्या गोष्टींची आठवण देऊन त्यांस त्याचें स्तवन करवायास सांगतो. नियामक–नियम लावून देणारा. ११. इंद्रवज्राहतां–इंद्रवज्र (विद्युल्लता) त्यानें फोडलेले; हें 'कातळां' याचें विशेषण. १२. भंगावलि–लाटांची पंक्ति. १४. तुम्हां भास्करें कवण रंग दे वदा–तुम्हांस भास्कराकरवीं (भास्करें, करणी तृतीया) रंग कोणीं दिले तें सांगा. पुष्पाकरें–वसंतऋतूकरवीं. १५. सरलवृक्ष–'सरल' नांवाचे वृक्ष. १६. गवय–वनगाई. १७ व १८ यांत कवि हिमालयास त्याच्या जवळ म्हणजे त्याच्यावर असलेले निरनिराळे पदार्थ घेऊन परमेश्वराची षोडशोपचारें पूजा करावयास सांगतो.

२ १. प्रधानपंतातें–पेशव्यास;–मोरोपंताच्या वेळीं पेशव्यांचे राज्य होतें, म्हणून कवि म्हणतो, कीं राजा (सातारचा) व पंतप्रधान यांबद्दल राजनिष्ठा धरावी. २. चूर्णें जसेंच हळदीनें–चूर्ण म्ह० चुना. चुन्यानें हळद जशी रंगते. जेविं कर्षी इ०–ज्याप्रमाणें

दीनें कर्षकें (शेतकऱ्यानें) हळ (नांगर) कधीं सोडूं नये, इ०. ६. मधुपा चंपक इ०—भ्रमरास सोनचाफ्याच्या फुलाचा वास आवडत नाहीं असें म्हणतात. ८. सुकवि-कुल-गीतें—सुकवींचें जें कुल म्ह० समुदाय त्यानें गीतें म्हणजे गाइलेलीं म्ह० कविवलेलीं. ११. नगां जशी मुग्धा—ज्याप्रमाणें तरुण मुलगी (मुग्धा म्ह० जिची पोक्त बुद्धि झालेली नाहीं अशी) नगां म्हणजे दागिन्यांना वाहते, त्याप्रमाणें.

३—१.—राजा—हे दुर्योधना; ही कथा भीष्म दुर्योधनास सांगत आहे. २. सुरापगांगभवा—सुरापगा जी गंगा तिचा अंगभव—तिच्यापासून जन्मलेला, अर्थात् भीष्म. गांग—गंगोदक; हें शिवास दुराप नाहीं, कारण गंगा त्याच्या डोकीवरच आहे. ३. गरुडें सुधा इ०—गरुडाची आई विनता व सापत्न माता कद्रु यांच्यामध्यें कांहीं पण पडून विनतेला कद्रूचें दास्य करावें लागलें. पुढें कद्रूला अमृत पाहिजे होतें तें रण करून गरुडानें आणून मातेला दासत्वांतून सोडविलें. ९. गुरु-कुंभ-भव व छात्रामृतांशुजनक—छात्र म्हणजे शिष्य हाच अमृतांशु म्ह० चंद्र त्याचा जनक म्ह० समुद्र. या आर्येंत गुरूला कुंभभव म्ह० अगस्त्य याची व शिष्याला समुद्राची उपमा दिली आहे. १६. मरणीं—परशुरामाच्या मरणीं; 'तुम्हांस मारण्यासाठीं क्षत्रियांनीं देवांना नवस करून मला मागितलें', असें भीष्म म्हणतो. २१. मद्दूषित तेज—मी नापसंत केलेलें तेज म्ह० पराक्रम किंवा मोठी गोष्ट, कृत्य. २५ जयमाशास्व—मला जय येवो असा आशीर्वाद द्या. कीर्ति-केलि-सदन—कीर्तीचे क्रीडेचें घर; मोठा कीर्तिमान. २६. वंदावा गुरु हर्षद इ०—हा द्विजराज (ब्राह्मण) अमळ म्ह० शुद्ध आहे व द्विजराज म्ह० चंद्र हा मलिन आहे, म्हणून चंद्रानें यास नमन करावें. २८. तुमच्या न ब्राह्मण्या इ०—भीष्म म्हणतो कीं, तुमचें ब्राह्मण्य, तप, व विद्वत्ता यांचेवर मी प्रहार करीत नाहीं, तर तुम्हीं जें अयोग्य म्ह० क्षत्रिय नसतांना जें क्षत्रियपण स्वीकारलें आहे, त्याच्यावर प्रहार करितों.

४—१. विंध्याद्रिव्रत आचरोनि०—विंध्यपर्वत उंच वाढून सूर्याच्या रथास अडथळा करूं लागला. त्यास अगस्त्य ऋषींनीं नम्र

होण्यास लाविलें. भार्गवराममार्गणभयें-परशुरामाच्या बाणाच्या भयानें. परशुरामाच्या बाणानें समुद्र मागें हटला व तेथें कोंकण वसलेलें आहे अशी दंतकथा आहे. हल्लीं कोंकणप्रांत आहे त्या ठिकाणीं फार प्राचीनकाळीं समुद्र असावा व पुढें भूकंपानें तेथें जमिन वर आली असावी, असें अर्वाचिन भूगर्भशास्त्रवेत्त्यांचें मत आहे. हीच सृष्टिक्रमानें घडलेली गोष्ट वरील दंतकथेच्या रूपानें लोकांत रूढ राहिली असावी. मुली–पर्वताच्या मुली–नद्या. ३. अच्छोदक–(अच्छ+उदक)स्वच्छ पाणी. स्फटिकभा–स्फटिकाची शोभा. ४. महीरुह–पर्वत. ६. पंचगंगा नदीच्या स्नानाचें पुण्य प्रयागक्षेत्रीं स्नान केल्याइतकें आहे असें समजतात. ७. ज्योतिः-स्वरूपें–बारा ज्योतिर्लिंगांच्या रूपानें. ९. शिवा–कोल्ही. १०. प्रतापगडावर शिवाजीमहाराजांनीं अफझुलखानास वाघनखें पोटांत खुपसून मारलें, ह्या गोष्टीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ११. जावळीचा कवि-रामदास.

५–५. रामप्रसाद इ०–कर्ण हा राम म्ह० परशुराम याचा शिष्य होता. ६. रिपुमद-महिष इ०–रिपुमद हाच कोणी महिषासुर त्याला महाशक्ति भवानीप्रमाणें. ८. दिव्यास्त्रझघटोत्कच–घटोत्कच हा भीमाचा मुलगा. यानें भारतीय युद्धांत द्रोण सेनापति असतां भयंकर युद्ध मांडलें, तेव्हां कर्णास अर्जुनवधासाठीं मागून घेतलेली इंद्रशक्ति त्याच्यावर सोडावी लागली. ९. संक्षुब्धौर्वानल–संक्षुब्ध म्ह० अत्यंत खवळलेला असा वडवानळ. १२. तुमच्या विजयी भुजबळें–तुमच्या विजयी भुजबळाच्या योगानें भीष्म, द्रोण यांचे वधांबद्दलही मला वाईट वाटत नाहीं.

६. हे श्लोक भर्तृहरिकविकृत संस्कृत नीतिशतक याच्या भाषांतरापैकीं आहेत. यांतला प्रत्येक श्लोक अर्थाला स्वतंत्र आहे. ३. हरि, कवि, इ०—रूपावळीच्या आरंभींचे शब्द. ९. तें धैर्य–चेंडूच्या सारखें. १२. शांति पंकेरुहाचें–कमळाचें भावंड म्ह० कमळासारखें. १४. दे आपणास असतां–आपणास (आपणाजवळ) असतां म्ह० असलें तर (दुसऱ्यास) देतो. १५.स्वाती-स्तव-स्वाती नक्षत्रीं सूर्य असतां शिंपल्यांत थेंब पडून त्यांचीं मोत्यें

बनतात अशी समजूत आहे. १८. सुख अमोल वी-अमोल सुख देतो. २१. कडेविकडीच्या-डोंगराच्या पलीकडच्या. २२. मैनाक हा एक पर्वत दधिसमुद्रांत आहे. हा इंद्रास भिऊन त्याशीं युद्ध न करितां समुद्रांत जाऊन लपला. पित्यातें भिडणें—पित्याबरोबर खांद्यास खांदा देऊन लढण्यास उभें रहाणें. २५. न आनें—दुसऱ्या कोणत्याही वस्तूनें नाहीं. २६. दे आळवूनि इ०—हत्तीचा महात 'बाप, भाई' अशा हाका मारून जेव्हां घास देतो, तेव्हांच हत्ती घेतो अशी हत्तीची मोठी बढाई आहे. ३२. नीरें-उदकें; हें अनेकवचन आहे. पुष्कळ उदक असा अर्थ. ३५. जन-शासन-दंड-धर्ते—लोकांचें संरक्षण करणारे; राजे. सर्व-सम—सर्वांशीं सारखे वागणारे.

७. हा उतारा कै० चिंतामणिपेठकरकृत 'गंगावर्णना' या सुरस काव्यांतला आहे. १. ही गंगानदी. २. तिला—दृष्टीला. १३. प्रविततविषोद्गारगंधी—फार पसरलेले असे जे विषोद्गार त्यांच्या गंधानें युक्त असे भाग; हे विषोद्गार म्हणजे मागें सांगितलेलीं पानें कुजून निघालेले विषोद्गार. १९. निपजती—प्राप्त होतात. तरुणादित्यतापार्त—प्रखर सूर्याच्या तापानें पिडलेले. २०. गलत्प्रेमनेत्रांबुपूर—ज्यांचे डोळ्यांतून प्रेमाश्रूंचे पूर गळत आहेत असे—बहु० स०. २६. पात-विशीर्ण—पडण्याच्या योगानें तुटलेलीं. २७. स्वर्गारोहण-हेतु-निर्मित—स्वर्गांत चढून जाण्यासाठीं केलेले. ३०. आदिमवर्ण—त्यांचा पहिला स्वतांचा—मूळचा रंग.

८—३. या आर्येंत कर्णानें जसें म्हटलें आहे, तसें कर्णाचें वर्तन अगदीं अक्षरशः होतें. दुर्योधनानें त्यास आपलासें म्हटलें होतें, तर कर्णानें कांहीं झालें तरी त्याचा पक्ष सोडला नाहीं व शेवटीं दुर्योधनासाठीं त्यानें आपले प्राणही खर्चीं घातले. ६. घोषयात्रा—पांडव वनांत असतां त्यांस खिजविण्याच्या उद्देशानें कर्णदुर्योधनादि अरण्यांत गेले. तेथें एका सरोवरावर चित्रसेन गंधर्व क्रीडा करीत असतां कौरव-गंधर्वांचें भांडण होऊन चित्रसेन गंधर्वानें कर्णादिकांस पळविलें व दुर्योधनास व त्याच्या बंधूंस बद्ध करून तो घेऊन चालला. तेव्हां कौरवसेवक धर्मास शरण गेले. धर्माला दया येऊन त्यानें भीमार्जुनांस आपल्या चुलत बंधूंना सोडवून आणण्यास

सांगितलें. चित्रसेन हा अर्जुनाचा मित्र होता. त्यानें अर्जुनाच्या सांगण्यावरून कौरवराजपुत्रांस सोडलें. या गोष्टीचें कर्ण व दुर्योधन यांस फार वैषम्य वाटत असे. आर्या ६।७ यांत हा कथासंबंध आहे. ८।९. गोग्रह—विराटाच्या गाईंचें हरण. या वेळीं अर्जुनानें सर्व कौरवांस मूर्च्छित करून त्यांचीं वस्त्रें हिरून नेलीं. १३. भूपसखा—भूप हाच सखा, दुर्योधन, कर्म० धा० स०. १५. भृगुपतन—पर्वतावरून—कोसळणें. १७. हे प्रभु—बाहुरूपी प्रभु. २०. पानें— सुरापानानें. २४. श्वान स्वपोषकाच्या इ०—येथें कर्ण व त्यास आश्रय देणारे कौरव यांच्याशीं हा दृष्टान्त चांगला जुळतो. २६. प्रसवे तीच अभिज्ञा—जी बाळंत होते, तीच प्रसववेदना जाणते. वेणेची—प्रसूतिवेदनेची. २९. कर्णाची मानखंडना करून बोलण्यामध्यें वास्तविक शल्याचा उद्देश त्याचा हुरूप कमी करावा हा होता. कर्ण त्याचा भाव म्ह० उद्देश कळला म्हणतो तो हा भाव नव्हे. शल्य मुद्दाम असें बोलतो हें कर्णास कळत नव्हतें. कर्णास वाटलें कीं, शल्य पांडवांस भ्याला आहे म्हणून असें बोलतो; 'भाव' कळला तो हाच. ३०-३१ या आर्यांतील उद्गार केवढे शूरत्वाचे आहेत ! त्यांवरून कर्णाची खरी योग्यता कळते. ३०. कृष्णांला—कृष्ण व अर्जुन यांस, कृष्ण असें अर्जुनाचें नांव होतें. ३२. भूत—प्राणी, मनुष्य.

९—४. नित—नित्य. महान—महान व्यसन—मोठें संकट. ५. नद्यांनीं पुराचें पाणी कितीही आलें, तरी समुद्र आपली मर्यादा सोडीत नाहीं. १०. सुधामय—अमृतासारखी गोड.

१०—१. न तें अनृत इ०—जनीं सदाचार बुध जें वर्णिती तें अनृत न. ३. सदैव इ०—सदैव पद नमितां किणें (घट्टयानें) ललाट (आपलें) पद (म्ह० स्थान) केलें म्ह० तुम्हांस नमन करून करून जरी कपाळास घट्टे पडले, इ०. ४. आयसें मणिहेमभूपतिस जोडिल्या लाभ न—ज्या भूपतीजवळ रत्नें व सुवर्ण आहे, त्याचा जर लोखंडानें आश्रय केला, तर त्या राजाला ती गोष्ट लाभप्रद नाहीं; म्हणजे राजाला लोखंडाची पर्वा नाहीं. ६. हरापरिस तूं बरा इ०—हर म्ह० शंकर एकदांच विष प्याला व तूं स्तुतिरूप

विष सदा पितोस म्हणून तूं त्यापरीस बरा. ७. शरणागती— शरण, आगती—येणें; खरें, म्ह० योग्य रीतीनें शरण येणें. ८. तदा— कृष्णावतारीं. रजोमलिनकाय—रजानें मलिन आहे काय ज्याचा असा तूं; बहु० स०. ९. दयामृतरसार्द्र धी—दयारूप जो अमृतरस त्यानें आर्द्र:अशी (जननीची) बुद्धि. परा गुरूचे—श्रेष्ठ गुरु म्ह० बाप त्याचे प्रसादपट झांकिती पण ते थिटे म्हणजे आंखूड पडतात; कारण बाप अमुक एक मर्यादेपर्यंत ममता करितो. १० कवि म्हणतो कीं, तुम्हांस प्रसाद कर वयास उशीर लागत नाहीं; पण तुम्हांला आम्ही शरण येऊं तेव्हां. खरोखर जसें शरण यायला पाहिजे, तसें शरण आम्ही आलों नाहीं. ११. भजक—बर्हि-मेघा-भक्त हेच कोणी मोर त्यांचा मेघ. गुणचि घेतला—उतावळेपणाचा गुण मीं मुद्दाम अंगीं घेतला आहे. कवीनें कारण पुढें सांगितलें आहे. १२. कृतांत-कटकामल-ध्वज-जरा यमाच्या सैन्याचा शुभ्र ध्वजच अशी जी जरा ती. १४. सदुक्तमार्गीं—साधूंनीं सांगितलेल्या मार्गाकडे. स्वतत्त्व— आत्मबोध—ब्रह्मज्ञान; आपण कोण, आपला, परमेश्वराचा व जगाचा संबंध काय, हें ज्ञान. १५. असा अतिथि— पाप्यांना तारणें तुम्हांस मुळींच जड नाहीं; पण माझ्यासारखा पापी तुम्हांस कोठें सांपडेल ? जितका पातकी मोठा, तितकी तारणाराची तारीफ मोठी.

११—२. विष चारिलें—पांडवांना कौरवांनीं जें जें कांहीं वाईट केलें त्याबद्दल मागें भाग २—१६ याच्या टिपेंत सांगितलेंच आहे. जतुसद्म-च्छद्मकर्म—लाक्षागृह करण्याचें लबाडीचें कृत्य. ३. कितव— फसव्या;—शकुनी. ५. अळंकारे—हें क्रियापद आहे. ६. घननाद— इंद्रजित; त्याचा बाप म्हणजे रावण. ८. निखिळा—निखिला, सर्व. शकुनीरूप ताप देणारा खिळा तूं पुनः माझ्या उदरांत लाव, मार, बोंच. ९. अक्ष—फांसे, कपटद्यूतांतले. ११. युद्धश्रद्धे- सह—तुझी युद्धाची हौस व तुझा काय दोन्ही भंगितों. १२. तूं महिप इ०—शोण म्हणजे रक्त त्यानें लाल झालेली जी गदा तीच कोणी शक्ति म्ह० देवी तिच्या दृष्टीचा कटाक्ष तुझ्यावर जों- पर्यंत पडला नाहीं, तोंच तूं जो महिषासुररूपी त्याच्या गम ज

चालतील. १३. भूमींत इत्यादि–पांडूच्या त्या सुना विंतिलकां व्हाया भूमींत [रणभूमींत] सीर [शीर].–असा अन्वय. १६. कढी, भात, इत्यादि–भीम विराटाचे घरीं बल्लव नामक स्वयंपाकी बनला होता, हें प्रसिद्धच आहे. १७. घटजें–अगस्त्य ऋषीनें. पूर्व-अपर–सरस्वत्-ओघ–पूर्व व पश्चिम या समुद्रांचे ओघ. १८. जतन इ०–शरीराचें जतन. १९. विषचि ती अगदीं–औषधांत विष; कीर्तीमध्यें अपकीर्ति. २०. शारद-वारि-घन—शरदतूंतील मेघ; हे गर्जना करितात पण फारसें पाणी देत नाहींत.

१२–२. तुंग–उंच. ४. ही ओळ, "हाणी, विखरुनि टाकी, जुळवी" अशी असावी, असें अर्थानुक्रम व यमक दोन्हीवरून वाटतें. ६. गिरिकुहर–पर्वतांतील दऱ्या. ७. विशिष्ट तऱ्हेनें कंठां-तून वारा बाहेर येऊं दिला म्हणजे त्याचा त्यात्याप्रमाणें शब्द उमटतो. ८. म्हातारी–शेवरीची बी तिच्याभोंवतीं कापूस तसाच चिकटलेला असतां उडते. ती अगर तीसारखे उडणारे कांहीं हलकेसलके पदार्थ यांस मुलें फुंकर मारून उडवितात. त्यांस म्हाताऱ्या असें म्हणतात. ९ सुसाट–सोसाट्यानें. गगनकटाहो–गगनरूपी कटाह–कढई. १५. रोपे–तंतु, बंध.

१३–१. पांचाळ–पांडव-पक्षाचे लोक. ३. गौगौ–बैल रे बैल. कौरवांनीं शत्रूंस जिंकण्यासाठीं विष देणें, जतुगृह करणें वगैरे लबाडीचीं कृत्यें केलीं, तशीं आम्हांस करावयास नकोत; आम्ही बाहुबळानें शत्रूंस जिंकणार, असें भीम म्हणतो. ८. देवा, सर्व-भूत-पा—हें कृष्णास उद्देशून आहे. १२. मूर्धाभिषिक्त इ०–दुर्यो-धनास युवराज म्हणून यथाशास्त्र अभिषेक झाला होता, म्हणून त्याच्या मस्तकीं भीमानें पाय दिलेला धर्मास आवडला नाहीं. १६. अति-तापद-प्रभाव–अति तापद आहे प्रभाव ज्याचा; बहु० समास. १९. आदित्य, रुद्र, वसु–स्वर्गांत वसु, रुद्र व आदित्य असे लोक आहेत; त्यांच्यामध्यें मेलेल्यांचे आत्मे अनुक्रमें जातात. २० अवीराशतधिक्कृत—अवीरा झालेल्या म्हणजे ज्यांचे पति-पुत्र रणांत मीं मारिले आहेत अशा शंभर स्त्रियांनीं धिक्कार केला आहे

ज्याचा असा जो मी तो कसा सुख पावेन ? २१. सदा नवी-नेहमीं टिकणारी.

१४-२. दलित-कुसकरलेलें, तुडविलेलें. ४. यान- विमान. ५. तरलत- स्फुरण पावत.

१५-१. रुद्र-ललाट इ०--शिवाच्या कपाळावर एक डोळा आहे; शिव रागावला असतां तो उघडतो, व तो उघडला कीं त्याच्यांतून अग्नि निघून ज्या पदार्थाकडे तो डोळा पाहील त्या पदार्थाचें जळून भस्म होत असतें. अशाच रीतीनें मदनास जाळिलें. २. कामरूप- इच्छिलें रूप घेणारा, मायावी. अनिर्दश-ज्याला जन्मून दहा दिवस झाले नाहीं तो. ५. जो निःशेष इ०-शंकराच्या क्रोधानळानें जो निःशेष जळून गेला नाहीं, त्याला समुद्रांत टाकल्यानें आपला मृत्यु टळला असें खळ समजला. ८. रम्याकृति आच्छदून-आपलें रम्यरूप लपवून, म्हणजे दुसरें रूप घेऊन. १२. पारदें-पदें याचें विशेषण. करुणा-लीला-आलय-दयेचें क्रीडास्थान म्हणजे फार दयाळू. १३. मायाशत इ०—शेंकडों मायांमध्यें निपुण असा जो शत्रु त्याचें प्रमथनरूपी जी क्रिया तिची सिद्धि करण्याचा उत्साह मनांत उत्पन्न केला. १४. कलितोद्दामगद-कलित म्हणजे घेतली आहे उद्दाम म्ह० मोठी गदा ज्यानें. बहु० स०. विशेषण काम याचें. १५ स्वाधिक्षेपविवृद्धमन्यु--खळ याचें वि०. आपला अपमान, त्याच्या योगानें विवृद्ध म्ह० वाढला आहे मन्यु म्ह० क्रोध ज्याचा, असा. साळसा-आळस करणारी, गदेचें वि०. तैसें जें इ०-ज्याप्रमाणें उद्धत-गजानें हरिबालकोन्मुख यावें त्याप्रमाणें. १७. दिवसां-दिवसांनीं; तृतीया विभक्ति. स्वाप्तमूर्तोत्सव-तुमच्या आप्तांना मूर्तिमंत उत्सवच. १८. शंबरान्तोत्सव-शंबरासुरास मारण्याचा उत्सव. स्त्रीसख--ज्यांच्याबरोबर स्त्रिया आहेत असे. सुहृद्वार-सुहृदांचा वार म्हणजे समुदाय. १९, २०. मदन हा हुबेहूब कृष्णासारखा दिसत होता, यास अनुलक्षून वर्णन आहे. १९. तीं--शोभा आकृति वगैरे.

१६-३. प्रखर भास्कर०-(अन्वय) भास्करही करां प्रखर न करी. ६. वय दहा०-वय दहा वर्षें (असलेले). ११ उत्सवें-

हर्षानें. संतत उद्यम–नेहमींचा उद्योग. १२. रवी नृपती उगवुनी तया (अफाट गगन राज्याला) बहु तोषवी. १६. शिवाजीराजा हाच जसा कांहीं गरुड, त्यानें किल्ले हींच जशीं कांहीं आपलीं घरटीं तीं त्यावर बांधलीं. १७. मराठीराज्याची नदी याच डोंगरांत उगम पावली. १९. भरभराट–या शब्दाचा उपयोग येथें पुलिंगी केला आहे. हा बहुतेक स्त्रीलिंगी उपयोगिला जातो. विगत–पक्ष-जटायु-शरीरसे–पूर्वीं पर्वतांना पंख होते व ते इंद्रानें तोडून टाकले अशी कथा आहे. त्याचप्रमाणें रावणानें जटायूचे पंख तोडल्याची कथाही रामायणांत आहे. अचल–(१) निश्चल किंवा (२) डोंगर. अन्वय–(१) हे (पर्वत) विगत-पक्ष-जटायु-शरीरसे अचल (निश्चल) बैसुन पाहती; किंवा (२) हे अचल विगत-पक्ष-जटायु-शरीरसे (निश्चल) बैसुन पाहती.

१७–१. स्वसा, जावा–सीता, मांडवी, उर्मिळा व श्रुतकीर्ति, या एकीकडून बहिणी व एकीकडून जावा होत्या. ३. श्रीनें–सीता ही श्री म्ह० लक्ष्मी हिचा अवतार. ४. स्वसम०–नीज जशी निष्ठुर झाली होती, तसें स्वप्नही झालें होतें; म्हणजे गाढ झोंप नाहीं, स्वप्नही नाहीं. स्वप्न हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे, तसा येथें त्याचा उपयोग केला आहे. ६. चित्रकूट–प्रयागाचे आग्नेयीस हें एक पर्वत-शिखर आहे; तेथें राम कित्येक दिवस राहिले होते. बोध मानून–बोध ग्रहण करून. ७. देऊनि अभय मुनींतें मुनींस राक्षसांपासून त्रास होई, तो नाहींसा करितों असें रामानें त्यास अभय दिलें. ८. शमिलेखर्षभ–शमि म्ह० साधु त्यांतले देव. सुधवळ मानसीं जसे पत्री–मानसी म्हणजे मानस सरोवरावर जसे पत्री म्हणजे हंस पक्षी शुभ्रवर्ण, तसे जे मानसीं म्हणजे मनांत सुधवळ म्हणजे पवित्र. १०.सासु-मायसी–सासूसारखी किंवा आईसारखी. १५. त्या आर्योसि–पृथ्वीस; पृथ्वी ही सीतेची आई. पृथ्वी इतक्या प्रकारच्या जीवजंतूंस आपल्या पाठीवर वागविते, तेव्हां तिची वत्सलता अपूर्व होय. १६. राक्षस तो–विरोध नांवाचा; हा मूळचा तुंबरू नांवाचा गंधर्व असून शापानें राक्षस झाला होता. १८. श्रीघटजमुनि–अगस्त्य-मुनि; ह्याची उत्पत्ति घटापासून झाली. व यानें एकदां कांहीं

दैत्य समुद्रांत लपले होते म्हणून सर्व समुद्र प्राशून राक्षस पोटांत जिरविले व मग समुद्र पोटांतून सोडून दिला, अशी पौराणिक कथा आहे. २०. निववी तें इ० — तें जें पुत्राचें नातें, तें देहाला कां गाढ शांति देणार नाहीं ? पंचवटीस्थळ--गोदेच्या मुखापासून पश्चिमेकडे सुमारें शंभर कोसांवर गोदेच्या उत्तर-तीरीं जनस्थान म्हणून एक प्रदेश दंडकारण्याचा भाग होता; तेथचें एक स्थळ; तेथें राम राहिले होते. त्या स्थळीं सांप्रत भद्रतीर्थ व पर्णशाळा नांवांचें गांव आहेत. नाशिक हें जनस्थान, व तेथची पंचवटी ही रामाची पंचवटी, अशी जी सध्यां समजूत आहे, ती चुकीची आहे. २२. श्रीमत्र्यंबक--जटोद्भवा--त्र्यंबक म्ह० शंकर, त्याचे जटेंतून आलेली. भागीरथी ही शंकराच्या जटें-तून आली, त्याचप्रमाणें प्रत्येक पवित्र नदी ही शंकराच्या जटेंतून आली व ती भागीरथीचाच अंश, असा समज आहे. गोदेचा उगम त्र्यंबकेश्वर नामक डोंगरांतून आहे, म्हणून येथें शंकराच्या 'त्र्यंबक' या नांवाचा उपयोग केला आहे. त्र्यंबक- तीन आहेत अंबक म्ह० डोळे ज्यास तो. २३. ती त्यांच्याहि– त्यांच्या म्ह० लक्ष्म-णाच्या; हें मांडवीला म्हटलें आहे. २७. माझ्या मंदेंहि हास्यें ती कृत्याशी क्रुद्धा केली. भीति—केलि--गेह—आस्य--भीतीचे क्रीडेचें स्थान —भयंकर असें आस्य--तोंड. २८. योग्य दंड--तिचे नाककान कापले. ३६. विपदोघीं--विपद् म्ह० संकट, त्याचा ओघ. ४१. महीसमा-पृथ्वी ज्याप्रमाणें लोकांचे नानाप्रकारचे चार सोशित्ये, त्याप्रमाणें; सीता ही पृथ्वीची मुलगीच होती. ४२. सरमा ही विद्या व त्रिजटा ही कला. विद्या व कला या जशा आनंद देतात तशा या दोघी आनंद देत होत्या. ४४. मारुतीनें वृत्त सांगतांच माझे मनोरथ जे पांगळ्या-सारखे झाले होते, सर्व समर्थ झाले. महाधिगदार्त--महान आधि म्हणजे दुःख हाच रोग, त्यानें आर्त म्हणजे पीडलेले; तत्पुरुष स०. ४५. चवथे भावोजी सुगळ—सु+गळ—सुग्रीव; रामाचें व याचें परस्परांस साह्य करण्याचें बंधूसारखें सख्य झालें. म्हणून हे चवथे भावोजी. ४६. ऋक्षकटकें--अस्वलांचीं सैन्यें. या, हा, म्हणजे मारुती. ४८. महित जे तद्धी इ०—साधु जे आहेत त्यांना

स्तवनानें आनंद होतो. ५१. स्वामींनीं धर्म आठविला--अगोदर साम करण्याचा यत्न करणें हा धर्म. ताराबाई--सुग्रीव व वाली या दोघांची स्त्री. मलबाराकडील प्रदेशांत नायर वगैरे लोकांमध्यें पुष्कळ भावांनीं मिळून एक बायको करण्याची चाल अद्यापि आहे. ५५. प्रहस्त--रावणाचा सेनापति. ५६. इंद्रजित--रावणाचा मुलगा मेघनाद; यानें इंद्रास जिंकलें होतें म्हणून यास इंद्राजित म्हणत. ५७. पुष्पक-रावणाचें विमान. ५९. नागपाशा संपूर्णा यत्प्रसादें, ६०-ज्याच्या प्रसादें नागप जो गजेंद्र त्याचे मनोरथ पूर्ण झाले, असा जो विष्णु त्याचा सखा इंद्र, तो नागपाश परिहारी. ६०. कुंभकर्ण--हा रावणाचा बंधु; हा नेहमीं निजलेला असे. हा मोठा भयंकर व बलवान होता. सानुजन्मे--अनुजन्मा भाऊ; त्यासह असे, बहु. स०. ६१. कळेचा तात--हा एक वृद्ध व शहाणा वानर किंवा आस्वल होता; त्याचें नांव जांबवंत. ६२. समयीं--योग्य वेळीं; प्रसंगीं. ६३. जो बरोबरी करी म्हणजे ज्यानें बरोबरीनें युद्ध केलें त्याला (कुंभकर्णाला) प्रभु बरी गति देतो, असा अर्थ. ६७. तो अरि--इंद्रजित; हरिच्या--इंद्राच्या; इंद्राला जिंकणारा म्हणून तो त्याच्या काळजांतला कांटा असें म्हटलें आहे. ६९. हा साधुवत्स--मारुती. ७०. दिक्कंधर--दिक् म्ह० दिशा इतक्या (दहा) आहेत कंधरा म्ह० माना ज्यास असा रावण. मातलि--इंद्राचा सारथी. ७१. द्वैरथयुद्ध--दोनच रथी यांचें युद्ध; द्वंदयुद्धासारखें. दिङ्मुख--रावण. अध्वरीं--युद्धरूप यज्ञांत; तेव्हां बाणांनीं आकाश असें भरून गेलें कीं, त्यांत वारा किंवा सूर्यकिरणही शिरेनात. ७६. सारसें--सार असें, चांगलें. ७७. यत्स्मरणें शिबी प्राप्तभव्य केला-ज्याच्या स्मरणानें शिबीचें कल्याण झालें असा राम. शिबी म्हणून एक मोठा विष्णुभक्त राजा होता. ७८. दिव्य--सीतेनें आपण शुद्ध आहों हें दाखविण्यासाठीं अग्नींत दिव्य केलें. ८०. मामाजी--दशरथ; हा सूर्यरूपानें किंवा इंद्ररूपानें आकाशांत आला. ८१. कविसभाश्रीसंपदा—कवींच्या समुदायाची सर्व संपदा, म्हणजे जिच्या कीर्तीविषयीं कवि काव्यें रचतात अशी सीता. ८४. कथा--सीतेला नेल्यानंतर घडलेलें वृत्त. ८५. सीता म्हणते कीं, स्वामी पुण्याश्रमीं राहून राज्य, अयोध्यापुरी, वगैरे सर्व विसरते. ते कांहीं चित्तानें

ाढिले नाहींत, म्हणजे त्यांचें मन त्यांचे स्वाधीन आहे; परंतु वत्सा-च्या स्नेहानें जशी गाय घरीं येते, तसे ते भरताच्या स्नेहानें आले.
८६. शबरी--एक भिल्लीण. तिची भक्ति पाहून तिला उद्धरिलें. गुह-गंगेवरचा नावाडी; यालाही उद्धरलें. सीता म्हणते, राम जर दयाळू नसते तर यांचेवर एवढी कृपा त्यांनीं कशी केली असती?
८७. राम हा मेघ, त्याला भरत-शत्रुघ्न हे मोर सामोरे आले, तेव्हां क्षुधित जे आहेत ते सांपडेल तें कवळतात, त्याप्रमाणें रामानें भरतशत्रुघ्नांस कवळिलें म्हणजे आलिंगन दिलें. शेवटल्या चरणाचा अन्वय 'जाणों ग्रीष्मीं तृषार्ता वाटे [वाटेंत] विपुलतर सुधा-वर्ष (सुधेचा पाऊस) मिळे'.

१८--१. निर्वृत्त--संतुष्ट. शशीतपन--चंद्रसूर्य. भव-भय-भंजन--संसारताप नाहींसा करणारी. २. मलय पर्वतावरून येणारे सुगंधि वारे हाच तुला धूप आहे. आणि निरंतर वाहणारे वारे हे तुजवर जणुं काय चामर ढाळीत आहेत.

कविपरिचय

वामन—[मृत्युसन सुमारें १६२५]—हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. मोठा संस्कृत पंडित होता. त्याचें भाषेवरील प्रभुत्व चांगलें असून त्याचीं वर्णनें उदात्त आणि मनावर ठसा उमट-विण्यासारखीं असतात. त्यानें विशेषतः भागवतांतील व कांहीं भारत-रामायणांतील आख्यानें मराठींत आणिलीं. तीं फार गोड आहेत. त्याची भाषा प्रौढ व सरळ असून तींत स्वभावोक्ति व ओजस्विता हे गुण भरपूर आहेत. त्याच्या कवितेंत अर्थालंकारही असतात. व अनुप्रास वर्णनानुरूप असतात. त्याचीं वीररसाचीं वर्णनें जोर-दार व खळखळाटाचीं असतात. त्याचे वेदान्तपर पुष्कळ ग्रंथ आहेत, आणि गीतेवर ओवीबद्ध विस्तृत भाष्य आहे. त्याच्या कवितेंत पुनरुक्ति व पुनःपुन्हा तींच तींच वर्णनें फार येतात, आणि भाषेची रचना पुष्कळ अव्यवस्थित असते. तरी एकंदरींत

हा जुन्या मराठींतला प्रतिभावान कवि असून त्यानें श्लोकवृत्तांना मराठींत झोंकदार स्वरूप आणून दिलें.

विठ्ठल—हा कवि शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकांत होऊन गेला. हा वामनपंडिताचा समकालीन. याचें संपूर्ण नांव विठ्ठल अनंत क्षीरसागर. हा बीड जवळील गौरीपुर येथें राहणारा. व्यापार करून हा उदरनिर्वाह करीत असे. हा पंढरीचा मोठा भक्त होता. मराठींत चित्रकाव्य यानेंच प्रथम लिहिलें, म्हणून यास चित्रकवि विठ्ठल अशी संज्ञा आहे. रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर, पांचाली-स्तवन, विद्वज्जीवन, रसमंजरी, द्रौपदीवस्त्रहरण व बिल्हण-चरित्र हीं याचीं काव्यें होत.

मुक्तेश्वर--[इ. स. १५९९ ते १६४९]--हा कवि देशस्थ ब्राह्मण असून एकनाथ कवीचा नातू--मुलीचा मुलगा--होता, अशी आख्यायिका आहे. यानें मराठींत आख्यान--कवितेला व्यवस्थित आरंभ केला; व श्लोकवृत्ताची प्रथम सुरवात केली. याची एकंदर कविता बरीच मोठी आहे. हा जुन्या मराठींतला उत्तम कवि आहे. याची वाणी प्रौढ व रसाळ, वर्णनें उदात्त व भाषणें आणि संवाद उत्साहक असतात. भाषेंत अलंकार फार असतात, व भक्तिरस आणि वीररस यांचा ओघ चांगला असतो.

रघुनाथपंडित— याचा काल बरोबर कळत नाहीं. तो शिवाजीचा बाप शहाजी याच्या वेळीं होता असें वाटतें. तो कर्नाटकांत गेलेल्या दक्षिणी ब्राह्मणांपैकीं असून स्वतः हरिदास किंवा कीर्तनाचा शोकी असावा. संस्कृत नैषधकाव्याच्या आधारें रचिलेलें त्याचें नलोपाख्यान काव्य अत्यंत मनोहर, रसभरित आणि अलंकारिक असें आहे तें नानावृत्तमय असून त्यांत गाण्यायोग्य पदें व छंद आहेत. त्यांत प्रास, यमकें व श्लेषही बरेच आहेत. निवडक संस्कृत व मराठी-शब्दांचा उपयोग, रस, अलंकार, प्रासंगिक चातुर्याचीं भाषणें, भाषेला जुळेल अशी सुव्यवस्थित वाक्यरचना हे प्रकार या काव्यांत सहज आलेले आहेत. याच कवीचें गजेंद्रमोक्ष नांवाचें एक लहानसें काव्य अलीकडे आढळलें आहे.

आनंदतनय—हा रघुनाथपंडिताचा समकालीन होता. हाही

कर्नाटकांतील दक्षिणी ब्राह्मणांपैकींच असावा. याचीं बरींच आख्यानें आहेत. त्याचें काव्य कीर्तनयोग्य आहे, आणि भाषा सोपी आणि साधी आहे. " हा अरणीचा कवि यमकांनीं आपलें काव्य शोभवितो " असें मोरोपंतांनीं याजविषयीं म्हटलें आहे.

तुकाराम—[१६०८--१६४९]--पुण्यापासून नऊ कोसांवर देहू म्हणून गांव आहे तेथचा हा राहणारा. हा जातीनें शूद्र असून त्याचा वडिलोपार्जित धंदा वाण्याचा. परंतु लहानपणापासूनच त्याचें चित्त संसारांत नसल्यामुळें त्यानें व्यापाराचे सर्व कागदपत्र इंद्रायणींत बुडवून टाकिले व तो ईश्वरोपासना करूं लागला. तो पंढरीची वारी करीत असे व कथा करीत असे. आपण केलेला अभंग म्हणून त्याचा अर्थ स्पष्ट करून दाखवावा आणि लोकांस बोध करावा हा त्याचा उद्देश असे. कथा करण्याची चाल तेव्हांपासूनच पडली असें म्हणतात. त्यानें केलेले हजारों अभंग म्हणजे वारकरी मंडळींत बसून भजन आणि उपदेश करीत असतां स्वयंस्फूर्तीनें प्रगट झालेले त्याचे उद्गार होत. आणि यामुळेंच त्याची भाषा पूर्ण प्रासादिक, रसाळ आणि प्रेमळ आहे. त्याच्या सोप्या व साध्या भाषेंत एक प्रकारचा जोर आहे, आणि त्यामुळेंच त्यानें केलेल्या उपदेशाचा मनावर चांगला ठसा उमटतो.

रामदास—[१६०८–१६८१] हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. ह्याचें पहिलें नांव नारायण असें होतें; परंतु तो रामभक्त होता म्हणून त्याचें नांव रामदास असें पडलें. तो लहानपणापासून विरक्त असे व आजन्म ब्रह्मचारी होता. तो प्रथमारंभीं तीर्थयात्रा करीत फिरत असे. पुढें शिवाजीची राज्यस्थापना होऊं लागल्यावर तो परळीच्या किल्ल्यावर येऊन राहिला. तेथें संतमंडळी जाऊं येऊं लागल्यामुळें त्या किल्ल्यास सज्जनगड असें नांव पडलें. याचा शिष्यसंप्रदाय फार मोठा होता. रामदासीपंथ स्थापून त्यानें रामभक्तीचा प्रसार केला. त्याला स्वदेश व स्वधर्म याचा फार अभिमान होता. शिवाजीच्या राज्यस्थापनेस याचें बरेंच साह्य झालें असें समजतात. दासबोध, रामायण, सुंदरकाण्ड, युद्धकाण्ड, मनाचे श्लोक व इतर बरेच अभंग, भजनी पदें, स्तोत्रें व श्लोक असें

त्याचें बरेंच काव्य प्रसिद्ध आहे. त्याची कविता सुलभ आणि भक्तिरसप्रधान असून, भाषा साधी पण जोरदार आहे, आणि त्यांत व्यवहारज्ञानही पुष्कळ आहे.

मोरोपंत—[१७२९-१७९४]—हा जातीचा कऱ्हाडा ब्राह्मण, उपनांव पराडकर. याचें मूळ ठिकाण पन्हाळा असून तो बारामती आणि पंढरपुर येथें राहात असे. हा संस्कृतपंडित असून मराठी भाषेवर त्याचें चांगलें प्रभुत्व होतें. हा जुन्या मराठीचा उत्तम कवि आहे. याची कविता सुमारें पाऊण लक्ष आहे. भारत, रामायण, भागवत यांतील मूळ कथा घेऊन त्या त्यानें मराठींत आपल्या शैलीनें वर्णिल्या आहेत. त्यानें निरनिराळ्या तऱ्हेनें १०८ रामायणें रचिलीं आहेत. त्याची स्वतंत्र कविताही पुष्कळ आहे. त्याची कांहीं कविता निरनिराळ्या श्लोकवृत्तांत आहे. परंतु बहुतेक आर्यावृत्तांतच आहे. त्याची भाषा शुद्ध, प्रौढ, झोंकदार, रसभरित व अनेक अर्थालंकारांनीं भरलेली असते. याचे अनुप्रास व यमक हे शब्दालंकारही चांगले असून क्वचित् श्लेषात्मक रचनाही असते. त्याच्या भाषेंत संस्कृतशब्दांचा भरणा फार. संस्कृत शब्दांचा मराठींत यथायोग्य उपयोग कसा करावा हें मोरोपंतांच्या काव्याच्या अभ्यासानेंच शिकावें. याच्या काव्यांत वेदान्त नाहीं, परंतु भक्तिरस पुष्कळ आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर—[१८२४ ते १८७८] अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या सुरवातीचे हे एक मुख्य ग्रंथकार होत. इंग्रजी व संस्कृत यांचा कित्ता पुढें ठेवून उत्तम मराठी भाषा कशी लिहावी हें शास्त्रीबोवांनीं दाखवून दिलें. त्यांचें लेखन गद्य व पद्य दोन्ही रूपांत आहे. मराठी कवितेला अर्वाचीन वळण लावण्याचा प्रयत्न यांनींच प्रथम केला म्हटलें तरी चालेल. त्यांचें साकीबद्ध मेघदूत व बऱ्याच स्फुट कविता प्रसिद्ध आहेत. त्या मुळाचें सुंदर भाषांतर केलेल्या आहेत. आरबी भाषेंतील गोष्टी, साक्रेटिसाचें चरित्र, रासेलस वगैरे भाषांतर केलेलीं त्यांचीं पुष्कळ गद्य पुस्तकेंही प्रसिद्ध आहेत. प्रसिद्ध विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे हे वडील होत.

चिंतामणी-पेठकर—हे अगदीं आरंभींच्या आधुनिक कवीं-पैकीं एक होत. दक्षिणाप्राइझ् कमिटीनें गंगानदीवर काव्य करण्यास बक्षीस ठेविलें, तेव्हां यांचें " गंगावर्णना " हें भावनाप्रधान उत्तम काव्य रचिलें गेलें.

वामन दाजी ओक—हे नागपुरास राहात असत. त्यांनीं आपल्या गद्य व पद्य लेखनद्वारें मराठी वाङ्मयाची फार मोठी सेवा केली आहे. काव्यसंग्रहांत प्राचीन मराठी कवींच्या कवितां-वर यांनीं कांहीं मित्रांच्या साहाय्यानें उत्तम चिकित्सात्मक टिपणें लिहिलीं आहेत. त्यांचीं 'लॉर्ड बेकन', व 'बाबा नानक' यांचीं चरित्रें प्रसिद्ध आहेत. मोरोपंताच्या कवितेचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. " थोरले माधवरावावरील काव्य " त्या वेळचे मासिकांतून प्रसिद्ध झालें होतें, तें फारच चांगलें आहे. शिवाय त्यांची किरकोळ कविता पुष्कळ असून ती 'पुष्पवटिका' या पुस्त-कांत प्रसिद्ध झाली आहे.

रा० ब० विष्णु मोरेश्वर महाजनी, एम्. ए.—(जन्म सन १८५१, मृत्यु १९२१)--हे कवि, ग्रंथकार, इंग्रजी, संस्कृत आणि मराठी या भाषा उत्तम जाणणारे, आणि मराठी निबंध-कार व मार्मिक टीकाकार होते. त्यांनीं वऱ्हाडच्या शाळाखात्यांत शिक्षकाचें व इन्स्पेक्टरचें काम केलें. त्यांनीं शेक्स्पीअरच्या आधारें कांहीं नाटकें लिहिलीं व कांहीं इंग्रजी कवितांचीं सुंदर भाषांतरें केलीं आहेत. तीं " कुसुमांजली " या पुस्तकांत आहेत. या भाषांतरांना मराठीच्या दृष्टीनें नवीन तऱ्हेची काव्यसरणी आहे.

दत्त (दत्तात्रेय कोंडो घाटे बी. ए.) [जन्म सन १८७५ मृत्यु सन १८९९]--यांचें मूळ गांव अहमदनगर जिल्ह्यांतील श्रीगोंदें, जात मराठा. अल्पवयांतच त्यांच्या शिक्षणास सुरवात झाली; व मिशनरी लोकांच्या मदतीमुळें ते १५व्या वर्षीं म्याट्रिक झाले, व १८९८त बी. ए. झाले. लहानपणापासूनच त्यांना कविता करण्या-चा नाद असे. इंग्रजी कवींचा त्यांनीं पुष्कळ अभ्यास केला होता व तो त्यांचा अत्यंत आवडीचा विषय असे. त्यांची कविता बहुतेक सृष्टिवर्णनपर असून त्यांत नैसर्गिक प्रेम, नाजूक अभिरुचि,

माधुर्य व मार्दव हे गुण विशेष दिसतात. ते अत्यंत अल्पायुषी झाले, नाहीं तर त्यांनीं अर्वाचीन कवितेंत पुष्कळ चांगली भर टाकली असती.

वामन आबाजी मोडक—[जन्मसन १८३५, मृत्युसन १८९७]--दापोलीजवळ गव्हें येथें यांचा जन्म झाला. आरंभींचें शिक्षण त्यांनीं माधुकरी मागून केलें, कारण वडील लहानपणींच वारले होते. पण नंतर दापोली येथें एका सद्गृहस्थाच्या साह्यानें त्यांस इंग्रजी शिक्षण मिळालें. पुढें मुंबईस बऱ्याच अडचणी सोसून त्यांनीं १८५९त म्याट्रिकची परीक्षा दिली, व १८६२त बी. ए. झाले. त्याच वर्षीं बी. ए. ची परीक्षा प्रथम झाली. त्यांना संस्कृत-वाङ्मयाची फार आवड असे. त्यांनीं शिक्षणाचे कामांत सर्व आयुष्य घालविलें. मराठी कवींमध्यें त्यांना ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, व तुकाराम हे फार प्रिय असत. ईश्वरप्रार्थनेला गाण्याचें साह्य मोठें असतें, म्हणून त्यांनीं मुद्दाम गवई ठेवून त्याच्या साह्यानें मराठींत प्रार्थनापर व उपदेशपर अनेक पदें रचलीं. त्यांची भाषा सोपी, सरळ, शुद्ध आणि भारदस्त असे.

मोगरे—[१८८१--१९०४]प्राचीन विचार आणि प्राचीन वृत्तांची आणि रचनेची पद्धत बरीचशी कायम ठेवून रचना करणारे हे नवीन कवि होते. यांची कविता लहान लहान चुटके नसून बरींच लांब काव्यें आहेत. यांनीं नवीन विषयांवर विशेषतः श्लोकवृत्तांत कविता केली आहे. सुबोध व मधुर शब्दरचना हा यांच्या कवितेचा मुख्य गुण असल्यामुळें वाचकाचें मन सहज मोहून जातें. त्यांच्या कवितेचे विषय कठीण व डौलदार नसतात, आणि भाषा साधी, शुद्ध आणि व्यवस्थित असते. " कादंबरीसार " " दयानंद-काव्य " हीं त्यांचीं काव्यें प्रसिद्ध आहेत. त्यांची इतर कविता " मोगऱ्यांचीं फुलें " या नांवानें पुस्तकरूपानें पांच भागांत प्रसिद्ध झाली आहे.

रे० नारायण वामन टिळक—[१८६५--१९१९] यांनीं नवीन प्रकारच्या कवितेला सुरुवात केली. यांनीं जुनें वळण अगदींच सोडलेलें नाहीं, परंतु त्यांच्या कवितेचे विषय व त्यांतील विचार बहुतेक

नवीन धोरणाचे असतात. हे लहानपणापासून कविता करीत. पुढें ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावर त्यांनीं भाविक भक्तिरसमय कविता पुष्कळ केली आहे. तुकारामाच्या अभंगांच्या धर्तीवर यांनीं पुष्कळ बोधपर व भक्तिपर अभंग केले आहेत, व " ख्रिस्तायन " नामक ख्रिस्ताचे चरित्रावर ओवीबद्ध काव्य केलें आहे. हे शांत व प्रेमळ स्वभावाचे भाविक गृहस्थ होते. आपल्या साधुसंतांच्या भक्तिपर विचारांकडे त्यांचा ओढा असे. ते हिंदुधर्माचे द्वेष्टे नसून त्यांतील ईश्वरपर व भक्तिपर विचारांना नवीन वळण लावण्याचा त्यांचा प्रयत्न असे. तसेंच त्यांना आपला देश, लोक व भाषा यांचा फार अभिमान असे. त्यांची भाषा गोड, सरस, साधी, सोपी व अत्यंत प्रेमळ असून कवितेची रचना शुद्ध व टापटिपीची आहे. त्यांनीं मराठी कवितेला लावलेलें नवीन वळण फार चटकदार आहे. त्यांची गद्य लिहिण्याची शैलीही चांगली होती.

केशवसुत—(कृष्णाजी केशव दामले)--[१८६६--१९०५] यांनीं मराठी कवितेला नवीन वळण पूर्णपणें लावून दिलें. नवीन सुधारणेचे व देशाभिमानाचे विचार यांच्या कवितेंत पुष्कळ असून ते उत्तेजक व उत्साहक आहेत. सुधारणा, सृष्टिवर्णन, तत्त्वज्ञान, उपदेश, प्रेमकाव्य वगैरे विषय त्यांच्या कवितेंत येतात. त्यांचीं काव्यें इंग्रजींत ज्यांना Lyrics आणि Odes (गीतें अथवा लघुकाव्यें) म्हणतात, तशा प्रकारचीं आहेत. त्यांच्या भाषेंत कठीण शब्द अथवा रचना बहुधा नाहीं. परंतु भाषेच्या टापटिपीकडे यांचें फारसें लक्ष नसे आणि त्यांच्या कवितेंत संक्षिप्त विचार फार असतात, यामुळें ती टिळकांच्या कवितेइतकी सरळ व सहजबोध होण्याजोगी नाहीं. त्यांची कविता रसप्रधान असून सध्यांच्या परिस्थितींत सुचणारे विचार मनोद्गाराच्या रूपानें जागोजाग आलेले आहेत, ते सुंदर आहेत.

गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी)--[१८८६-१९१७) नवीन प्रकारची कविता करण्यांत या **कवींनीं रे० टिळक व** केशवसुत यांच्यापुढें पाऊल टाकलें आहे. आपल्या कवित्वाचा आरंभ केशवसुताच्या अनुकरणानें झाला असें ते स्वतःच म्हणत;

परंतु यांनीं आपल्या रचनेंत पुष्कळ ठिकाणीं केशवसुतांवर ताण केली आहे. तथापि त्यांच्या कवितेंत तात्त्विक व गहन विचार त्या दोघां कवींच्या इतके नसतात. यांचें वर्णन रसभरित असून सुंदर कल्पनामय व संवेदनात्मक असतें. यासंबंधानें त्यांनीं टिळक व केशवसुत यांपेक्षां इंग्रजी कवींचें जास्त अनुकरण केलेलें आहे. भोंवतालीं दिसणारे पदार्थ पाहून त्यावरून सुचलेले सहज उद्गार सुंदर रितीनें प्रगट करणें हें नवीन तऱ्हेचें कार्य यांना चांगलें साधलें आहे. यांच्या बहुतेक कविता लहान लहान गीतें आहेत. भाषेच्या दृष्टीनें त्यांची रचना टापटिपीची किंवा अगदीं शुद्ध नसते, तरी त्यांची भाषा वाचकांस तल्लीन करणारी आहे व तींत उपमा, रूपकें, उत्प्रेक्षा वगैरे पुष्कळ आहेत. यांनीं कांहीं चांगलीं नाटकें रचिलीं आहेत, व कांहीं विनोदपूर्ण गद्यनिबंधही लिहिले आहेत.

कवि वसंत [प्रि. बा. ब. पटवर्धन]--[१८६१-१९२२] यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटींत २० वर्षें काम केलें. कविता व नाटकें समजावून देण्याची त्यांची हातोटी फारच वाखाणण्यासारखी असल्यामुळें विद्यार्थिवर्गांत ते फारच प्रिय झालेले होते. मरणापूर्वीं एक वर्ष ते फर्ग्युसन कॉलेजचे ॲक्टिंग प्रिन्सिपाल होते. कवि या नात्यानें ते विशेषसे कोणास माहीत नाहींत. त्यांनीं कविता बरीच लिहिली आहे, परंतु तीपैकीं प्रसिद्ध अशी फारच थोडी आहे. त्यांची सर्व कविता नवीन प्रकारची आहे.

गो. वा. कानिटकर—[१८५४--१९२०] यांचें "संमोहलहरी" हें नवीन धर्तीवर तत्त्वज्ञानविषयक काव्य आहे." नारायणराव पेशव्यांचा वध" "अकबर" हीं त्यांचीं ऐतिहासिक काव्यें आहेत. हीं रसभरित व उदात्त वर्णनपर आहेत. त्यांची इतरही किरकोळ कविता बरीच आहे.

वासुदेवशास्त्री खरे—[सन १८५८--१९२४] हे कवि कोंकणस्थ ब्राह्मण होते. ते मिरज येथें राहात. यांनीं तेथील हायस्कुलांत संस्कृत अध्यापकाचें काम पुष्कळ वर्षें केलें. यांनीं "यशवंतराव' म्हणून वीररसप्रधान महाकाव्य रचिलें, तें संस्कृतकाव्याच्या धर्तीवर आहे. हें कल्पित कथानक असून त्याचा काळ

मल्हारराव होळकर राजपुतान्यांत स्वाऱ्या करीत असतांनाचा घेतलेला आहे. त्यांची कांहीं किरकोळ कविताही आहे. त्यांची कविता चांगली रसभरित, वर्णनपर असून भाषासरणी सोपी व बालबोध असते. यांच्या कवितेला अलीकडील वळणही बरेंच आहे. हे गद्यही चांगलें लिहीत. यांनीं 'गुणोत्कर्ष' 'तारामंडळ' आणि 'शिवसंभव' हीं चांगलीं नाटकें आणि 'नाना फडणविसाचें चरित्र' व 'नानांचा अधिकारयोग' हीं ऐतिहासिक पुस्तकें व दुसरे अनेक लेख लिहिले आहेत. यांनीं इतिहाससंशोधनाचें कामही चांगलें चालविलें होतें.

भास्कर रामचंद्र तांबे—[जन्म सन १८७४] या विद्यमान कवीचा जन्म ग्वाल्हेर संस्थानांत झाला. यांचे पूर्वज पेशवाईत गोविंदपंत बुंदेल्यांबरोबर उत्तरहिंदुस्थानांत गेले. भास्कररावांस बालपणापासूनच कविता करण्याचा नाद असे. थोरल्या बंधूंचे शिक्षणास परिस्थितीमुळें अडचण येऊं नये म्हणून यांनीं स्वार्थत्यागपूर्वक कॉलेजच्या शिक्षणाचा नाद सोडून देऊन नोकरी धरिली. यांच्या कवितेंत भाषासौष्ठव व अर्थगौरव दोन्ही दृष्टीस पडतात. त्यांच्या कवितेंत प्रसाद व माधुर्य असून त्यांची करुणभक्तिरसपूर्ण कविता हृदयस्पर्शी असते. त्यांची बरीच कविता पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली आहे.

आनंदराव कृष्णाजी टेकाडे—[जन्म सन १८९१] या विद्यमान कवीचें मूळ गांव नागपूर जिल्ह्यांतील मोहोपा हें होय. त्यांची स्फुट कविता पुष्कळ असून त्यांपैकीं बरीच "आनंदगीत" या त्यांच्या पुस्तकांत प्रसिद्ध झाली आहे. महाराष्ट्रांतील ठळक ठळक मासिकांतून त्यांच्या कविता नेहमीं प्रसिद्ध होतात. ते स्वतःही अनेक प्रसंगीं आपल्या खड्या आवाजांत आपली कविता गाऊन दाखवितात. त्या वेळीं श्रोतृवृंद तल्लीन होतो.

लक्ष्मीबाई बेहरे–[१८९७–१९१४] या कवयित्री प्रसिद्ध कवि रा० नारायण केशव बेहरे यांच्या पत्नी होत. यांच्या कविता मनोरंजन, आनंद वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

श्री० राधाबाई केळकर—[जन्म सन १८५७] कै० दामोदर गणेश केळकर, रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर यांच्या या पत्नी होत. या हल्लीं पुणें येथें राहतात. यांची काव्यरचना विशेषतः पौराणिक असून विपुल आहे, परंतु ती बहुतेक अमुद्रित आहे.
